


महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

मंगळवार, दि. २४ फेब्रुवारी २०२६




मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : ०९२ | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com | Gmail : punegavkari@gmail.com





# महाराष्ट्राच्या जडणघडणीत इतिहास अजितदादांचे नाव घेईल

## शोकसभेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस भावूक

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

मुंबईतील वरळी डोम येथे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांची शोकसभा अत्यंत शोकाकुल वातावरणात पार पडली. २८ जानेवारी २०२६ रोजी झालेल्या विमान अपघातात त्यांच्या निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेससह विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांनी उपस्थित राहून त्यांना श्रद्धांजली अर्पण केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या भाषणात सांगितले, "एखादे राज्य घडत असते तेव्हा अनेकांचा त्यात सहभाग असतो. महाराष्ट्राच्या जडणघडणीत इतिहास ज्या नेत्यांचा उल्लेख करेल, त्यात निश्चितपणे अजितदादांचे नाव असेल. राज्यातील प्रत्येक तालुका, प्रत्येक घटना याची त्यांना सखोल माहिती होती. महाराष्ट्राची नस त्यांना ठाऊक होती." ते पुढे म्हणाले, "अजितदादांनी अकरा अर्थसंकल्प मांडले. आर्थिक शिस्त हा त्यांचा बाणा होता. आर्थिक निर्णय घेताना त्यांनी कधीही बेशिस्तपणा केला नाही. कोणतीही फाईल त्यांच्या टेबलावर प्रलंबित राहत नसे; ते त्वरित निर्णय घेत. बैठका वेळेवर घेणे आणि मुद्देसूद चर्चा करणे ही त्यांची कार्यपद्धती होती. एखाद्या अधिकाऱ्याने मांडलेला मुद्दा पटला, तर ते स्पष्टपणे सांगत की हा निर्णय योग्य नाही, जरी तो आपल्या पक्षातील नेत्यांविरोधात असला तरी." मुख्यमंत्री पुढे म्हणाले, "अंत्यसंस्कारावेळी लाखो लोक उपस्थित होते. सर्वसामान्य नागरिक आणि कार्यकर्त्यांनी अत्यंत शिस्तीत अंत्यदर्शन घेतले; तीच त्यांना खरी श्रद्धांजली होती. त्यांच्या ठाम स्वभावामुळे त्यांना कधी लाभ, तर कधी तोटा झाला; पण ते सर्वांशी मोकळेपणाने वागत. संघर्षातून स्थैर्याकडे ते वाटचाल करत होते. त्यांच्या अचानक जाण्याने अनेक जण पोरके झाले आहेत."



दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांची शोकसभा मुंबईतील वरळी डोम येथे आयोजित करण्यात आली आहे. २८ जानेवारी २०२६ रोजी झालेल्या विमान अपघातातील निधनानंतर, त्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस आणि इतर राजकीय पक्षांच्या नेत्यांच्या उपस्थितीत ही सभा झाली. या शोकसभेला राज्याचे राज्यपाल आचार्य देवव्रत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार माजी सरन्यायाधीश भुषण गवई, सुनिल तटकरे, प्रफुल पटेल, मंत्री छगन भुजबळ, माजी मुख्यमंत्री सुशिलकुमार शिंदे, अजित पवारांचे दोन्ही मुले पार्थ पवार आणि जय पवार, पवार कुटुंबीय, सर्वपक्षीय नेते उपस्थित होते.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनीही भावना व्यक्त करत सांगितले, "विधीमंडळात असताना आमच्यात घट्ट मैत्री निर्माण झाली होती. ते दिल्लीला आले की नेहमी भेट द्यायचे. छोट्या बाबींपासून ते मोठ्या विकासकामांपर्यंत प्रत्येक गोष्टीकडे ते बारकाईने लक्ष देत. जनतेच्या हिताचा प्रश्न असेल, तर ते तो ठामपणे मांडत. त्यांचे अकाली जाणे हे महाराष्ट्रासाठी मोठा आघात आहे."

## थोडक्यात...

### जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका लांबणीवर

**मुंबई (समर्थ गांवकरी) :** महाराष्ट्राच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतील ओबीसी आरक्षणावर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडली. त्यानुसार राज्यातील 50 टक्के आरक्षण मर्यादा ओलांडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यास सर्वोच्च न्यायालयाने मनाई केली आहे. राज्यात आता 22 जिल्हा परिषद आणि त्याअंतर्गत येणाऱ्या पंचायत समित्यांच्या निवडणुका प्रलंबित राहणार आहेत. सर्वोच्च न्यायालयात पार पडलेल्या सुनावणीत अंतिम निर्णयाच्या अधीन राहून प्रलंबित निवडणूक घेण्यास परवानगी देण्याची मागणी राज्य सरकारकडून करण्यात अली होती. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने उर्वरित जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका घेण्यास मनाई केली आहे.

### दादा नावाचा जादूगार हसवत हसवत गेला

**मुंबई (समर्थ गांवकरी) :** अजित पवारांच्या शोकप्रस्तावावर बोलताना आमदार रोहित पवार यांना आज विधानसभेत अश्रू अनावर झाले. अजितदादा पवार नावाचा जादूगार संबंध महाराष्ट्राला हसवत हसवत गेला. दादांच्या जाण्याने राज्याच्या राजकारणातील मिश्कीलपणा गेला. ते नेहमीच मला माझ्या शर्टचे वरचे बटण लावण्यास सांगत. आता 40-50 वर्षांनंतर कधी दादांची वर भेट झाली, तर मी हे बटण त्यांच्यापुढे लावेन. तोपर्यंत हे बटण असेच खुले असेल. यामुळे त्यांची रोज आठवण येईल, असे ते म्हणाले. यावेळी त्यांनी सुनेत्रा पवार यांना सर्वोतपरी मदत करण्याची ग्वाहीही दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत अजित पवारांचा शोकप्रस्ताव मांडला. त्यावर बोलताना आज अनेक नेते भावूक झाले. यात अजित पवारांचे पुतणे तथा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांचाही समावेश होता.

# नितीन गडकरींनी सांगितली पुण्यातील प्रकल्पाबाबतची आठवण

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते अजित पवार यांचे २८ जानेवारी रोजी झालेल्या विमान अपघातात अकाली निधन झाले. यानंतर आज मुंबईतील वरळी डोम येथे शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सर्वच राजकीय पक्षांच्या नेत्यांनी अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी उपस्थित असलेल्या अनेक दिग्गज नेत्यांनी अजित पवार यांच्याबरोबरच्या आठवणींना उजाळा दिला. भाजपाचे नेते आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी देखील अजित पवार यांच्याबरोबर राज्याच्या मंत्रीमंडळात काम कारण्याचा अनुभव सांगितला. तसेच अजित पवार यांच्याबरोबर झालेल्या अखेरच्या फोन संभाषणात काय बोलणं झालं हेही त्यांनी यावेळी सांगितले. "आज दादांना श्रद्धांजली अर्पण करण्याची




वेळ येईल असे स्वप्नात देखील वाटलं नव्हतं," असे नितीन गडकरी अजित पवार यांच्या शोकसभेत बोलताना म्हणाले. "दादांचं जीवन मला जवळून पाहण्याची संधी मिळाली, ती जेव्हा ते सगळ्यात पहिल्यांदा आमदार झाले आणि त्यानंतर ऊर्जा राज्यमंत्री झाले. तेव्हा महाराष्ट्राच्या विधान मंडळात मी होतो. त्यांची आणि माझी अतिशय घनिष्ठ मैत्री झाली. ती मैत्री नंतर राजकारणाच्या पलीकडे होती." "दिल्लीला दादा यायचे तेव्हा नेहमी माझ्या घरी यायचे. आल्यानंतर पहिल्यांदा खिशातला एक कागद काढायचे... त्यांचं व्यक्तिमत्व अतिशय प्रोफिशनल होतं. प्रशासकीय कौशल्य जसं होतं, तसं निर्णय घेण्याची क्षमता देखील होती. विकासाची दृष्टी पण होती आणि कठोर निर्णय घेण्याची हिंमत देखील होती. लोकाभिमुखता होती आणि सत्य असेल तर सत्य म्हणण्याची ताकद पण होती. प्रत्येक छोट्या-छोट्या गावातील प्रश्न ते लिहून आणायचे आणि सगळे प्रश्न ते सोडवून न्यायचे," असे नितीन गडकरी यावेळी म्हणाले. अजित पवार यांच्याबरोबर झालेल्या शेवटच्या फोन संभाषणावर देखील गडकरी यांनी प्रकाश टाकला. ते म्हणाले की, "मला ते (अजित पवार) म्हणाले की, पुण्याकरिता तुम्ही काहीतरी करा. त्यांच्या आणि देवेंद्र फडणवीस यांच्या आग्रहाखातर पुण्याकरिता तीन मजली उड्डाणपुलाची ५० हजार कोटींची एक योजना तयार केली, ती मंजूर झाली. मी त्यांना फोन केला की, महानगरपालिकेची निवडणूक झाली की, तुम्ही आणि देवेंद्रजी मिळून आपण भूमीपूजनाचा कार्यक्रम घेऊ. तो त्यांचा आणि माझा शेवटचा फोन होता," असे नितीन गडकरी म्हणाले.

२००९ नंतर मी दिल्लीत गेल्यानंतर माझं मुंबईत येणं जवळपास कमी झालं. सातत्याने दादा दिल्लीत येतील तेव्हा त्यांची भेट व्हायची, कागद काढून त्यांचा अजेंडा पूर्ण झाल्यावर मनसोक्त गप्पा व्हायच्या. त्या सगळ्या राजकारणाच्या पलीकडच्या होत्या, असेही गडकरी यावेळी म्हणाले.

# शक्तिपीठ रद्दच्या मागणीसाठी मोर्चा

**सांगली : (समर्थ गांवकरी)**

शेतकऱ्यांच्या जमिनी घेउन अनावश्यक तयार करण्यात येत असलेला शक्तिपीठ महामार्ग रद्द करण्यात यावा या मागणीसाठी सोमवारी शक्तिपीठ महामार्ग विरोधी कृती समितीच्यावतीने मोर्चा काढण्यात आला. माजी खासदार राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली काढण्यात आलेल्या मोर्चामध्ये शक्तीपीठ महामार्ग बाधित गावातील शेतकरी व कार्यकर्ते सहभागी झाले होते. मोर्चाच्या सुरूवात सांगलीतील कर्मवीर चौकातून करण्यात आली. विश्रामबाग चौक ते जिल्हाधिकारी कार्यालय असा पाच किलोमीटर मोर्चाचा मार्ग होता. काही कार्यकर्ते बुधगाव, कवलापूर येथून पायी चालत येउन या मोर्चात सामील झाले. तर काहींनी बैलगाडीतून आपल्या कुटुंबियासह मोर्चात सहभाग नोंदवला. कुणीही मागणी




केली नसताना आणि पर्यायी समांतर मार्ग उपलब्ध असताना शक्तिपीठ महामार्गाचा आग्रह कशासाठी असा सवाल करून माजी खासदार शेट्टी म्हणाले, शेतकऱ्यांच्या विरोधामुळे रेखांकन बदलले असले तरी अन्य ठिकाणच्या जमिनी या महामार्गासाठी अधिगृहित करण्यात येणार आहेतच. सरकार रेखांकन बदलून महामार्ग करण्याच्या तयारीत आहे. त्यालाही विरोध करत शक्तिपीठ मार्ग रद्द करावा अशी मागणी आहे. जे आमदार निवडून गेलेले आहेत त्यांना जनाची ना मनाची लाज वाटली पाहिजे. त्यांनी हा मुद्दा उचलून धरायला हवा होता.

# उद्धव ठाकरेंचा राजकारणात मर्यादा पाळण्याचा सल्ला

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

अजित पवारांवर 70 हजार कोटींच्या घोटाळ्याचे आरोप झाले. पण त्यामुळे ते खचले नाही. त्यांच्या जागी दुसरा एखादा व्यक्ती असता तर त्याने खचून जाऊन जीव दिला असता. पण अजित पवारांनी या आरोपांना आपल्या कामातून उत्तर दिले. त्यामुळेच त्यांच्यावर आरोप करणाऱ्यांनीही त्यांचा सहकारी म्हणून स्वीकार केला, असे मत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी सोमवारी विधानपरिषदेत अजित पवारांवरील शोक प्रस्तावावर बोलताना व्यक्त केले. यावेळी त्यांनी राजकारण्यांना जीव नकोसा होईल, एवढे कुणावरही आरोप करू नका, असा सल्लाही दिला.



उद्धव ठाकरे म्हणाले, विधिमंडळाचे यंदाचे हे पहिले अधिवेशन आहे. या अधिवेशनाच्या सुरुवातीलाच आपण एका दिङ्मूढ अवस्थेत आहे. आजपर्यंत नेहमी सभागृहात दिसणारे व आपल्या सर्वांनाच आपले वाटणारे अजितदादा या सभागृहात किंवा या विधिमंडळात आज दिसत नाहीत. ही खंत आज आपल्या सर्वांच्या मनात आहे. माणसे येतात, माणसे जातात. माणसे असताना त्यांचे महत्त्व कधी कळत नाही. आणि ती नसतात त्यावेळी त्यांचे महत्त्व कळून काही उपयोग होत नसतो. अनेकजण अशी असतात की, जी जवळ असताना कळत नाहीत. पण काहीजण अशी असतात की, जी जवळ आल्यानंतर आपल्याला व्यवस्थित कळतात.

# कराराच्या माध्यमातून भारताचे सार्वभौमत्व अमेरिकेकडे गहाण!

**नागपूर : (समर्थ गांवकरी)**

भारताने अमेकिरेकेसोबत केलेल्या करारावर टीका होत आहे. या करारामुळे कृषी क्षेत्रावर परिणाम होणार असल्याचा आरोप होत आहे. या करारामुळे फक्तक्षकृषीच नाही तर उद्योग व आर्थिक धोरणावरही परिणाम होणार आहे. भारताचे धोरण हे अमेरिका ठरवेल. भाजप व आरएसएसच्या सरकारने या कराराच्या माध्यमातून भारताचे सार्वभौमत्व अमेरिकेकडे गहाण ठेवले, असा आरोप वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी सोमवारी पत्रकार परिषदेत केला. ॲड. आंबेडकर म्हणाले की, पूर्वी अमेरिकेकडे फक्त अडीच टक्केच निर्यात शुल्क लागत होते. आता १८ टक्के शुल्क आकारण्यात येणार आहे. तर त्यांच्याकडून आयात होणाऱ्या वस्तूंवर शून्य टक्के शुल्क लागणार आहे. सरकारने केलेल्या करारानुसार अमेरिका उद्योग, आर्थिक धोरणावर सुद्धा लक्ष ठेवेल. हे धोरणही



तेच निश्चित करतील. त्यामुळे भारताचे स्वातंत्र्यच हर वले गेले. परंतु कृषी व्यतिरिक्त इतर विषयावर विरोधक बोलत नाही. त्यांनी यावर बोलते व्हावे, असे आवाहन आंबेडकर यांनी केले. एपस्टीन फाइलमध्ये प्रधानमंत्री नरेंद्र मोदींचे नाव आले आहे. याची सर्व माहिती अमेरिकाला आहे. मोदीना ब्लॅकमेल केले जात आहे. 'मुद्रा मोदी आता मुजरा मोदी' झाल्याची टीका त्यांनी केली.

या एपस्टीन फाइलमध्ये नाव आलेल्यांवर विदेशात कारवाई होत आहे. भारतातील तीन जणांचे नाव आले आहे. परंतु एकावरही कारवाई झाली नाही. त्यामुळे प्रधानमंत्री मोदी यांच्या राजीनाम्यासाठी २ मार्चला मुंबईत आंदोलन करण्यात येणार असून यात सर्व विरोधी पक्षांनी सहभागी होण्याचे आवाहन त्यांनी केले.

अमेरिकाकडून स्वस्तात तेल मिळत होते. परंतु हे तेल खरेदी करणे भारतने बंद केले आहे. अमेरिकेच्या सांगण्यावरून इतर ठिकाणाहून तेल खरेदी करण्यात येत आहे. रशियाचे स्वस्त तेल खरेदी करणे बंद का करण्यात आले, याचा खुलासा करावा, अशी मागणीही आंबेडकर यांनी केली.

इराणसोबत युद्ध झाल्यास अमेरिका भारताच्या जागेचा विमान उतरविण्यास किंवा तेल भरण्यास वापर करेल. त्यामुळे या युद्धात भारताचा अप्रत्यक्ष सहभाग असेल. भारताला यातून दूर राहण्याचे स्वातंत्र्य नसेल. मोदींनी भारताला अमेरिकेचे ५१ राज्य केल्याची टीकाही आंबेडकर यांनी केली.

## फ्रान्सने राफेलचे कोड दिले नाही

भारताने फ्रान्सकडून राफेल विमान खरेदी केले. परंतु या विमानाचे कोड दिले नाही त्यामुळे त्याच्या रडार क्षमतेचा वापर झाला नाही आणि विमान पडले, असा दावाही आंबेडकर यांनी केला. आता पुन्हा ११४ विमाने खरेदी करण्यात येणार आहे. आता कंपनी विमानाचे कोड देतील का, याचाही खुलासा झाला पाहिजे. कंपनीने कोड न दिल्यास हे विमान फक्त लोखंड ठरेल, असेही ते म्हणाले.

# राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या नागपूर भेटीची चर्चा?

## प्रशासनाने केली दौऱ्याची जय्यत तयारी

**नागपूर : (समर्थ गांवकरी)**

भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू या विदर्भ दौऱ्यावर येत असून त्यांच्या नागपूर भेटीची राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा आहे. नागपुरात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मुख्यालय आहे. तसेच केंद्रीय मंत्री नितीन गडकरी हे नागपूरचे असल्याने या भेटीकडे विशेष लक्ष लागले आहे. २५ फेब्रुवारी रोजी राष्ट्रपती नागपूर आणि शेगाव येथे विविध कार्यक्रमांना उपस्थित राहणार आहेत. नागपुरातील ब्रह्माकुमारी संस्थेच्या कार्यक्रमानंतर त्या बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव येथे आयोजित 'राष्ट्रीय आरोग्य मेळा २०२६'चे उद्घाटन करणार आहेत. भारत सरकारच्या आयुष मंत्रालय तर्फे अखिल भारतीय आयुर्वेदिक काँग्रेसच्या सहकार्याने २५ ते २८ फेब्रुवारी २०२६ दरम्यान चार दिवसीय राष्ट्रीय आरोग्य मेळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. संत गजानन महाराज संस्थानच्या विसावा मैदानावर उद्घाटन समारंभ होणार असून महाराष्ट्राचे राज्यपाल, राज्य सरकारमधील वरिष्ठ अधिकारी, केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. औषधी वनस्पती



लागवड आणि कृषी वनीकरणाद्वारे आयुष औषध प्रणालींबाबत जनजागृती करणे, सर्वसमावेशक आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे आणि शेतकऱ्यांसाठी नव्या उपजीविकेच्या संधी निर्माण करणे हे या मेळ्याचे प्रमुख उद्दिष्ट आहे. मेळ्यात नागरिकांना आयुर्वेद, योग व निसर्गोपचार, युनानी, सिद्ध, सोवा-रिग्पा, होमिओपॅथी आदी आयुष शाखांमार्फत मोफत आरोग्य तपासणी, वैद्यकीय सल्ला व औषधोपचार मिळणार आहेत.

# अतिवृष्टीनंतर गारांचे संकट; लातूर, धाराशिव जिल्ह्यात पाऊस

**लातूर : (समर्थ गांवकरी)**

लातूर व धाराशिव जिल्ह्यात अनेक ठिकाणी अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. काही भागांत गारपीटही झाली आहे. वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसाने शेतकऱ्यांचे हरबरा व अंबा पिकाचे मोठे नुकसान केले. रेणापूर तालुका येथील पोहरेगाव तांडा परिसरात दुपारी साधारण अर्धा तास गारांसह जोरदार पाऊस झाला. अचानक आलेल्या या पावसामुळे परिसरात थंडी वाढली असून काही ठिकाणी वाऱ्याचाही जोर जाणवत होता. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. लातूर व धाराशिव शहरातील अनेक भागात पहाटे पाऊस झाला. तसेच अहमदपूर तालुका येथील चिखली आणि किनगाव परिसरातही



दुपारी मुसळधार पावसाने हजेरी लावली होती. त्यानंतर दुपारच्या सुमारास पुन्हा रेणापूर तालुक्यात गारपीटही झाली. अंधोरी–किनगाव परिसरात वादळी वाऱ्यासह झालेल्या तुफान पावसामुळे हरभरा, आंबा तसेच इतर रब्बी पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. काढणीच्या अवस्थेत असलेला हरभरा पावसात भिजून खराब झाला असून अनेक ठिकाणी आंब्याच्या झाडांची मोठी हानी झाली आहे. काही भागांत झाडे उन्मळून पडल्याची माहिती शेतकऱ्यांनी दिली. यामुळे आगामी काळातील आंबा उत्पादनावरही प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. लातूर जिल्ह्यातही सकाळच्या सत्रात पाऊस होता. तसेच दिवसभर ढगाळ वातावरण होते असे सांगण्यात आले.



जिवेत शरदः शतम्!

अकोले तालुक्याचे लोकप्रिय युवा आमदार
मा.आ.डॉ.किरणजी लहामटे
यांना वाढदिवसानिमित्त
स्नेहसदिच्छा!

इंजि.केशवराव वाकचौरे
गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टर,
ता.अकोले,जि.अ.नगर

सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्र.१
अकोले, ता.अकोले, जि.अहिल्यानगर

मा.श्री.एम.डी.चव्हाण साहेब
उपअभियंता

-: शाखा अभियंता :-
श्री.आर.डी.पाचोरकर,श्री.जी.एस.शेळके,
श्री.पी.एस.काळे,श्री.आर.पी.ठाकरे

सर्व कर्मचारी वृंद

लघु पाटबंधारे विभाग
पंचायत समिती, अकोले
ता.अकोले, जि.अहिल्यानगर

मा.श्री.विकास पवार साहेब
उपअभियंता

सर्व शाखा अभियंता व
सर्व कर्मचारी वृंद



अकोले तालुक्याच्या विकासाचे शिल्पकार, विकासाचे वारकरी
आमचे मार्गदर्शक एक सुस्वभावी व कणखर नेतृत्व आमचे मार्गदर्शक..
कार्यसम्राट
आमदार
डॉ.किरण लहामटे
साहेब
आपणांस उदंड आयुष्याच्या अनंत शुभेच्छा
मा.श्री.अक्षय अरुण आभाळे (तालुका अध्यक्ष राष्ट्रवादी युवक कॉंग्रेस,अकोले तालुका.)



आमचे मार्गदर्शक कार्यसम्राट आमदार
मा.आ.डॉ.किरण लहामटे साहेब
यांना
वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा...
शुभेच्छुक
गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टर
अकोले
इंजि.अक्षय
साहेबराव देशमुख



रस्ते कामातील
विश्वसनीय नाव..
पी.के.शिंदे

गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टर
अकोले - संगमनेर जि.अहिल्यानगर



कार्यसम्राट
आमदार
डॉ.किरण लहामटे
साहेब
आपणास
वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा !!
शुभेच्छुक
मा. बाबाजी लंके
गव्हर्न. कॉन्ट्रक्टर
अकोले, जि.अहिल्यानगर



आमचे मार्गदर्शक जनसामान्यांचे कैवारी
मा.आ.डॉ.किरण लहामटे साहेब
आपणास
वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा !!
शुभेच्छुक
इंजी.मा.आर.डी.महाले
मु.गणपती मंदिरा शेजारी, नवीन नवलेवाडी,
अमृतनगर, ता. अकोले, जि. अहिल्यानगर

कृषी उत्पन्न बाजार समिती,अकोले
ता.अकोले,जि.अहिल्यानगर




मार्गदर्शक
मा.आ.डॉ.किरण लहामटे

श्री.भानुदास तिकांडे
सभापती

श्री.रोहिदास भोर
उपसभापती

श्री.राजेंद्र जगताप
सचिव

सन्मा.संचालक मंडळ :- शिवनाथ विठ्ठल आरज, योगेश गजानन आरोटे,
रुपजी धोंडीबा कचरे,भास्कर बाळाजी खांडगे, सचिन हौशिराम रंधे, ईश्वर सोमनाथ वाकचौरे,
स्वाती तुकाराम कोरडे, मंगल अनिल भांगरे, बाळासाहेब गणपत सावंत,
चक्रधर भिमाजी सदगीर, अब्दुल महंमद इनामदार, किरण हरिभाऊ कानकाटे,
मारुती परशुराम वैद्य, अमोल नागनाथ वाघमारे

श्री.सुखप्रदा हॉस्पिटल
ब्राह्मणवाडा, ता.अकोले, जि.अहिल्यानगर

ब्राह्मणवाडा
परिसरातील
एकमेव शासन
नोंदणीकृत
हॉस्पिटल




डॉ.सतिष वाळुंज

२५ स्पेशालिटी डॉक्टरांची टीम, २४ तास अत्यावश्यक सेवा

उपलब्ध सुविधा :- जनरल सर्जरी, आर्थोपेडीक सर्जरी, युरो सर्जरी,
स्त्रीरोग प्रसुती, मेडीसीन, रेडिओलॉजी, फिजीओथेरपी, आयसीयु,
१० ऑक्सिजन बेड, अँक्युपंक्चर

इंजि.श्रीकांत कडलग
नामवंत कॉन्ट्रॅक्टर,
ता.अकोले,जि.अ.नगर

इंजि.उत्तम जोरवर
सामाजिक कार्यकर्ते
समशेरपूर, ता.अकोले,जि.अ.नगर

# जिवेत शरदः शतम्!

अकोले तालुक्याचे लोकप्रिय
युवा आमदार

## मा.आ.डॉ. किरणजी लहामटे

यांना वाढदिवसानिमित्त

हार्दिक शुभेच्छा



-: शुभेच्छूक :-

**श्री.अतुल नवले**
सामाजिक कार्यकर्ते
अकोले, ता.अकोले

**श्री.विजय खरात**
सामाजिक कार्यकर्ते
कोतूळ, ता.अकोले

**श्री.डी.डी. पडवळे**
वनपरिक्षेत्र अधिकारी
राजूर विभाग
ता.अकोले, जि.अ.नगर

**आदिवासी विकास शासकीय प्रकल्प कर्मचारी पतसंस्था,राजूर**
श्री.गंगाराम म्हातारबा करवर (चेअरमन)
श्री.चंदन प्रकाश बडवे (व्हा.चेअरमन)
सन्मा. संचालक मंडळ - श्री.अविनाश हरिश्चंद्र बनसोडे, सौ.वैशाली विजय कोंडार, श्री. भाऊसाहेब नारायण खरसे, श्री. पंडीत कदम, श्री. किशोर नामदेव शिंदे, , श्री. भाऊसाहेब दादू पटेकर, श्री. प्रमोद रमेश राऊत, सौ. छायाताई आदमाने, श्री. रामनाथ उंबरकर,
व्यवस्थापक - श्री. रावजी भोर
सर्व सन्मा. सभासद व कर्मचारी वृंद

**शासकीय मुलांचे वसतिगृह,राजूर**
ता.अकोले, जि.अहिल्यानगर
अधिक्षक व कर्मचारी वृंद

**शासकीय आश्रमशाळा, पैठण**
मुख्याध्यापक
कार्यालयीन अधिक्षक व कर्मचारी वृंद

**शासकीय आश्रमशाळा केळी कोतूळ**
ता. अकोले, जि. अ. नगर
प्राचार्य, कार्यालयीन अधिक्षक व कर्मचारी वृंद

**शासकीय आश्रमशाळा खिरवीरे**
ता. अकोले, जि. अ. नगर
प्राचार्य, कार्यालयीन अधिक्षक व कर्मचारी वृंद

**शासकीय आश्रमशाळा तिरडे**
ता. अकोले, जि. अ. नगर
प्राचार्य, कार्यालयीन अधिक्षक व कर्मचारी वृंद

**शासकीय आश्रमशाळा शिरपुंजे**
ता. अकोले, जि. अ. नग
प्राचार्य, कार्यालयीन अधिक्षक व कर्मचारी वृंद

**शासकीय आश्रमशाळा पळसुंदे**
ता. अकोले, जि. अ. नगर
प्राचार्य, कार्यालयीन अधिक्षक व कर्मचारी वृंद

**शासकीय आश्रमशाळा केळी रुम्हणवाडी**
ता. अकोले, जि. अ. नगर
प्राचार्य, कार्यालयीन अधिक्षक व कर्मचारी वृंद

**शासकीय आश्रमशाळा पळशी**
ता. पारनेर जि. अ. नगर
मुख्याध्यापक, कार्यालयीन अधिक्षक व कर्मचारी वृंद

**शासकीय आश्रमशाळा कोहणे**
ता. अकोले, जि. अ. नगर
प्राचार्य, कार्यालयीन अधिक्षक व कर्मचारी वृंद

**शासकीय आश्रमशाळा पिंपरकणे**
ता. अकोले, जि. अ. नगर
प्राचार्य, कार्यालयीन अधिक्षक व कर्मचारी वृंद

**शासकीय आश्रमशाळा घाटघर**
ता. अकोले, जि. अ. नगर
प्राचार्य, कार्यालयीन अधिक्षक व कर्मचारी वृंद

**शासकीय आश्रमशाळा मुतखेल**
ता. अकोले जि. अ. नगर
मुख्याध्यापक, कार्यालयीन अधिक्षक व कर्मचारी वृंद

**शासकीय आदर्श आश्रमशाळा शेंडी**
ता. अकोले, जि. अ. नगर
मुख्याध्यापक, कार्यालयीन अधिक्षक व कर्मचारी वृंद

**शासकीय आश्रमशाळा सावरचोळ**
ता. संगमनेर जि. अ. नगर
मुख्याध्यापक, कार्यालयीन अधिक्षक व कर्मचारी वृंद

**शासकीय आश्रमशाळा अकलापूर**
ता. संगमनेर जि. अ. नगर
मुख्याध्यापक, कार्यालयीन अधिक्षक व कर्मचारी वृंद

**शासकीय आश्रमशाळा म्हसवंडी**
ता. संगमनेर जि. अ. नगर
मुख्याध्यापक, कार्यालयीन अधिक्षक व कर्मचारी वृंद

**शासकीय आश्रमशाळा भोजदरी**
ता. संगमनेर जि. अ. नगर
मुख्याध्यापक, कार्यालयीन अधिक्षक व कर्मचारी वृंद

**शासकीय आश्रमशाळा साकुर**
ता. संगमनेर जि. अ. नगर
मुख्याध्यापक, कार्यालयीन अधिक्षक व कर्मचारी वृंद

**शासकीय आश्रमशाळा कोळेवाडी**
(म्हैसगाव) ता. राहुरी जि. अ. नगर
मुख्याध्यापक, कार्यालयीन अधिक्षक व कर्मचारी वृंद



अकोले तालुक्याचे लोकप्रिय युवा आमदार
## मा.आ.डॉ.किरणजी लहामटे
यांना वाढदिवसानिमित्त
हार्दिक शुभेच्छा



प्रोप्रा.भारतशेठ पिंगळे
मो.९४२३४६४६०३
**महाराष्ट्र ॲल्युमिनियम ॲण्ड ग्लास हाऊस**
सारडा पेट्रोल पंपाच्या मागे,अकोले



प्रोप्रा.रोशन भारत पिंगळे
मो.८६६८३३३४५२
**पिंगळे ॲण्ड सन्स ग्लास कॉर्पोरेशन**
नवलेवाडी फाटा,अकोले

---



मा.आ.डॉ.किरणजी लहामटे
यांना वाढदिवसानिमित्त
हार्दिक शुभेच्छा

-: शुभेच्छूक :-
## जिल्हा परिषद सार्वजनिक बांधकाम उपविभाग, अकोले
उपअभियंता : मा.श्री.सुंदरराव घुगे साहेब

शाखा अभियंता : श्री.हेमंत चव्हाण, श्री.सचिन सांगळे, श्री.दिनेश बिंद, श्री.विशाल गोहील, स्थापत्य अभियंता : श्री.सचिन शार्दुल, श्री.ओंकार देशमुख, श्री.नितीष घेगडमल, श्री.अभिषेक फापाळे, श्री.नितीन पिंगळे
क्लार्क : श्री.सुनील मोहटे, श्री.प्रविण वाकचौरे, श्री.दिपक जोशी, श्री.मारुती गवारी

---



अकोले तालुक्याचे लोकप्रिय युवा आमदार
मा.डॉ.किरण लहामटे
यांना वाढदिवसानिमित्त
हार्दिक शुभेच्छा

-: शुभेच्छूक :-
## इंजि.श्री.जावेदभाई सलीम पठाण
**गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टर**
मु.मेहेंदुरी, पो.रुंभोडी ता.अकोले, जि.अ.नगर

---



अकोले तालुक्याचे लोकप्रिय युवा आमदार
मा.डॉ.किरण लहामटे
यांना वाढदिवसानिमित्त
हार्दिक शुभेच्छा

- शुभेच्छूक -
## हॉटेल शिवशक्ती
समशेरपूर, ता.अकोले
जेवनाची उत्तम सोय..
प्रोप्रा.श्री.तुकाराम बेणके

---



**जिवेत शरदः शतम्!**
अकोले तालुक्याचे लोकप्रिय युवा आमदार
## मा.आ.डॉ.किरणजी लहामटे
यांना वाढदिवसानिमित्त
हार्दिक शुभेच्छा

इंजि.विजय ठकाजी दिघे
शिवाजीनगर, संगमनेर

इंजि.बाबाजी भाऊ लंके
निघोज, पारनेर

इंजि.पवन पारसमल
नविन नक्षर रोड, संगमनेर

इंजि.अजित माणिकराव गुंजाळ
बाजारपेठ, संगमनेर

RAJमुद्रा INFRASTRUCTURE
## राजमुद्रा इन्फ्रास्ट्रक्चर

---



अकोले तालुक्याचे लोकप्रिय युवा आमदार
## मा.आ.डॉ.किरण लहामटे
यांना वाढदिवसानिमित्त
हार्दिक शुभेच्छा

- शुभेच्छूक -
## इंजि.श्री.अक्षय वदक



गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टर
मु.पो.ता.संगमनेर, जि.अहमदनगर
मोबा. ७७९८५९५९४३

---



अकोले तालुक्याचे लोकप्रिय युवा आमदार
मा.आ.डॉ.किरणजी लहामटे
यांना वाढदिवसानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
-: शुभेच्छूक :-
## इंजि.अक्षय अनिल रहाणे
गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टर
रा.विरगाव फाटा, ता.अकोले,जि.अ.नगर

---




---






अकोले तालुक्याचे लोकप्रिय युवा आमदार
मा.आ.डॉ.किरणजी लहामटे
यांना वाढदिवसानिमित्त
हार्दिक शुभेच्छा

## मा.श्री.ईश्वर वाक्चौरे



कार्याध्यक्ष: राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी,अकोले
संचालक: कृषी उत्पन्न बाजार समिती, अकोले
मु.पो.कळस, ता.अकोले, जि.अ.नगर



# कार्यसम्राट

अकोले तालुक्याचे लोकप्रिय
युवा आमदार
## मा.आ.डॉ. किरणजी लहामटे
यांना वाढदिवसानिमित्त



हार्दिक शुभेच्छा!

-: शुभेच्छुक :-

## सार्वजनिक बांधकाम उपविभाग, क्र.२
पंचायत समिती, अकोले
ता.अकोले, जि.अहिल्यानगर

**मा.श्री.कडाळी साहेब**
उपअभियंता

सर्व शाखा अभियंता व
सर्व कर्मचारी वृंद

## सार्वजनिक बांधकाम उपविभाग, राजूर
पंचायत समिती, अकोले
ता.अकोले, जि.अहिल्यानगर

**मा.श्री.दहिफळे साहेब**
उपअभियंता

सर्व शाखा अभियंता व
सर्व कर्मचारी वृंद

## ग्रामपंचायत वाशेरे
ता.अकोले,जि.अहिल्यानगर



**श्री.किरण जयराम गजे**
सरपंच

**उपसरपंच : सौ.मनिषा संतोष वाकचौरे**

**सन्मा. सदस्य कमिटी :**
श्री.बबन दादा वाकचौरे
श्री.मच्छिंद्र संपत पानसरे
सौ.आशा गोविंद वाकचौरे
सौ.अनिता किरण गजे
सौ.स्वाती शांताराम शेटे

ग्रामपंचायत अधिकारी : श्री.रोहिदास नामदेव वैद्य
पाणी पुरवठा कर्मचारी : श्री.गोविंद रावसाहेब वाकचौरे,
ग्रामपंचायत कर्मचारी : श्री.सोमनाथ कारभारी गजे



अकोले तालुक्याचे लोकप्रिय युवा आमदार
**मा.डॉ.किरण लहामटे**
यांना वाढदिवसानिमित्त



हार्दिक शुभेच्छा

-: शुभेच्छुक :-

## इंजि.अजित नवले
**गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टर**
मु.पो.पाडाळणे, ता.अकोले



## जिवेत शरदः शतम्!
अकोले तालुक्याचे लोकप्रिय युवा आमदार
**मा.आ.डॉ.किरणजी लहामटे**
यांना वाढदिवसानिमित्त



हार्दिक शुभेच्छा

-: शुभेच्छुक :-



**श्री.भाऊसाहेब कारभारी येवले**
गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टर तथा माजी सरपंच ग्रा.पं.मेहेंदुरी
**श्री.अमित भाऊसाहेब येवले**
सरपंच ग्रामपंचायत मेहेंदुरी
ता.अकोले, जि.अहमदनगर



## जिवेत शरदः शतम्!
अकोले तालुक्याचे लोकप्रिय युवा आमदार
**मा.आ.डॉ.किरणजी लहामटे**
यांना वाढदिवसानिमित्त

स्नेहसदिच्छा!

- शुभेच्छुक -



## इंजि.सुरज नवले
नामवंत कॉन्ट्रॅक्टर,
ता.अकोले,जि.अ.नगर



अकोले तालुक्याचे लोकप्रिय युवा आमदार
**मा.आ.डॉ.किरणजी लहामटे**
यांना वाढदिवसानिमित्त



हार्दिक शुभेच्छा

- शुभेच्छुक -

## इंजि.श्रेयस रेवणनाथ पापळ

अकोले तालुक्याच्या
बांधकाम क्षेत्रातील नामवंत कॉन्ट्रॅक्टर

ता.अकोले,जि.अहिल्यानगर

# स्वतःला विसरून समाजासाठी जगणारा दीपस्तंभ

## निलेश पुनमचंद सोमाणी



**स्वतःसाठी जगणे ही आयुष्याची सर्वात सोपी वाट असते. त्या वाटेवर चालताना फारसे कष्ट लागत नाहीत, फारसे प्रश्न पडत नाहीत, फारशी जबाबदारीही उचलावी लागत नाही. पण स्वतःला विसरून समाजासाठी जगणे ही तपश्चर्या असते. ती तपश्चर्या उपोषणाची नसते, ती रोजच्या आयुष्यात स्वतःच्या सुखाला बाजूला ठेवण्याची असते. ती तपश्चर्या गाजावाजा न करता, कोणतीही अपेक्षा न ठेवता, केवळ माणुसकीच्या ओढीने जगण्याची असते. अशी तपश्चर्या करणारी माणसे फार कमी जन्माला येतात. ही माणसे दिव्यासारखी असतात. स्वतः जळतात, झिजतात, पण इतरांच्या आयुष्यात उजेड पसरवतात. समाजाच्या गर्दीत अशी माणसे हरवत नाहीत; उलट काळाच्या ओघात ती अधिक तेजस्वी होत जातात. अशाच एका दीपस्तंभाचे नाव म्हणजे निलेश पुनमचंद सोमाणी.**

(समर्थ गांवकरी)

वाशीम जिल्ह्याच्या साध्या, रखरखीत मातीमध्ये जन्मलेला हा माणूस आज केवळ एक व्यक्ती उरलेला नाही. तो एक विचार बनला आहे, एक चळवळ बनला आहे, आणि असंख्य तरुणांसाठी प्रेरणास्थान बनला आहे. त्यांच्या आयुष्याकडे पाहिले की एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते, यश सहज मिळत नाही, ते संघर्षाच्या आगीत तावून-सुलाखून निघाल्यावरच मिळते. समाजसेवा भाषणातून जन्माला येत नाही, ती त्यागातून, वेदनांतून आणि स्वतःला विसरण्यातून आकार घेते.

निलेश सोमाणी यांचा जन्म शेतकरी कुटुंबात झाला. गरिबी ही त्यांच्या आयुष्याची पहिली ओळख होती. घरात पैशांची चणचण होती, शेती हा व्यवसाय पुरणारा नाही वडीलावर कर्जही होते. उद्याचा दिवस कसा जाईल, याची खात्री नव्हती. आईंनी संसाराचा गाडा कष्टातून पुढे नेला.अनेक वेळा परिस्थिती इतकी कठीण होती की स्वप्ने पाहण्याचीही उसंत मिळत नसे. वडिलांनी पिठाची गिरणी ही अनेक वर्ष चालवली. पोटाची भूक भागवायची की शिक्षणाची चिंता करायची, असा प्रश्न अनेकदा उभा राहत असे. पण काही माणसे परिस्थितीसमोर शरण जात नाहीत; उलट परिस्थितीला आपल्या जिद्दीपुढे झुकायला भाग पाडतात. निलेश सोमाणी हे त्याच मातीचे बनलेले आहेत. लहान वयातच त्यांनी कष्टांचे खरे स्वरूप अनुभवले. शिक्षणाची ओढ मनात होती, पण कुटुंबाची जबाबदारी खांद्यावर होती. या दोन्हींचा समतोल साधताना त्यांनी पाठीवर कपड्यांचे गाठोडे घेतले आणि गावोगावी कपडे विकण्याचे काम स्वीकारले. रणरणत्या उन्हात, अंग झोडपून काढणाऱ्या पावसात, अनोळखी रस्त्यांवर चालताना त्यांनी केवळ आपली उपजीविका केली नाही, तर समाजाचे खरे रूप पाहिले. कुणाच्या चेहऱ्यावरची हतबलता, कुणाच्या डोळ्यांत साठलेली आसवं, कुणाच्या हातातली रिकामी झोळी या सगळ्या अनुभवांनी त्यांच्या मनावर खोल घाव घातले. त्या घावांनीच त्यांच्या अंतःकरणात करुणेचे बीज रोवले. हाच अनुभव पुढे त्यांच्या समाजसेवेचा मजबूत पाया ठरला.

अडचणी कितीही असल्या, तरी शिक्षणाशिवाय पर्याय नाही, या ठाम विश्वासावर त्यांनी आपली वाट पुढे चालू ठेवली. अनेक वेळा थकवा आला, निराशा आली, पण त्यांनी कधीही हार मानली नाही. त्यांनी बी.ए. आणि एल.एल.बी. द्वितीय वर्ष पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. कायद्याचे शिक्षण घेताना त्यांना न्यायाची खरी व्याख्या उमगली. न्याय म्हणजे फक्त कोर्टात दिला जाणारा निकाल नव्हे; न्याय म्हणजे समाजातील शेवटच्या, दुर्लक्षित, वंचित माणसाच्या डोळ्यात समाधान दिसणे. शिक्षणाने त्यांना दिशा दिली, तर अनुभवांनी त्यांना माणूस म्हणून समृद्ध केले.

यानंतर त्यांनी वाशिम अर्बन या खाजगी बँकेत तब्बल बारा वर्षे त्यांनी जनसंपर्क अधिकारी म्हणून सेवेत काम केले. नियम, शिस्त आणि जबाबदाऱ्या पाळताना त्यांनी माणुसकीचा धागा कधीही तुटू दिला नाही. अनेक अधिकारी फाइल्समध्ये अडकून पडतात; पण निलेश सोमाणी यांनी फाइल्सपेक्षा माणसांना महत्त्व दिले. सामान्य माणसाच्या अडचणी, त्याच्या वेदना, त्याचे प्रश्न हे सगळे त्यांनी जवळून ऐकले. तरीही त्यांच्या मनात एक सतत अस्वस्थ करणारा विचार होता आपण अजून अधिक लोकांपर्यंत पोहोचू शकतो, समाजासाठी अजून मोठी भूमिका बजावू शकतो. त्यामुळे त्यांनी कायमस्वरूपी नोकरीचा राजीनामा दिला.याच अस्वस्थतेतून त्यांच्या पत्रकारितेचा जन्म झाला. पत्रकारिता ही त्यांच्या दृष्टीने केवळ व्यवसाय नव्हता; ती समाजपरिवर्तनाची हाक होती. दैनिक मातृभूमीच्या वाशीम आवृत्तीचे संपादक म्हणून त्यांनी निर्भीड, प्रामाणिक आणि मूल्याधिष्ठित पत्रकारितेचा आदर्श निर्माण केला. त्यांनी सामान्य माणसाचा आवाज शब्दांत गुंफला. अन्याय, शोषण आणि विसंगती यांविरुद्ध त्यांनी लेखणी उचलली. साप्ताहिक तरुण समता वाणीच्या माध्यमातून त्यांनी समाजाला आरसा दाखवला. त्यांच्या लेखणीत सनसनाटी नव्हती, पण सत्य होते; आक्रमकता नव्हती, पण ठामपणा होता. त्यामुळेच त्यांचे लेख वाचकांच्या मनाला भिडले.

पत्रकारितेबरोबरच समाजकार्य हे त्यांच्या आयुष्याचे केंद्रबिंदू बनले. माजी राष्ट्रीय सेवाकर्मी, नेहरू युवा केंद्र (भारत सरकार) चे अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ विदर्भ अध्यक्ष, भारतीय जैन संघटना वाशीम जिल्हाध्यक्ष, तरुण क्रांती मंच जिल्हाध्यक्ष, मारवाडी युवा मंच वाशीम संस्थापक अध्यक्ष, स्वामी विवेकानंद शिक्षण व व्यायाम प्रसारक मंडळ धनज बु. अशा विविध जबाबदाऱ्या त्यांनी स्वीकारल्या. प्रत्येक पद त्यांनी सेवाभावाने निभावले. त्यांच्या दृष्टीने पद म्हणजे प्रतिष्ठा नव्हे, तर समाजासाठी काम करण्याची संधी होती. त्यांच्या कार्याची दखल घेत देशपातळीवर आणि राज्यपातळीवर त्यांना असंख्य पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. भारत सरकारकडून मिळालेला युवा जगत सर्वश्रेष्ठ राष्ट्रीय युवा पुरस्कार, भारत स्वाभिमान ट्रस्ट हरिद्वार तर्फे राष्ट्रीय युवा पुरस्कार, राजीव गांधी राष्ट्रीय समरसता पुरस्कार, ओडिशातील भुवनेश्वर येथे मिळालेला राष्ट्रीय वाकपटु पुरस्कार, रामदेव बाबांच्या पतंजली संस्थेचा पुरस्कार हे सगळे सन्मान त्यांच्या कर्तृत्वाची पावती आहेत. महाराष्ट्र शासनाचे राज्यस्तरीय आदिवासी सेवक पुरस्कार, वसंतराव नाईक शेतीमित्र पुरस्कार, महात्मा गांधी व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार, गुणवंत कामगार पुरस्कार, महात्मा गांधी विवादमुक्ती पत्रकारिता पुरस्कार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार, विदर्भ आयकॉन पुरस्कार, स्वामी विवेकानंद युवागौरव पुरस्कार, अहिल्याबाई होळकर युवा गौरव पुरस्कार या सन्मानांची यादी जितकी मोठी आहे, तितकाच त्यागाचा प्रवास खोल आहे. शंभरहून अधिक वक्तृत्व आणि वादविवाद पुरस्कार त्यांच्या विचारांची धार दाखवतात. मात्र पुरस्कार हे त्यांच्या आयुष्याचे अंतिम ध्येय नव्हते. समाजसेवा हीच त्यांची खरी ओळख होती. सर्वधर्मीय सामूहिक विवाह सोहळ्यांच्या माध्यमातून त्यांनी पाचशेहून अधिक नवदाम्पत्यांच्या आयुष्यात आनंदाचे क्षण पेरले. जाती-धर्माच्या भिंती पाडून त्यांनी माणुसकीचा सेतू उभा केला. कोरोना महामारीच्या अंधारात, जेव्हा माणूस माणसापासून दूर पळत होता, तेव्हा निलेश सोमाणी यांनी स्वतःचा प्लॉट विकून पंधरा हजारांहून अधिक गरजू लोकांपर्यंत धान्य, किराणा, कपडे, मास्क आणि सॅनिटायझर पोहोचवले. कोरोना काळात डॉक्टर आपल्या दारी हा उपक्रम भारतीय जैन संघटन यांच्या माध्यमातून राबवून हजारो लोकांना आधार दिला त्यांच्या आरोग्याची तपासणी व मोफत औषधीचे वितरण केले. ग्राम धनज बू येथे कोरोना काळात आयुर्वेदिक किट चे हजारो लोकांना किट वितरण , कष्टकरी महिलांना दर महिन्याला मोफत किराणा किट देण्यात आली.हा केवळ मदतीचा नव्हे, तर त्यागाचा इतिहास आहे. मुक्या जनावरांसाठी चारा वाटप, गेली पंधरा वर्षे पासून दररोज गायी ना ढेप वाटप, रस्त्यावरील कुत्र्यांना

> समाजसेवेत काही व्यक्ती बी पेरतात, काही रोप वाढवतात, तर काही माणसे काळाच्या ओघात वटवृक्ष बनतात. निलेश पुनमचंद सोमाणी हे असेच समाजसेवेतील वटवृक्ष आहेत. त्यांच्या आयुष्याचा प्रत्येक क्षण समाजासाठी वाहिलेला आहे. स्वतः झिजत गेले, पण इतरांना सावली देत राहिले हीच त्यांच्या कार्याची खरी ओळख आहे. गरिबी, संघर्ष आणि जबाबदाऱ्यांतून उभे राहिलेले हे व्यक्तिमत्त्व आज हजारो गरजूंसाठी आधारवड बनले आहे. त्यांच्या समाजसेवेच्या मुळांनी माणुसकी, समता आणि संवेदनशीलता घट्ट धरून ठेवली आहे. त्यांच्या फांद्यांवर गरिबांचे स्वप्न विसावतात, निराधारांना आश्वासक आधार मिळतो, तर त्यांच्या सावलीत समाजातील दुःखाला थोडा विसावा मिळतो.

बिस्कीट वाटप सोबत वेळोवेळी आरोग्य तपासणी शिबिर रक्तदान शिबिर जनजागृती अभियान मेळघाट येथील आदिवासी बांधवांना गत वीस वर्षापासून कपडे धान्य वाटप आरोग्य तपासणी शिबिर आयोजन केले. त्यांची करुणा माणसांपुरती मर्यादित राहिली नाही. वाशीम जिल्ह्यात शेकडो आरोग्य शिबिरांच्या माध्यमातून त्यांनी वयोवृद्ध, निराधार आणि वंचितांना मोफत वैद्यकीय सेवा उपलब्ध करून दिली. अनेक झोपड्यांमध्ये त्यांनी अंधार दूर करून प्रकाशाचा दिवा लावला. असंख्य गरिब विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देऊन त्यांनी त्यांच्या स्वप्नांना बळ दिले. अपंग आणि निराधार विद्यार्थ्यांना दत्तक घेऊन त्यांच्या शिक्षणापासून उदरनिर्वाहापर्यंतची जबाबदारी त्यांनी स्वतःच्या खांद्यावर उचलली.

रस्त्यावर अपघात झालेला जखमी माणूस पाहिला की त्यांनी कधीही मागे वळून पाहिले नाही. तात्काळ त्याला रुग्णालयात पोहोचवून उपचाराचा संपूर्ण खर्च उचलणे हे त्यांच्या आयुष्याचे रोजचे कार्य बनले. आईच्या स्मृतिप्रीत्यर्थ त्यांनी अनेक वेळा एक लाख रुपयांचे योगदान देऊन समाजकार्याला बळ दिले. भारतीय जैन संघटनेच्या माध्यमातून पाणी फाउंडेशन व नीती आयोग भारत सरकार महाराष्ट्र शासन व जिल्हा प्रशासन यांचा जलतारा उपक्रमांतर्गत चाळीस हजार खड्डे खोदून जलसंवर्धनाचा वर्ल्ड रेकॉर्ड घडवला. या कार्यात त्यांनी तनमन धनाने सक्रिय सहभाग नोंदविला गावोगावी प्रबोधनाच्या माध्यमातून लोकांना या कार्यामध्ये येण्यासाठी प्रवृत्त केले. हा विक्रम केवळ आकड्यांचा नाही, तर भावी पिढ्यांसाठी जपलेली आशा आहे. गत एकवीस वर्षापासून कडाक्याच्या थंडीत गरजवंतांना मायेची उब, तापत्या उन्हात पक्षांकरिता कुंडीमध्ये पाणी व आहाराची व्यवस्था करतात.

आज निलेश पुनमचंद सोमाणी हे नाव केवळ वाशीम जिल्ह्यात नाही, तर संपूर्ण महाराष्ट्रात आणि देशभरात आदराने घेतले जाते. कारण त्यांनी स्वतःसाठी नव्हे, तर समाजासाठी जगणे निवडले. त्यांचे आयुष्य म्हणजे संघर्षातून उमललेली सेवा, वेदनांतून जन्मलेली करुणा आणि विचारांतून घडलेली क्रांती आहे. अशी माणसे काळाच्या चौकटीत अडकत नाहीत; ती काळालाच दिशा देतात. निलेश सोमाणी यांचे कार्य हेच सांगते दुसऱ्यासाठी जगलेले आयुष्य कधीच संपत नाही, ते पिढ्यान्‌पिढ्या उजेड देत राहते. अनेक जुन्या मंदिराचा जिर्णोद्धार करण्यातही त्यांनी पुढाकार घेतला धार्मिक कार्यात सदैव अग्रेसर असतात श्रीमद् भागवत कथा शिव महापुराण हनुमान कथा रामायण आदी अनेक कार्यामध्ये त्यांचा सक्रिय सहभाग असतो आजपर्यंत देशभरात 2000 पेक्षा अधिक व्याख्यानाच्या माध्यमातून हजारो तरुणांना त्यांनी देशभक्तीचे व संस्काराचे स्वाभिमानाचे धडे दिले आहे त्यांनी कधीही याकरिता पैसे घेतले नाही ज्ञानाचा खरा अर्थ हा लोकांपर्यंत पोहोचणे जरुरी आहे हीच त्यांची शिकवण आहे. संपूर्ण देशात स्वाभिमान तरुण क्रांती यात्रा त्यांनी काढून स्वच्छता बेटी बचाव बेटी पढाव आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना मदत आदिवासी निराधार यांना मदत व्यसनमुक्ती मार्गदर्शन आदी कार्य या यात्रेच्या माध्यमातून करण्यात आले, बेघर निवारा केंद्र दिव्यांग केंद्र वृद्धाश्रम अशा अनेक उपक्रमात सामाजिक बांधिलकीतून त्यांनी पुढाकार घेऊन मदत केली आहे. महाराष्ट्र शासन व देशाचे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी प्रतापराव जाधव यांनी केंद्र शासनाला पद्म पुरस्कारा करीत आहे त्यांच्या नावाची शिफारस केली आहे हीच त्यांच्या कार्याची खरी पावती आहे. त्यांच्या या सर्व कार्यात त्यांच्या पत्नी एडवोकेट सो भारती सोमानी सक्रियपणे सहभागी होतात त्यांनाही शासनाचा प्रतिष्ठेचा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कार समवेतअनेक पुरस्कार मिळाली आहे पत्रकारिता क्षेत्रात त्याही त्यांच्या खांद्याला खांदा लावून कार्य करीत आहे दैनिक तरुण समता वाणी यांच्या मुख्य संपादक व दैनिक लोकशाही वार्ता यांच्या जिल्हा प्रतिनिधी म्हणून त्या कार्यरत आहेत त्यांच्या प्रत्येक सामाजिक कार्य व चळवळीत त्यांचा सक्रिय सहभाग असतो. आज त्यांच्या कार्याला सामाजिक पाठबळ परिवाराचे पाठबळ मित्रपरिवारांचे पाठबळ दानदात्याचे पाठबळ मिळत आहे त्यामुळेच हा समाजसेवा कार्याचा सेतू मोठा आकार घेत आहे. आईची पुण्याई व आशीर्वाद हीच त्यांची खरी ताकद आहे.

# VISTA 2K26 दुअथलॉन व मॅरेथॉन स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

पुणे: (समर्थ गांवकरी)

साईबालाजी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स यांच्या वतीने आयोजित VISTA 2K26 – द ऑलिम्पिक डिस्टन्स दुअथलॉन व मॅरेथॉन स्पर्धेला स्पर्धकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. हिंजवडी येथील मेझ्झा ९ येथे पहाटे ६.३० वाजल्यापासून सुरू झालेल्या या क्रीडा महोत्सवात तब्बल १००० हून अधिक स्पर्धकांनी सहभाग नोंदवत कार्यक्रमाला मोठे यश मिळवून दिले. महाविद्यालयीन फेस्टमध्ये आयोजित करण्यात आलेली ही ऑलिम्पिक डिस्टन्स दुअथलॉन स्पर्धा विशेष ठरली. स्पर्धेत ५ किमी धावणे, ४० किमी सायकलिंग आणि १० किमी धावणे असे तीन आव्हानात्मक टप्पे होते. याशिवाय ५ किमी व १० किमी मॅरेथॉन आणि साईबालाजी पब्लिक स्कूलच्या सहकार्याने १.५ किमी 'फन रन' चेही आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेचे वैशिष्ट्य म्हणजे




अत्याधुनिक आरएफआयडी ट्रॅकिंग प्रणालीचा वापर. प्रत्येक स्पर्धकाच्या बिबवर आरएफआयडी चिप बसविण्यात आल्यामुळे धावपटूंची सुरुवात, प्रत्येक टप्प्यावरील वेळ आणि अंतिम वेळ अचूकपणे नोंदवली गेली. त्यामुळे मानवी चुका टळल्या आणि निकाल प्रक्रिया जलद व पारदर्शक झाली. सहभागी स्पर्धकांना अधिकृत बिब टाइम सर्टिफिकेटही देण्यात आले.

विद्यार्थी, व्यावसायिक खेळाडू, आयटी क्षेत्रातील कर्मचारी आणि फिटनेसप्रेमी नागरिकांनी मोठ्या उत्साहात सहभाग घेतला. विजेत्या स्पर्धकांना आकर्षक रोख पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. या उपक्रमाचा मुख्य उद्देश युवकांमध्ये फिटनेस, शिस्त, सहनशक्ती आणि समुदाय सहभागाची भावना निर्माण करणे हा असल्याचे आयोजकांनी सांगितले. कार्यक्रम यशस्वीपणे पार पडल्याबद्दल सर्व सहभागी, स्वयंसेवक आणि सहकार्य करणाऱ्या संस्थांचे आयोजकांनी आभार मानले. संस्थापक अध्यक्ष प्रा. मनीष मुंदडा यांनी सांगितले की, "डुअथलॉन हा केवळ क्रीडा उपक्रम नसून युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रेरणादायी व्यासपीठ आहे. भविष्यातही अशा उपक्रमांद्वारे समाजात आरोग्य व फिटनेसविषयी जागरूकता निर्माण करण्याचा आमचा प्रयत्न राहील." सचिव प्रा. निरूपमा मुंदडा यांनी विजेत्यांचे अभिनंदन करत आयोजकांच्या प्रयत्नांचे कौतुक केले. या स्पर्धेच्या यशामुळे साईबालाजी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सने उत्कृष्ट आयोजन क्षमता पुन्हा सिद्ध केली असून पुण्यातील क्रीडा संस्कृतीला नवी उभारी मिळाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. डुअथलॉन विजेते पुरुष गटामध्ये १) सापन पांचाल, ईश्वर पाटील, क्षेतमयूम कबिदाश तर डुअथलॉन विजेते महिलामध्ये १) ऐश्वर्या दुधाडे, २) साक्षी पांडे, ३) किरणाक्षी राजपूत यांनी आपली मोहोर उमटवली

# ४७ वर्षांनंतर कमल हासन आणि रजनीकांत एकत्र

पुणे : (समर्थ गांवकरी)

रेड जायंट मूव्हीजच्या आगामी चित्रपट 'KHxRK' मुळे भारतीय चित्रपटसृष्टी एक ऐतिहासिक क्षण अनुभवणार आहे. या चित्रपटाच्या माध्यमातून भारतीय सिनेमातील दोन सर्वात मोठे आणि प्रतिष्ठित दिग्गज कमल हासन आणि रजनीकांत, तब्बल 47 वर्षांनंतर पुन्हा एकत्र पडद्यावर झळकणार आहेत. उल्लेखनीय बाब म्हणजे या दोन्ही महान कलाकारांनी शेवटचे एकत्र काम 1970 च्या दशकात केले होते. जवळपास पाच दशकांनंतर त्यांचे पुन्हा एकत्र येणे हे भारतीय चित्रपट इतिहासातील अत्यंत महत्त्वाच्या घटनांपैकी एक मानले जात आहे. कारण हा चित्रपट अशा दोन वारशांचा संगम आहे, ज्यांनी केवळ भारतातच नव्हे तर जागतिक स्तरावरही पिढ्यान्‌पिढ्या प्रेक्षकांवर खोल प्रभाव टाकला आहे.



सध्या या चित्रपटाची निर्मिती रेड जायंट मूव्हीज करत आहे. या दोन सिनेमाई दिग्गजांना एकत्र आणण्याचे स्वप्न या प्रोडक्शन हाऊसने साकार केले आहे. विशेष म्हणजे, या चित्रपटाकडे भव्यता, वारसा आणि उत्कृष्ट कथाकथनाचा उत्सव म्हणून पाहिले जात आहे.

या ऐतिहासिक क्षणाबद्दल रेड जायंट मूव्हीजच्या एका प्रवक्त्याने सांगितले, "कमल हासन सर आणि रजनीकांत सर यांना या चित्रपटासाठी एकत्र आणणे हे आमच्यासाठी स्वप्नपूर्तीप्रमाणे आहे. या ऐतिहासिक क्षणाचा भाग होण्याचा आम्हाला अभिमान, कृतज्ञता आणि प्रचंड उत्साह वाटतो. हा भारतीय सिनेमासाठी भावनिक आणि ऐतिहासिक क्षण आहे. त्यांच्या अतुलनीय योगदानाचा आणि वारशाचा सर्वोत्तम पद्धतीने सन्मान करणे, हाच आमचा उद्देश आहे."

या चित्रपटाचे दिग्दर्शन प्रसिद्ध दिग्दर्शक नेल्सन दिलीपकुमार करत आहेत.

त्यांनी नुकत्याच आलेल्या ब्लॉकबस्टर जेलर मुळे प्रचंड यश मिळवत स्वतःला देशातील आघाडीच्या कमर्शियल दिग्दर्शकांमध्ये स्थान मिळवून दिले आहे. चित्रपटाचे संगीत सुप्रसिद्ध संगीतकार अनिरुद्ध रविचंदर यांनी दिले आहे, ज्यांचे संगीत अनेक ब्लॉकबस्टर चित्रपटांना नव्या उंचीवर घेऊन गेले आहे.

कमल हासन आणि रजनीकांत यांच्या दमदार अभिनयाने सजलेला 'KHxRK' हा चित्रपट तमिळ, तेलुगू आणि हिंदी अशा तीन भाषांमध्ये भव्य स्वरूपात प्रदर्शित होणार आहे.

चित्रपटाशी संबंधित इतर तपशील सध्या गुप्त ठेवण्यात आले असून, योग्य वेळी अधिकृतरीत्या जाहीर केले जातील. मात्र एवढे निश्चित आहे की 'KHxRK' भारतीय चित्रपटसृष्टीच्या इतिहासात एक अविस्मरणीय अध्याय जोडणार आहे.

# नमाज पठणासाठी मुस्लिम बांधवांची मोठी गर्दी

राजगुरुनगर : (समर्थ गांवकरी)

मुस्लिम धर्मीयांचा पवित्र असा रमजान महिन्यास प्रारंभ झाला असल्याने ,रमजानमुळे शहरातील विविध मशिदीतून नमाज पठणासाठी मुस्लिम बांधवांची मोठी गर्दी दिसून येत आहे. मुस्लिम धर्मात रमजान महिन्याला अत्यंत महत्त्व आहे. रमजान मुळे मुस्लिम समाजामध्ये सध्या आनंदाचे आणि भक्तीमय वातावरण निर्माण झाले आहे. चंद्रदर्शन होताच पहिल्या उपवासाला (रोजा) सुरुवात होते. सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत उपवास पाळला जातो. या काळात प्रत्येक मुस्लिम कुटुंबात भक्ती, संयम आणि प्रसन्नतेचे वातावरण निर्माण झालेले दिसते.

तीस दिवसांच्या या रमजान महिन्यात मुस्लिम बांधव उपवास बरोबर नमाज, विशेष नमाज आणि कुरआन पठण करत आध्यात्मिक दृष्ट्या परमेश्वराच्या उपासना करत असतात. उपवास म्हणजे केवळ अन्नत्याग नव्हे, तर मन, वाणी आणि कृतीतूनही शुद्धता राखणे, सतत ईश्वराची आठवण ठेवणे आणि नामस्मरण करणे याला अधिक महत्त्व आहे. उपवासाच्या काळात पहाटे सहरी (उपवास सुरू करण्याची वेळ) आणि सायंकाळी इफ्तार (उपवास सोडण्याची वेळ) मशिदीतून जाहीर केली जाते. रोजच्या धावपळीच्या जीवनातून वेळ काढून मुस्लिम बांधव दिवसातून पाच वेळा नमाज अदा करतात. रमजानला इतर महिन्यांचा "सरदार" असेही संबोधले जाते रमजान हा संयम, त्याग, दानधर्म आणि बंधुभाव यांचा संदेश देणारा पवित्र महिना असल्याने रमजान महिन्यात पुण्यप्राप्तीसाठी उपवास, नमाज आणि कुरआन पठणासोबतच आर्थिक उपासनेलाही महत्त्व आहे.

# इस्टिमेटमध्ये नामांकित 'गजाळी'; प्रत्यक्षात हलक्या दर्जाची?

वसमत : (समर्थ गांवकरी)

नव्या बसस्थानकाच्या बांधकामात आणखी एक मुद्दा पुढे आला असून इस्टिमेटमध्ये नमूद केलेल्या गजाळीच्या (लोखंडी जाळी/स्टील रिइन्फोर्समेंट) दर्जाबाबत प्रश्न उपस्थित झाले आहेत. कागदोपत्री नामांकित व मानक ब्रँडची गजाळी वापरण्याचा उल्लेख असताना प्रत्यक्ष साइटवर हलक्या दर्जाचे साहित्य टाकल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

आरसीसी कामात गजाळी हा मजबुतीचा कणा मानला जातो. त्यामुळे इस्टिमेटमधील स्पेसिफिकेशन आणि प्रत्यक्ष वापर यामध्ये तफावत असेल, तर त्याची गंभीर दखल घेणे आवश्यक असल्याचे जाणकारांचे मत आहे. संबंधित साहित्याची बिले, ब्रँड प्रमाणपत्रे आणि गुणवत्ता




तपासणी अहवाल सार्वजनिक करावेत, अशी मागणी होत आहे.

मुख्य स्लॅब नुकताच टाकण्यात आल्याने याच टप्प्यावर तपासणी करावी, अशीही अपेक्षा व्यक्त केली जात आहे. कोर कटिंग, लॅब चाचणी व स्टील ग्रेड तपासणी करून प्रत्यक्षात कोणत्या दर्जाची गजाळी वापरण्यात आली, हे स्पष्ट करावे, अशी मागणी आहे.

दरम्यान, कामाच्या देखरेखीची जबाबदारी असलेल्या अभियंते व संबंधित अधिकाऱ्यांची भूमिका काय, याबाबतही प्रश्न उपस्थित होत आहेत. इस्टिमेटमधील मानक ब्रँडऐवजी अन्य साहित्य वापरण्यास परवानगी कोणी दिली, याची चौकशी व्हावी, अशी मागणी पुढे येत आहे.

सार्वजनिक निधीतून उभारल्या जाणाऱ्या या प्रकल्पात पारदर्शकता राखली जावी व सर्व गुणवत्ता अहवाल जनतेसमोर मांडावेत, अशी नागरिकांची अपेक्षा आहे. प्रशासनाने याबाबत लवकरात लवकर स्पष्ट भूमिका घ्यावी,

### साहित्य बदलाचा आरोप

सिमेंट : इस्टिमेटमध्ये स्टँडर्ड/नामांकित कंपनीचा उल्लेख; प्रत्यक्षात दुसऱ्याच कंपनीचे सिमेंट वापरल्याची चर्चा.

वाळू : इस्टिमेटमध्ये "धुतलेली वाळू" नमूद; प्रत्यक्षात डस्टचा वापर होत असल्याचा आरोप.

गजाळी : इस्टिमेटमध्ये ब्रँडेड व विशिष्ट ग्रेड; प्रत्यक्षात वेगळ्या ब्रँडचे साहित्य वापरल्याचा संशय.

अशी मागणी जोर धरत आहे.

संशय काय?

खर्चात बचत करून आर्थिक फायदा साधण्याचा प्रयत्न झाला का?

अल्पकालीन बचत दीर्घकालीन धोका ठरणार का?

तज्ज्ञांच्या मते, आरसीसी संरचनेतील मूलभूत साहित्य बदलल्यास भविष्यात तडे जाणे, मजबुती कमी होणे किंवा देखभाल खर्च वाढणे यासारखे परिणाम संभवतात. त्यामुळे स्वतंत्र तृतीय-पक्षीय गुणवत्ता तपासणी करणे अत्यावश्यक ठरते.

सार्वजनिक निधीतून उभारल्या जाणाऱ्या या प्रकल्पात पारदर्शकता राखली जावी व सर्व गुणवत्ता अहवाल जनतेसमोर मांडावेत, अशी नागरिकांची अपेक्षा आहे. प्रशासनाने याबाबत लवकरात लवकर स्पष्ट भूमिका घ्यावी, अशी मागणी जोर धरत आहे.

# वरोरा येथे पत्रकारांचे राज्यस्तरीय अधिवेशन उत्साहात संपन्न !

- महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरी संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांना जिवन गौरव पुरस्कार प्रदान!
- स्मॉल अँड मिडीयम न्यूज पेपर असोसिएशन तर्फे प्रभावी ठराव; पत्रकारांच्या समस्यांवर सखोल चिंतन!



**वरोरा: (समर्थ गांवकरी)**

चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा नगर भवन सभागृहात स्मॉल अँड मिडीयम न्यूज पेपर असोसिएशन, महाराष्ट्र राज्य तर्फे पत्रकारांचे एक दिवशीय राज्यस्तरीय खुले अधिवेशन भव्य आणि दिमाखात पार पडले. पत्रकारांच्या सामाजिक, आर्थिक आणि व्यावसायिक प्रश्नांवर सखोल चर्चा होऊन विविध ठराव मांडण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थापक अध्यक्ष उत्तम वाडकर होते, तर उद्घाटक म्हणून ज्येष्ठ संपादक मारोती घुमे उपस्थित होते. प्रमुख अतिथी म्हणून वरोरा नगराध्यक्षा अर्चना ठाकरे, शिवसेना चंद्रपूर-वणी-आर्णी लोकसभा संघटक मुकेश जिवतोडे, राष्ट्रीय सचिव ईश्वरसिंग शेंगर, राष्ट्रीय कार्याध्यक्ष योगेश तुरेराव, प्रदेश अध्यक्ष संतोष धरमकर, पत्रकार संरक्षण समितीचे प्रदेशाध्यक्ष विनोद पात्रे, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे, तसेच राज्य सचिव आशिष घुमे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर उपस्थित मान्यवरांनी काल, आज आणि उद्याची पत्रकारिता या विषयावर मार्गदर्शन केले. नगराध्यक्षा अर्चना ठाकरे यांनी पत्रकार संघाच्या उपक्रमांचे कौतुक करत, पत्रकार समाजातील वास्तव मांडतात; त्यांच्या निष्ठेमुळेच लोकशाहीचे अस्तित्व टिकून आहे, असे गौरवोद्गार काढले. शिवसेनेचे लोकसभा संघटक मुकेश जिवतोडे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. ते म्हणाले की, पत्रकार हे समाजाचे सजग प्रहरी आहेत. अन्याय, भ्रष्टाचार आणि अंधारात झाकलेल्या सत्याला प्रकाशात आणण्याचे धैर्य त्यांच्यात आहे. आजच्या काळात प्रामाणिक पत्रकारितेला अनेक अडचणी आहेत, तरीही ती समाज परिवर्तनाची शक्ती आहे. शासनाने ग्रामीण पत्रकारांच्या प्रश्नांकडे गंभीरतेने पाहावे आणि त्यांना आवश्यक सुविधा द्याव्यात, असे मत त्यांनी मांडले. अधिवेशनात ग्रामीण आणि लघु वृत्तपत्रांना शासनमान्यता व आर्थिक साहाय्य मिळावे, यावर विशेष भर देण्यात आला. लघु वृत्तपत्रांना मुद्रण व कागदावरील जीएसटीमधून सूट मिळावी, ज्येष्ठ पत्रकारांच्या सन्मान निधीच्या अटी शिथिल कराव्यात, तसेच राजमाता जिजाऊ, अहिल्यादेवी होळकर आणि सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त राज्य शासनाकडून दर्शनी जाहिराती वितरित व्हाव्यात, अशी मागणी अधिवेशनातून करण्यात आली.

तसेच अधिस्विकृतीपत्र प्रक्रियेत ग्रामीण पत्रकारांना सुलभता मिळावी, शासनमान्य यादीत नसलेल्या वृत्तपत्रांना पुन्हा जाहिराती सुरू कराव्यात, पत्रकारांसाठी स्वतंत्र घरकुल योजना राबवावी, त्यांच्या मुलांना शिक्षण हक्क कायद्यात सवलती द्याव्यात, यूट्यब आणि डिजिटल माध्यमांना अधिकृत नोंदणी द्यावी, तसेच राज्य परिवहनच्या बससेवांमध्ये पत्रकारांना सवलती मिळाव्यात, अशा मागण्या करण्यात आल्या. माध्यम स्वातंत्र्यावर हक्कभंगासारख्या कारवायांमुळे निर्माण होणाऱ्या दडपशाहीविरोधात पत्रकारांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे संरक्षण करण्याची गरजही ठळकपणे अधोरेखित करण्यात आली. या सर्व ठरावांचे सादरीकरण आणि प्रास्ताविक योगेश तुरेराव यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन महादेव जबंगी (सोलापूर) यांनी केले, तर आभार प्रदर्शन संतोष धरमकर यांनी मानले. या अधिवेशनाने पत्रकारांच्या समस्यांकडे शासन आणि समाजाचे लक्ष वेधत, पत्रकारांच्या सन्मान, सुरक्षा आणि सामाजिक प्रतिष्ठेसाठी महत्त्वाचे पाऊल उचलले आहे.

### पुरस्कार सोहळा ठरला आकर्षणाचा केंद्रबिंदू

अधिवेशनाच्या समारोपावेळी राज्यातील कार्यक्षम पत्रकार आणि सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्यांचा सन्मान करण्यात आला.राज्यस्तरीय युवा पत्रकार पुरस्कार व्हॉइस ऑफ मीडिया डिजिटल विंगच्या प्रदेशाध्यक्ष अश्विनी पुरी यांना जाहीर झाला. जीवन गौरव पुरस्कार डॉ. विश्वास आरोटे (संपादक दैनिक समर्थ गावकरी), पंढरीनाथ बोकारे (ज्येष्ठ पत्रकार, नांदेड), राजू पाटील (संपादक दैनिक मनोगत व द रिंगण लाईव्ह, औसा), किशोर पाटील (संपादक दैनिक स्वराज्य तोरण, भिवंडी), रमाकांत साळुंके (संपादक साप्ताहिक सिद्धेश्वर संदेश, सोलापूर), ज्ञानेश्वर धुळे (संपादक साप्ताहिक कारंजा सामना), डॉ. मेहबूब मालाबोडी (डिपार्टमेंट एक्सप्रेस, कर्नाटक), विलासकुमार सिंधे (दैनिक हेज्जे गुरुटू, कर्नाटक), डॉ. सुरेश चिंचोळकर (साप्ताहिक बिरसा वार्ता, यवतमाळ), आनंद शुक्ला (साप्ताहिक जागरण, वर्धा) आणि श्याम ठेंगडी (दैनिक तरुण भारत, वरोरा) यांना देण्यात आला. तसेच देवदूत पुरस्कार वरोरा उपजिल्हा रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. प्रफुल खुजे यांना देण्यात आला.

## जिल्हा परिषद ठाणे आरोग्य विभागात अभिवादन



**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

स्वच्छता, समाजप्रबोधन आणि अंधश्रद्धा निर्मूलनाचा संदेश देणारे थोर समाजसुधारक संत गाडगे बाबा यांच्या जयंतीनिमित्त जिल्हा परिषद, ठाणे आरोग्य विभागात अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या प्रसंगी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे यांच्या हस्ते संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. आपल्या कार्यातून स्वच्छता हीच सेवा आणि जनजागृती हेच साधन या तत्त्वांचा पुरस्कार करणाऱ्या संत गाडगे बाबा यांच्या विचारांचा आजच्या काळात विशेष महत्त्व असल्याचे यावेळी उपस्थितांनी नमूद केले. कार्यक्रमास जिल्हा प्रकल्प व्यवस्थापक डॉ. अमोल बाग, सांख्यिकी विस्तार अधिकारी सुनिल खोळंबे, आरोग्य पर्यवेक्षक विक्रांत कांबळे, सुजित जाधव, आरोग्य सहाय्यक अमर तायडे, अनिरुद्ध लोध तसेच आरोग्य विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी स्वच्छता, आरोग्य जनजागृती व सामाजिक बांधिलकी या मूल्यांचे पालन करण्याचा संकल्प उपस्थितांनी व्यक्त केला. संत गाडगे बाबा यांच्या कार्याचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून आरोग्य विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध आरोग्य व स्वच्छता अभियानांना अधिक प्रभावीपणे पुढे नेण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

## नेत्ररोग व अस्थिरोग तपासणी शिबिरास प्रतिसाद

**राहुरी : (समर्थ गांवकरी)**

दि. १९ फेब्रुवारी २०२६ शिवजयंतीच्या निमित्ताने राहुरी येथील डॉ. रोकडे क्लिनिकतर्फे मोफत नेत्ररोग व अस्थिरोग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला राहुरी शहरासह तालुक्यातील उंबरे, ब्राम्हणी, मानोरी, वळण, मांजरी, टाळकीमिया, वांबोरी आणि बारागाव नांदूर या गावांमधून मोठ्या संख्येने रुग्णांनी उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या शिबिरामध्ये नेत्ररोग व अस्थिरोग तज्ज्ञ डॉक्टरांकडून रुग्णांची सविस्तर तपासणी करण्यात आली. तसेच रुग्णांना अल्पदरात चष्मे उपलब्ध करून देण्यात आले आणि आवश्यक औषधोपचाराबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

## कर्जत तालुका 'मनसे'च्या पदाधिकाऱ्यांची मांदळीत बैठक संपन्न !

**मिरजगाव : (समर्थ गांवकरी)**

कर्जत तालुक्यातील मांदळी येथे कर्जत तालुका महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक नुकतीच पार पडली. यावेळी मनसे पक्षाचे नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष अविनाश पालवे यांचा कर्जत तालुका महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने सत्कार करण्यात आला. याप्रसंगी जिल्हाध्यक्ष पालवे यांनी पक्षाचे ध्येय धोरणे, विविध विषयांवरती उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची महत्त्वाची बैठक मांदळी याठिकाणी पार पडली.

या बैठकीत आगामी काळातील संघटनात्मक बांधणी, जनहितार्थ कामे आणि पक्ष विस्ताराबाबत सविस्तर चर्चा यांसह विविध विषयांवर चर्चा करण्यात आली.



प्रत्येक कार्यकर्त्याचा उत्साह आणि पक्षाप्रती असलेली निष्ठा पाहून कर्जत तालुक्यात मनसेचे विचार घराघरांत पोहोचवून पक्षप्रमुख राज ठाकरे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली आपण सर्वजण एकजुटीने काम करण्यासाठी सज्ज आहोत, असे बैठकीत सांगण्यात आले.

यावेळी मनसेचे तालुकाध्यक्ष सचिन सटाले बोलताना म्हणाले, पुढील काळामध्ये जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका मनसे पक्ष पूर्ण ताकतीने लढवणार आहे. या बैठकीसाठी मनसेचे जिल्हाध्यक्ष अविनाशजी पालवे, जिल्हा उपाध्यक्ष निखिल जगधने, तालुकाध्यक्ष सचिन सटाले, तालुका उपाध्यक्ष आबासाहेब उघडे, विभाग प्रमुख बाबासाहेब बचाटे, मिरजगाव शहराध्यक्ष नितीन पिसे, मिरजगाव विभाग प्रमुख तुषार जाधव, लखन जंजिरे, राजेंद्र गायकवाड, अंबादास गांगर्डे, तुषार गिरमकर, संदीप गांगर्डे, अशोक गांगर्डे, राजेंद्र गांगर्डे, जनार्दन क्षीरसागर आदीसह महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते व मनसैनिक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ७ लाख २५ हजार रुपये अवैधरित्या रेती साठा जप्त

**नांदेड : (समर्थ गांवकरी)**

गोदावरी नदी पात्रातील अवैध रेती उपसा करून रेती साठवून ठेवणाऱ्या रेती माफियावर नांदेड ग्रामीण पोलीसांनी छापा कारवाई करुन एकुण ७, २५, ०००/- रुपयाचा मुद्देमाल जप्त केला असुन या केलेल्या कार्यवाहीची नोंद घेऊन वरीष्ठ अधिकारी यांनी अभिनंदन केले आहे. अबिनाश कुमार पोलीस अधीक्षक नांदेड यांनी ऑपरेशन फ्लश आऊट अंतर्गत अवैधरित्या गौण खनिज (रेती) उपसा व वाहतुक करणाऱ्या लोकांवर कारवाई करणे बाबत सर्व पोस्टे प्रभारी अधिकारी यांना आदेशित केले आहे.



त्या अनुषंगाने ओमकांत चिंचोळकर, पोलीस निरीक्षक पो.स्टे. नांदेड ग्रामीण यांचे आदेशान्वये दिनांक २२ फेब्रुवारी रोजी वरील ग्रामीण पोलीस स्टेशन चे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोळकर, पो हे कॉ जाधव, पोकों आसीफ, पोकों जमीर

पो.स्टे. हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना ९ वाजता गोपनीय माहिती मिळाली की, विष्णुपुरी प्रकल्प जवळ असर्जन शिवारातील गोदावरी नदी पात्रात इंजीन व तराफेच्या सह्याने अवैध रेती उपसा करून साठवणुक होत असल्याची माहीती मिळाल्याने वरील अंमलदार असे विष्णुपुरी प्रकल्प जवळ असर्जन शिवारातील नदी पात्रात वेळ अंदाजे ११ वाजता छापा मारला असता नदी पात्रातुन तराफे व इंजीनच्या सह्याने रेती काढणारे दोन अनोळखी आरोपी पोलीसांना पाहुन पळुन गेले, सदर नदी पात्रात मिळुन आलेले वरील नमुद तराफे व इंजीन जागीच पंचा समक्ष जाळुन तोडुन नाश केले व नदी किनारी साठवून ठेवलेली रेती पंचा समक्ष जप्त करूण खाजगी वाहणाने पो.स्टे.ला घेऊन येऊन जमा केली आहे.दोन अनोळखी आरोपी विरूध्द कलम ३०३( २), ३( ५) भा. न्या.सं, सहकलम ४८ ( ७), ४८( ८) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम पर्यावरण संरक्षण अधिनियम कलम ९ व १५, सार्वजनिक संपती नुकसान प्रतिबंधक अधिनियम ३, ७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वरील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी केलेल्या कामगीरीचे नांदेड पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार, यांनी कौतुक केले आहे.

## ठाण्यात समूहगान कार्यक्रम

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

"हिंद दी चादर" म्हणून ओळखले जाणारे गुरु तेग बहादूर यांच्या ३५० व्या शहीदी समागमानिमित्त दि. २८ फेब्रुवारी व १ मार्च रोजी आयोजित कार्यक्रमांच्या पूर्वतयारीचा भाग म्हणून सरस्वती एज्युकेशन सोसायटीचे हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, पाचपाखाडी, ठाणे येथे दि. २३ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ९ वाजता विशेष समूहगान कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात सुप्रसिद्ध गायक सतिंदर सरताज यांनी गुरु तेग बहादूर यांच्या जीवनकार्यावर आधारित सादर केलेले प्रेरणादायी गीत शाळेतील विद्यार्थी, शिक्षक व कर्मचारी यांच्या सहभागातून सामूहिकरित्या गायन करण्यात आले. समूहगानातून गुरु तेग बहादूर यांच्या बलिदान, धर्मस्वातंत्र्य व मानवतेच्या मूल्यांची आठवण उपस्थितांना करून देण्यात आली.

## महात्मा फुले हायस्कूलच्या विद्यार्थ्यांची राज्य व राष्ट्रीय स्तरावर चमकदार कामगिरी

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**







नांदेड येथील महात्मा फुले हायस्कूलच्या तीन विद्यार्थ्यांनी कराटे व क्रिकेट या क्रीडा प्रकारात राज्य व राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय यश संपादन करत शाळेचा व जिल्ह्याचा गौरव वाढविला आहे. त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीमुळे राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली असून सर्वत्र त्यांचे कौतुक होत आहे. १४ वर्षांखालील शालेय राज्यस्तरीय कराटे स्पर्धात रुद्रराज नितीन पारदे याने राज्यातून प्रथम क्रमांक पटकावत भव्य यश मिळविले. त्याच्या या उल्लेखनीय कामगिरीच्या जोरावर इंदोर मध्यप्रदेश येथे होणाऱ्या शालेय राष्ट्रीय कराटे स्पर्धेसाठी त्याची निवड झाली आहे. तसेच १४ वर्षांखालील शालेय राज्यस्तरीय क्रिकेट स्पर्धेतील निवड चाचणीत अफान शेखानी याने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. नाशिक येथे झालेल्या निवड प्रक्रियेनंतर राजस्थान येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी त्याची निवड निश्चित झाली आहे. दरम्यान, युवराज दत्ता रामरूपे याची गतवर्षी केंडन्स या नामांकित क्रिकेट अकॅडमीत निवड झाली होती. सातत्यपूर्ण सराव व उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर त्याची निवड महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या महाराष्ट्र क्रिकेट संघात झाली. गुजरात येथे झालेल्या पाच राज्यांच्या स्पर्धेत त्याने दोन सामन्यात मॅन ऑफ द मॅच किताब पटकावत निवड समितीचे लक्ष वेधले. त्यानंतर मुंबई, गुजरात, बडोदा, सौराष्ट्र व महाराष्ट्र संघांसोबत विकेटकीपर व फलंदाज म्हणून वेस्ट झोन इंडिया संघाच्या कॅम्पसाठी त्याची निवड झाली आहे. महात्मा फुले हायस्कूलच्या या तिन्ही विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष, सचिव, मुख्याध्यापक व क्रीडा शिक्षकांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या यशामुळे शाळेच्या क्रीडा परंपरेत मानाचा तुरा रोवला गेला असून नांदेड जिल्ह्याच्या क्रीडा क्षेत्रात अभिमानाची भर पडली आहे.

## जेईई मेन्स परीक्षेत कामठ्याचा अयुष बरगळ चमकला



**कंधार : (समर्थ गांवकरी)**

नुकत्याच जाहीर झालेल्या जेईई मेन्स (JEE Mains) परीक्षेच्या निकालात कामठा येथील अयुष गणेश बरगळ याने ९९.५७ पर्सेनटाईल गुण मिळवून नेत्रदीपक यश संपादन केले. या यशाबद्दल महात्मा गांधी उच्च माध्यमिक विद्यालय मुदखेड चे गणित विषयाचे प्रा. डी. एस. मंगनाळे (फुलवळकर) व प्रा. डॉ. अरुण पाटील सर यांच्या हस्ते अयुषचा पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. अयुषच्या या यशाने कामठा गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. सत्कार प्रसंगी अयुषचे आई-वडील आणि आजोबा यांची उपस्थिती होती. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत सातत्यपूर्ण अभ्यास आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे हे यश मिळाल्याची भावना अयुषने व्यक्त केली. सध्या त्याच्यावर सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## आमदार डॉ. किरणजी लहामटे यांची स्नेहसंमेलनास प्रमुख उपस्थिती

### अपूर्ण रस्त्याच्या काँक्रीटीकरणाची ग्वाही

**लिंगदेव : (समर्थ गांवकरी)**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा फापाळेवाडी ,लिंगदेव येथे सांस्कृतिक कार्यक्रम व पारितोषिक वितरण स्नेहसंमेलन सोहळा उत्साहात पार पडला. कार्यक्रमास अकोले मतदारसंघाचे आमदार डॉ. किरणजी लहामटे यांनी प्रमुख उपस्थिती दर्शवून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच गावाच्या विकासाबाबत महत्त्वपूर्ण घोषणा केली.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या देशभक्तीपर नृत्य, नाटिका, व्यसनमुक्ती समूहगीत ,सामाजिक मराठी शाळा संबोधन गीत संदेश देणाऱ्या सादरीकरणांनी उपस्थितांची मने जिंकली. गुणवंत विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली. अंगणवाडीतील चिमुकल्यांनी सादर केलेल्या कार्यक्रमांचेही आमदार डॉ किरणजी लहामटे विशेष कौतुक केले. अंगणवाडी सेविकांच्या प्रयत्नांची त्यांनी प्रशंसा करत लहान वयातच संस्कार व गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. आपल्या भाषणात आमदार डॉ किरणजी लहामटे म्हणाले, "आजची चिमुकले हीच उद्याची देशाची भवितव्य आहेत. मुलांचा बौद्धिक विकास वयाच्या आठ वर्षांपर्यंत मोठ्या प्रमाणात होत असतो. त्यामुळे शिक्षकांनी विद्यार्थ्यांना दर्जेदार व संस्कारयुक्त शिक्षण द्यावे." युवकांनी निर्व्यसनी राहावे व चांगल्या विचारांच्या लोकांच्या पाठीशी उभे राहावे, असे आवाहनही त्यांनी केले. शाळेचा



सध्याचा विद्यार्थी पट १३ असला तरी पुढील वर्षी तो ३० पर्यंत वाढेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. गावातील व परिसरातील मुले या शाळेकडे आकर्षित होतील, शिक्षकांकडे बघून मला विश्वास पटला आहे.

फापाळेवाडी कडे जाणाऱ्या अपूर्ण राहिलेल्या रस्त्याबाबत बोलताना त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, "आपल्या गावात जसा धुपे रोड काँक्रीट झाला आहे, तसाच हा अपूर्ण राहिलेला रस्ताही काँक्रीटीकरण करून लवकरच पूर्ण करण्यात येईल." या घोषणेमुळे ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले. यावेळी मुख्याध्यापक भाऊसाहेब गोडसे सर यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. त्यांच्या वाढदिवसानिमित्त शाळेची रंगरंगोटी करून शाळा अधिक आकर्षक व सुशोभित करण्याचा निर्णय ग्रामस्थ, शिक्षकवर्ग व तरुण मंडळांच्या वतीने जाहीर करण्यात आला. समाजोपयोगी कार्यातून वाढदिवस साजरा करण्याच्या या उपक्रमाचे सर्वत्र स्वागत होत आहे. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक भाऊसाहेब गोडसे, भीमाशंकर हांडे, येडुमाता तरुण मित्रमंडळ, गणेश तरुण मित्रमंडळ तसेच लिंगदेव–फापाळेवाडी ग्रामस्थ यांनी विशेष परिश्रम घेतले. या प्रसंगी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे, कल्पना हरिभाऊ फापाळे (सदस्या ग्रामपंचायत लिंगदेव), आनंदा फापाळे निवृत प्राचार्य, सागर कातोरे (अध्यक्ष, बहुउद्देशीय सेवाभावी संस्था सांगवी), नानासाहेब फापाळे (व्यापारी वाशी मार्केट), तुषार फापाळे (व्यापारी वाशी मार्केट), आदिनाथ गोडसे (रुद्र ग्रुप), आदींनी विशेष योगदान दिले. या कार्यक्रम प्रसंगी डॉ.गणेश मोरे (अधिव्याख्याता राज्य शैक्षणिक संशोधन प्रशिक्षण परिषद, पुणे), देवेंद्र आंबेटकर (केंद्रप्रमुख, लिंगदेव), संभाजी झावरे (विस्तार अधिकारी, बीट लिंगदेव), कृष्णा फापाळे,मंगल गणेश पवार (कामगार पोलिस पाटील, लिंगदेव), बजरंग ढोकरे (उपसरपंच, लिंगदेव ग्रामपंचायत), कल्पना हरिभाऊ फापाळे (सदस्या, ग्रामपंचायत लिंगदेव), सदाशिव कानवडे (अध्यक्ष, ज्ञानगंगा वाचनालय), अक्षयजी आभाळे (तालुका अध्यक्ष, युवक राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी), कविराज भांगरे (तालुका सचिव, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, अकोले), प्रशांत बंदावणे (लोकनियुक्त सरपंच, रेडे ग्रामपंचायत), ह.भ.प. शांताराम महाराज पापळ, हरिभाऊ फापाळे (कार्याध्यक्ष, युवक राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अकोले), रोहित बर्वे, सचिन मंडलिक, गणेश पवार, दत्तू फापाळे (विश्वस्त, भगवान लिंगेश्वर देवस्थान लिंगदेव), सुदाम हांडे (विश्वस्त, भगवान लिंगेश्वर देवस्थान ट्रस्ट, लिंगदेव) देवदास फापाळे स्मार्ट इलेक्ट्रॉनिक संगमनेर,पत्रकार शुभम फापाळे, भाऊसाहेब हाडवळे विश्वस्त भगवान लिंगेश्वर देवस्थान ट्रस्ट आदी मान्यवर ,ग्रामस्थ, पालक व विद्यार्थी यांच्या मोठ्या उपस्थितीत स्नेहसंमेलन सोहळा उत्साहात संपन्न झाला.

# गणोरे येथे शिवजयंती उत्साहात

■ शिंदेवाडी शाळेत संरक्षक भिंत भूमिपूजन व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले वाचनालयाचे उद्घाटन!

**गणोरे : (समर्थ गांवकरी)**




छत्रपती शिवाजी महाराज यांनी मुघलांच्या अन्यायाविरोधात लढा देऊन हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. त्या काळातील समाजातील सर्व घटकांनी दाखविलेली निष्ठा, एकोपा आणि त्याग आजच्या पिढीने आत्मसात करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन अकोले तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी अरविंद कुमावत यांनी केले. तालुक्यातील गणोरे येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, शिंदेवाडी येथे आयोजित शिवजयंती उत्सव, शाळेच्या संरक्षक भिंतीच्या भूमिपूजन समारंभ आणि सावित्रीबाई फुले वाचनालयाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाला विस्तार अधिकारी अनिल गायकवाड, केंद्रप्रमुख सुनील घुले, सरपंच संतोष आंबरे, सोसायटीचे चेअरमन अशोक आहेर यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात राजमाता जिजाऊ वंदन व शिवप्रतिमेचे पूजन करून करण्यात आली.

यावेळी मार्गदर्शन करताना कुमावत म्हणाले की, शिक्षकांनी एकोप्याने आणि जिद्दीने काम केल्यास शैक्षणिक क्षेत्रात मोठा बदल घडू शकतो. शिंदेवाडी शाळेने अवघ्या चार महिन्यांत 'सीएसआर' निधी मिळवून विकासकामे हाती घेतली, ही अत्यंत कौतुकास्पद बाब आहे. संरक्षक भिंत, स्वच्छतागृह, वाचनालय आणि शैक्षणिक गुणवत्तेतील वाढ या गोष्टी इतर शाळांसाठी प्रेरणादायी ठरतील. येणाऱ्या काळात शिंदेवाडी शाळा अकोले तालुक्यातील 'वाबळेवाडी शाळा' म्हणून ओळखली जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

मुख्याध्यापिका वृषाली कडलग यांनी प्रास्ताविकात सांगितले की, मुंबई येथील उमंग फाउंडेशन तर्फे बिबट्यापासून संरक्षण मिळावे यासाठी संरक्षक भिंत बांधण्याकरिता 'सीएसआर' निधी मंजूर करण्यात आला आहे.

यावेळी गणोरे ग्रामपंचायतचे सरपंच संतोष आंबरे व ग्रामसेवक अशोक बलसाने यांनी शाळेला 'इंटरेक्टिव बोर्ड' देणगी जाहीर केला. तसेच रोटरी क्लब ऑफ संगमनेरचे चे माजी अध्यक्ष ऋषिकेश मोंढे यांनी स्टील कपाट, अमोल पानसरे यांनी भाषणासाठी पोडियम, तर शिक्षिका कल्पना पाटील यांनी काचफलक भेट दिला.

जिजाऊ ब्रिगेडच्या डॉ. दीपाली पानसरे, डॉ. श्रद्धा वाणी आणि साहित्यिक संतोष खेडलेकर यांनी नव्या वाचनालयासाठी पुस्तके भेट दिली. यावेळी शिवरायांची भव्य प्रतिमा साकारणारे चित्रकार राजेंद्र बागुल व संजय बागुल यांचा कुमावत यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाला पंचायत समिती सदस्य संत नामदेव आंबरे, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष अशोक आहेर, रयत शिक्षण संस्थेचे निमंत्रित सदस्य अंबादासजी दातीर यांच्यासह ग्रामपंचायत पदाधिकारी, सोसायटी संचालक, ग्रामस्थ व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. महिला वर्गातून अंगणवाडी सेविका शांताताई हांडे, माया मालुंजकर, उज्वला हांडे, मीनाक्षीताई हांडे, अनिता हांडे यांची उपस्थिती लक्षणीय होती.

# हिंद दी चादर या उपक्रमांतर्गत ठाण्यातील गुरुद्वारात आरोग्य शिबिर

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**



हिंद दी चादर या उपक्रमांतर्गत श्री गुरूतेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी समागमाच्या निमित्ताने आज ठाणे महानगरपालिका यांच्या वतीने ठाण्यातील गुरुद्वारात मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरास ठाणे महानगरपालिकेचे उपायुक्त उमेश बिरारी, सहाय्यक आयुक्त सोपान भाईक, माजी नगरसेवक गुरुमुखसिंग स्यान उपस्थित होते. हे आरोग्य शिबिर ठाण्यातील तीन हात नाका येथील द्रुतगती मार्गालगत असलेल्या गुरुद्वारात पार पडले. शिबिरामध्ये नागरिकांसाठी रक्तदाब तपासणी, मधुमेह तपासणी तसेच प्राथमिक आरोग्य तपासण्या करण्यात आल्या. गुरुद्वारा मध्ये येणाऱ्या सीख बांधवांचा या शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. सर्वसामान्य नागरिकांना आरोग्याबाबत जागरूक करणे व वेळेत तपासणी करून आजारांचे निदान व्हावे, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आल्याचे आयोजकांनी सांगितले. हिंद दी चादर या उपक्रमाच्या माध्यमातून सामाजिक, आरोग्यविषयक आणि जनजागृतीपर कार्यक्रम सातत्याने राबविले जात असून, अशा उपक्रमांमुळे समाजातील विविध घटकांना थेट लाभ मिळत असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

# चीरापाडा गावात शिकारीच्या शोधात निघालेला बिबट्या पिंजऱ्यात अडकला

**डांग : (समर्थ गांवकरी)**



डांग जिल्ह्यातील सीमावर्ती भागात गेल्या काही दिवसांपासून दहशत माजवणारा कर्दनकाळ बिबट्या अखेर वन विभागाच्या जाळ्यात अडकला आहे. आहवा तालुक्यातील चीरापाडा गावात लावण्यात आलेल्या पिंजऱ्यात हा शिकारी बिबट्या सुखरूपरीत्या जेरबंद करण्यात आला असून ग्रामस्थांनी सुटकेचा निश्वास टाकला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, या बिबट्याने चीरापाडा, भूरापाणी, शामगहान आणि बारीपाडा या गावांमध्ये वारंवार हल्ले करत आपला वावर वाढवला होता. तो केवळ रात्रीच नव्हे तर दिवसा देखील कोंबड्या आणि लहान जनावरांवर हल्ला करत असल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. ग्रामस्थांच्या सुरक्षेच्या दृष्टीने दक्षिण डांग वन विभागाचे डीसीएफ निरजकुमार यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाची स्थापना करण्यात आली होती. शामगहान रेंजचे आरएफओ चिरागभाई माछी, फॉरेस्टर महेशभाई भोये तसेच बीटगार्ड रविराजसिंह जाडेजा आणि मयूरसिंह चंपावत यांच्या पथकाने रणनीती आखत चीरापाडा गावाच्या हद्दीत पिंजरे लावले होते.गेल्या रात्री शिकारीच्या शोधात फिरत असताना बिबट्या आमिषाला भुलून पिंजऱ्यात शिरला आणि तत्काळ जेरबंद झाला. ही बातमी वाऱ्यासारखी पसरताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी गर्दी केली. वन विभागाच्या तत्पर कारवाईमुळे मोठी जीवितहानी टळली असून ग्रामस्थांनी वन विभागाच्या कार्याचे कौतुक केले आहे. सदर बिबट्याला आता सुरक्षित ठिकाणी हलवण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.



# गजानन रामभाऊ डोके यांचे निधन

**शिवनेरी : (समर्थ गांवकरी)**

कै. गजानन दादा रामभाऊ डोके रा. कुमशेत, वय वर्षे ८५ यांचे अल्पशा आजाराने निधन झाले आहे. यांच्या पाठीमागे पत्नी , दोन भाऊ , एक मुलगा , तिन मुली , जावाई , सुना , पुतणे , चुलते , नातवंडे असा मोठा परिवार आहे. गजानन दादा यांनी भगवंताचे नामस्मरण सातत्याने शेवटपर्यंत सुरू ठेवले . शेतात कष्ट करून परिवार घडविण्यात सिंहाचा वाटा आहे . मुलगा शंकर इलेक्ट्रॉनिक वेल्डिंगच्या उद्योग धंद्यामधून वडिलांचे नाव उंचवलेले आहे .

# "मन की बात" कार्यक्रम वरुड शहरात मोठ्या उत्साहात संपन्न

**वरुड (जि.अमरावती) : (समर्थ गांवकरी)**




देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या लोकप्रिय 'मन की बात' कार्यक्रमाचे आयोजन आमदार श्री. उमेश ऊर्फ चंदुभाऊ यावलकर यांच्या मार्गदर्शनाखाली वरुड शहरात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. सदरील कार्यक्रम हे वरुड नगर पालिकेचे नगरसेवक प्रविण वसंतराव सावरकर यांच्या निवासस्थानी परिसरातील नागरिकांनी एकत्र येत हा कार्यक्रम दूरदर्शनद्वारे पाहिला.

या कार्यक्रमाचे प्रमुख म्हणून प्रा. डॉ. सुमित सुरेशराव पवार (जिल्हा सरचिटणीस, भाजपा अमरावती जिल्हा ग्रामीण) यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून श्री. किरण भाऊ यावलकर हे प्रामुख्याने उपस्थित होते. बूथ क्रमांक १६२ अंतर्गत आयोजित या उपक्रमात अनेकांनी आपला सहभाग नोंदवला. बूथ प्रमुख म्हणून श्री. किरण नानारावजी सावरकर यांनी नियोजनाची जबाबदारी सांभाळली.

यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या मनोगतात विविध सामाजिक व विकासात्मक विषयांवर भाष्य करत कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) या आधुनिक तंत्रज्ञानाबाबत विशेष मार्गदर्शन केले. शिक्षण, शेती, आरोग्य, उद्योग व प्रशासन क्षेत्रात AI चा प्रभावी वापर कसा करता येईल, याबाबत त्यांनी सविस्तर माहिती दिली. तसेच तरुणांनी नवतंत्रज्ञान आत्मसात करून देशाच्या प्रगतीत सक्रिय योगदान द्यावे असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमानंतर उपस्थित नागरिकांमध्ये AI व डिजिटल भारत संकल्पनेवर चर्चा करण्यात आली.

या उपक्रमामुळे वरुड शहरात नवतंत्रज्ञानाबाबत सकारात्मक जागरूकता निर्माण झाल्याचे चित्र दिसून आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मंडळ पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. सर्व मंडळ अध्यक्षांनी आपल्या-आपल्या बूथवर कार्यक्रम आयोजित करून त्याची माहिती तात्काळ सादर करण्याचे आवाहन करण्यात आले. या वेळी प्रामुख्याने प्रा.डॉ. सुमित सुरेशराव पवार

जिल्हा सरचिटणीस, भाजपा अमरावती जिल्हा ग्रामीण, श्री. किरण यावलकर गटनेते, श्री. किरण सावरकर, रंजित माकोडे, पंकज मिरासे, तुषार खासबागे, पत्रकार निखिल बावणे, दिपक कठाणे, सौ. शिल्पा कठाणे, सौ. रश्मी किरण सावरकर, जगदिश गुळरांधे, आश्विनी माकोडे, शितल मिरासे, प्रल्हाद तायवाडे, नगरसेवक प्रविण सावरकर, सौ. निलम सावरकर यांच्यासह परिसरातील नागरीक व भाजपा कार्यकर्ते उपस्थित होते.

# डॉ. किशोर पाटील "जीवन गौरव" पुरस्काराने सन्मानित

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**



स्मॉल अॅन्ड मिडीयम न्यूज पेपर असोशियन, सिंधुदुर्ग यांच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय संपादक एकदिवसीय खुले अधिवेशनात ठाणे जिल्ह्यातील अग्रगण्य मराठी दैनिक स्वराज्य तोरण चे संपादक तथा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ,मुंबई चे प्रदेशाध्यक्ष (हल्ला विरोधी समिती) मा.डॉ. श्री.किशोर बळीराम पाटील यांना "जीवन गौरव पुरस्कार" चंद्रपूर जिल्ह्यातील वर्धा तालुक्यातील नगरपंचायत वरोरा च्या नगराध्यक्षा अर्चनाताई ठाकरे यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला. पत्रकारिता क्षेत्रातील दीर्घकालीन, उल्लेखनीय व निष्ठापूर्ण योगदानाची दखल घेत हा सन्मान त्यांना प्रदान करण्यात आला.पत्रकारितेच्या माध्यमातून समाजातील विविध प्रश्न, घडामोडी व लोकहिताचे विषय सत्य, निष्पक्ष आणि निःस्वार्थपणे मांडण्याचे कार्य संपादक डॉ.श्री.किशोर पाटील यांनी सातत्याने केले आहे. ग्रामीण भागातील सर्वसामान्यांच्या समस्या प्रशासनापर्यंत पोहोचविणे, सामाजिक प्रश्नांना वाचा फोडणे तसेच जनजागृतीची प्रभावी भूमिका बजावणे या त्यांच्या कार्याची स्मॉल अॅन्ड मिडीयम न्यूज पेपर असोसिएशन सिंधुदुर्ग यांनी राज्यस्तरावर दखल घेतली आहे. त्यांच्या कार्यामुळे समाजात जागरूकता निर्माण झाली असून नव्या पिढीतील पत्रकारांसाठी ते प्रेरणास्थान ठरले आहेत.

हा सन्मान सोहळा शनिवार, दि. २१ फेब्रुवारी २०२६ रोजी नगर भवन, हनुमान वॉर्ड, वरोरा, जि. चंद्रपूर येथे विविध मान्यवरांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या कार्यक्रमास राज्यभरातील पत्रकार, संपादक व विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. या निवडीबद्दल नगरपंचायत वरोरा च्या नगराध्यक्षा अर्चनाताई ठाकरे,संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष उत्तमराव वाडकर, राष्ट्रीय सचिव ईश्वरसिंह सेंगर, राष्ट्रीय कार्याध्यक्ष योगेश तुरेराव, राज्य अध्यक्ष संतोष धरमकर (महाराष्ट्र) तसेच राज्य सचिव आशिष घुमे (महाराष्ट्र), मानवसेवा हीच खरी ईश्वरसेवा ग्रुपचे प्रमुख, रस्ता सुरक्षा अभियान विभागीय समन्वय अधिकारी (नोडल ऑफिसर) डॉ.मनिलाल शिंपी,चंद्रानंद कृषी पणन संस्थेचे अध्यक्ष डी. यशवंत म्हात्रे, समाजसेवक उद्योजक डॉ रामचंद्र देसले, पोलिस पाटील तालुका प्रमुख श्री.सोमनाथ ठाकरे, भाजपा व्यापारी संघटनेचे अध्यक्ष समाजसेवक, उद्योजक डॉ.यशवंत सोरे( भाऊ), स्वामीनारायण हॉल चे संचालक डॉ.दिनेशभाई ठक्कर, रोटी डे ग्रुप चे डॉ.नितील चंदेया,डॉ. निलेश शहा, उद्योजक समाजसेवक रोटरी क्लब ऑफ डोंबिवली चे सदस्य डॉ.किशोर अढळकर, समाज कल्याण न्यासाचे संस्थापक अध्यक्ष डॉ.सोन्याभाऊ पाटील यांनी डॉ.श्री.किशोर पाटील यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात येत आहेत.

# पैठणचे प्रगतशील शेतकरी मारुती तळेकर यांचे निधन

**अकोले : (समर्थ गांवकरी)**



तालुक्यातील पैठण येथील प्रगतशील शेतकरी मारुती तुळशीराम तळेकर (वय 64) यांचे हृदयविकाराच्या तीव्र धक्क्याने नुकतेच निधन झाले. पैठण सारख्या दुर्गम भागात मारुती तळेकर यांनी शेतीत नवनवीन प्रयोग राबवले आणि एक प्रगतशील शेतकरी म्हणून ओळख निर्माण केली होती. त्यांच्या पश्चात पत्नी बायसा तळेकर, मुले शांताराम तळेकर व निलेश तळेकर, मुली सुवर्णा नितीन कोल्हे व प्रा. सुषमा गोरक्ष हासे, सुन, नातवंडे असा मोठा परिवार आहे. पैठण येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी मोठा जनसमुदाय उपस्थित होता.

# जिया काझी हिचा रमजानचा पहिला रोजा पूर्ण

**कर्जत : (समर्थ गांवकरी)**



मुस्लिम बांधवांच्या पवित्र असा रमजान महिन्याला नुकताच प्रारंभ झाला असून रमजान महिना हा पवित्र मानला जातो. या महिन्यात सर्व मुस्लिम बांधव रमजानचे उपवास म्हणजेच रोजा ठेवत असतात.

परंतु कडक उन्हाळा सध्या सुरू असताना देखील पवित्र रमजान महिन्यात आपल्या जीवनाचा पहिला रोजा पूर्ण करून कर्जत येथील रहिवासी जिया जावेद काझी या अवघ्या सात वर्षाच्या चिमुकलीने रविवारी आपल्या जीवनातला रमजानचा पहिला रोजा अत्यंत श्रद्धेने आणि जिद्दीने पूर्ण केला आहे.

पहाटे सकाळी ५.३६ वाजता 'सहेरी' करत जिया काझी या चिमुकलीने आपल्या उपवासाला सुरूवात केली होती.

दिवसभर कडक ऊन आणि तहान, भूक असूनही तिने लहान वयात जिद्दीने आपला रोजा पूर्ण केला.

सध्याचे तापमान आणि रखरखत्या उन्हाळ्यात पहाटे ५.३६ ते सायंकाळी ६.३७ वाजेपर्यंत अन्नाच्या एक कण आणि पाणीच्या आधारावर उपाशी पोटी राहून तिने (अल्लाह) ईश्वर प्रती आपली श्रद्धा व्यक्त केली.

रमजानच्या चौथ्या रोजा दिवशी जिया हिने संध्याकाळी इफ्तारच्या वेळी कुटुंबासोबत आपला हा आयुष्यातील पहिला रोजा सोडला. नंतर नमाज पठण करून भारत देशातील सर्व देश बांधवांच्या आरोग्यासाठी अल्लाहला दुआँ करत या चिमुकलीने साकडे घातले.

या चिमुकलीने एवढ्या लहान वयात आपल्या जीवनाचा रमजानचा पहिला रोजा पूर्ण केल्याबद्दल आणि दाखवलेली शिस्त आणि भक्ती पाहून परिसरातून सर्वत्र तिचे भरभरून कौतुक होत आहे. जिया ही चिमुकली कर्जत येथील भारतीय जनता पार्टीचे अल्पसंख्याक शहराध्यक्ष जावेद (खतू) सलिम काझी यांची मुलगी आहे.

# पट्टा किल्ल्याच्या पायथ्याशी महा आरोग्य शिबीर संपन्न

■ सहयाद्री कोळी सांदण परिवाराच्यावतीने आयोजन

**अकोले : (समर्थ गांवकरी)**

विश्रामगड (पट्टा किल्ला) ता. अकोले येथे सहयाद्री कोळी महादेव सांदण परिवाराच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निर्मीत्त महा आरोग्य शिबीर संपन्न झाले. सांदण परिवाराच्यावतीने आयोजित महाआरोग्य शिबीराचे उद्घाटन आमदार डॉ. किरणजी लहामटे यांच्या हस्ते करण्यात आले. सांदण परिवार सामाजिक जाणीवेतून प्रत्येक वर्षी वर्षभर सामाजिक उपक्रम राबवित असतो, यामध्ये शालेय विद्याथ्याना शैक्षणिक साहित्य वाटप, विवीध ठिकाणी वृक्षारोपन आरोग्य शिबीरे, मार्गदर्शन मेळावे यासह विवीध सामाजिक उपक्रम राबवित असते त्याचप्रमाणे वेळेवेळी आदिवासी समाज बांधणीचे कार्य करत असते. त्याचाच एक भाग म्हणून छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमीत्ताने अर्पन खतपेढी संगमनेर, एस एम बी टी हॉस्पीटल व प्राथमिक आरोग्य केंद्र खिरविरे, समता फौंडेशन मालपाणी उयोगसमुह यांच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य शिबीर घेण्यात आले यामध्ये सर्व रोग निदान व तपासणी, रक्तदान शिबीर व नेत्र तपासणी करण्यात आली यावेळी परिसरातील राहीवासी यांनी वेगवेगळ्या तपासण्या करून घेतल्या. ग्रामीण भागात अशा आरोग्य शिबीरांची नितांत गरज आहे त्यामुळे या शिबीरास मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला. सदर शिबीरास माजी पोलीस अधिक्षक मधुकर तळपाडे, युवा नेते सतिश भांगरे, आदिवासी विकास परिषदेचे युवा राष्ट्रीय अध्यक्ष लकी जाधव यासह परिसरातील शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भाजप सरकारच्या काळात हिंदू सुरक्षित आहेत का?

## देळुबमध्ये जमावाचा हैदोस; एका समाजाला लक्ष्य केल्याचा आरोप

**अर्धापूर : (समर्थ गांवकरी)**

राज्यात भारतीय जनता पक्षाचे (महायुती) सरकार असताना आणि हिंदुत्वाच्या मुद्द्यावर राजकारण तापलेले असतानाच, अर्धापूर तालुक्यातील देळुब बु. येथे एका विशिष्ट समाजाच्या तरुणाला घरात घुसून मारहाण करण्याची खळबळजनक घटना घडली आहे. गोवंश कापल्याचा व्हिडिओ का बनवला, या कारणावरून ५९ जणांच्या बेकायदेशीर जमावाने एका हिंदू तरुणाच्या घरावर हल्ला करत तोडफोड केली. राज्यात भाजपची सत्ता असतानाही एका समाजावर असा अन्याय होत असल्याने संताप व्यक्त केला जात आहे. फिर्यादी स्वप्निल आनंद बोंढारे (२४) याने गोवंश हत्येचा व्हिडिओ बनवल्याचा राग मनात धरून, आरोपींनी त्याला मशिदीसमोर बोलावून घेतले. तिथे त्याला अश्लील शिवीगाळ करत "कापून फेकून देण्याची" धमकी देण्यात आली. हा वाद केवळ शब्दांपुरता मर्यादित राहिला नाही; तर स्वप्निल मंदिरातून परतत असताना त्याच्यावर दगडफेक करण्यात आली आणि जमावाने चक्क त्याच्या घरात शिरून सामानाची नासधूस केली. राज्यात भाजप सत्तेत असताना एका हिंदू तरुणाला अशा प्रकारे लक्ष्य केले जाणे, हे कायदा आणि सुव्यवस्थेचे धिंडवडे काढणारे आहे. "एका समाजावर अन्याय" होत असल्याची भावना स्थानिक नागरिकांमध्ये पसरली आहे. या प्रकरणी गावाच्या सरपंचासह (अजहरखान पठाण) ५९ जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. भाजपच्या 'राज्यात' धर्मांध शक्तींना इतके बळ कोठून मिळते, असा सवाल आता विचारला जात आहे.

या प्रकरणी भारतीय न्याय संहितेच्या कलम ३३३, ३२४(४), १२५ सह अन्य कलमान्वये गुन्हे दाखल करण्यात आला असून गावात सध्या तणावपूर्ण शांतता असून मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

दगडफेक आणि घरात घुसून तोडफोड, परिसरात भीतीचे वातावरण गावातील वातावरण शांत ठेवण्याचे आवाहन पोलिसांनी केले असले, तरी एका समाजावर झालेल्या या थेट हल्ल्यामुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

तर या घटनेचे सर्व स्तरातून निषेध केला जात आहे.

खालील ५९ जणांवर गुन्हा दाखल : १) चांदपशा पटेल २) एजाज पटेल ३) आवेस पटेल ४) फिरोज चॉदपाशा पटेल ५) सादमियाखान पटेल ६) एहसान पटेल ७) शकील शमसुर शेख (कासार) ८) अब्दुल शेख (कासार) ९) जुनेद उर्फ नियाजअली सरदारखान पठाण १०) खाजा शमसुर शेख (कासार) ११) जमात पटेलमिया खान १२) जाजिब रईसखान पठाण १३) अलीयाब शकीलखान पठाण १४) बिलाल खान पठाण १५) मुसेब गौस पटेल १६) अजहरखान पठाण (सरपंच देळुब बु.) १७) माजीतखान सत्तार खान पठाण १८) दुजान पठाण १९) इमरोज चांदपाशा पटेल २०) जुबेर पाशा शेख २१) अमेर पाशा शेख २२) सुमेर पाशा शेख २३) पाशा बशिर शेख २४) मौलाना फजीलीदखान अजमदखान पठाण २५) लदिम पठाण २६) ईरशाद पठाण २७) फैजान मोईनखान पठाण २८) ईक्राम मोईनखान पठाण २९) नवाज पठाण ३०) सरोवर महबूब कुरेशी ३१) सुलतान महबूब कुरेशी ३२) इस्माईल मौला कुरेशी ३३) शफी मौला कुरेशी ३४) इमाम मेहबूब कुरेशी ३५) जिलानी कुरेशी ३६) मलिक पठाण ३७) अतिफ एजाज शेख (कासार) ३८) आतिक (कासार) ३९) सुलेमान अजगरमिया ४०) शेख अजीम शेख पाशा ४१) तंजिम पाशा पठाण ४२) हाफिज सत्तार शेख ४३) सुलेखान सादेखान पठाण ४४) शेख सुफी शेख मन्नु ४५) शेख खयुम शेख नूरमिया ४६) मुबिन हबीब कुरेशी ४७) जुबेर पाशा शेख ४८) रईस खान शेरखान पठाण ४९) एजाज कासार ५०) ईद्रीसखान पठाण ५१) आवेसखान पठाण ५२) सोयब गौसखान पठाण ५३) रौफ वैदोद्दीन काजी ५४) गौस तादंनशहा ५५) शेख ऐजाज शेख महेबुब ५६) पप्पु शकिल जहागीरदार ५७) शेख पाशा शेख वजीर ५८) अयुब करिम कासार ५९) फैज मस्तानखान पठाण सर्व रा. देळुब बु. ता. अर्धापूर

# बरबडा व सोमठाना या दोन केंद्रावर जिल्हाधिकारी कर्डीले यांची अचानक भेट



**नायगाव : (समर्थ गांवकरी)**

नायगाव तालुक्यातील सोमठाना येथील दिनानाथ मंगेशकर या शाळेत व बरबडा येथील जवाहरलाल नेहरू माध्यमिक विद्यालय बरबडा येथील परीक्षा केंद्रावर जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी अचानक भेट दिली नव्याने स्थापन झालेल्या सोमठाना येथील केंद्रावर परीक्षा सुरू होण्यापूर्वी धडक देत त्यांनी केंद्राजवळ भेटीसाठी आलेल्या संस्था चालक व मुख्याध्यापकांना समज देत बाहेर काढले आहे परीक्षा प्रक्रीयेत कोणतीही ढिलाई चालणार नाही असे स्पष्ट संदेश देण्यात आला आहे व बरबडा येथे जवाहरलाल नेहरू माध्यमिक विद्यालय येथे पेपर संपल्यानंतर जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी शाळा सोडले

गणित विषयाच्या पेपरसाठी २८१७ विद्यार्थी उपस्थितीत; ४१ विद्यार्थी अनुपस्थित नायगाव परिक्षक कार्यालय सीयू-२१८ अंतर्गत १२ वी विज्ञान शाखेचा गणित विषयाचा पेपर दि. २१ फेब्रुवारी २०२६ रोजी शांततेत पार पडला. या केंद्रावर एकूण २८५८ विद्यार्थी नोंदणीकृत होते. त्यापैकी २८१७ विद्यार्थी उपस्थित राहिले, तर ४१ विद्यार्थी अनुपस्थित होते. एकूण उपस्थितीचा टक्का सुमारे ९८.५६ इतका नोंदविण्यात आला.

केंद्र क्रमांक १४९ श्री साईबाबा विद्यालय, शंकर नगर येथे २३१ पैकी २२८ विद्यार्थी उपस्थित होते, तर ३ जण गैरहजर होते. केंद्र क्रमांक २६० मा. दिनानाथ मंगेशकर विद्यालय, सोमठाणा येथे सर्व १०० विद्यार्थी उपस्थित राहिले. जनता विद्यालय, नायगाव (केंद्र २६१) येथे ३५१ पैकी ३४६ विद्यार्थी उपस्थित होते, तर ५ जण अनुपस्थित होते.

यमुनाबाई कन्या विद्यालय, नायगाव (केंद्र २६२) येथे २६१ पैकी २६०, श्री दत्त विद्यालय, नायगाव (केंद्र २६३) येथे २७२ पैकी २६७, तसेच श्री संत ज्ञानेश्वर रा.मा.वि. धुपा (केंद्र २६४) येथे १४२ पैकी १४१ विद्यार्थी उपस्थित होते.

ओयोसिस इंग्लिश मीडियम स्कूल, कुंटूर (केंद्र २६५) येथे १४१ पैकी १४०, जवाहरलाल नेहरू विद्यालय, बरबडा (केंद्र २६६) येथे ४०० पैकी ३९४, पो.बे.आ. कन्या विद्यालय, मरवाळी तांडा (केंद्र २६७) येथे ३६२ पैकी ३५६ विद्यार्थी उपस्थित राहिले.

के. देविदास पवार विद्यालय, कुंटूर तांडा (केंद्र २६८) येथे १५५ पैकी १५०, राणी लक्ष्मीबाई कन्या विद्यालय, नरसी (केंद्र २६९) येथे ३०४ पैकी २९९, तर जि.प. हायस्कूल, कुंटूर (केंद्र २७०) येथे १३९ पैकी १३६ विद्यार्थी उपस्थित होते. सर्व केंद्रांवर पेपर शांततेत व सुरळीत परीक्षा प्रक्रियेदरम्यान कोणतीही अनुचित घटना घडली नसून प्रशासनाकडून आवश्यक ती खबरदारी घेण्यात आली होती.



ठाणे : ठाणे शहरातील वाहतुक कोंडी कमी करण्यासाठी ठाणे शहरात मेट्रो चे जाळे झपाट्याने पसरत आहे. याच मेट्रो च्या कारशेड साठी ठाण्यातील मोघरपाडा कारशेड ची जागा निश्चित करण्यात आली आहे परंतु या मोघरपाडा कारशेड च्या प्रस्तावित जागेत सध्यास्थितीत भातशेती होत असुन स्थानिक शेतकऱ्यांना अद्याप मोबदला सरकार ने कागदावरच दिला असुन त्या कारशेड च्यी विरोधात शेतकऱ्यांनी आज शेतबांधावर ठिय्या मांडला व चुल पेटवुन या ठिकाणी जर आम्हाला योग्य मोबदला दिला नाही तर आम्ही शेती देणार नाही यावर आमचा रोजगार आहे वेळ पडली तर रस्त्यावर उतरण्याचा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे.तर शेतात चुल पेटवुन आणि ट्रक्टर फिरवून सरकारचा निषेध व्यक्त केला. ( फोटो - संतोष पडवळ )

# सतीश वाघमारे यांना एम. सी. जे पदवी प्रदान

**मुखेड : (समर्थ गांवकरी)**

पत्रकारिता क्षेत्रातील महत्त्वपूर्ण मानला जाणारा बीए एम सी जे ( मास कम्युनिकेशन अँड जर्नलिझम) या परीक्षेत वाघमारे यांनी प्रथम श्रेणित यश संपादन प्राप्त केल्यामुळे वाघमारे यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातर्फे पदवी प्रदान करण्यात आले मुखेड तालुक्यातील बाऱ्हाळी येथिल रहिवासी असलेले सतीश शेषेराव वाघमारे यांनी नांदेड येथे असलेल्या श्री गुरुगोविंद सिंघजी पत्रकारिता महाविद्यालयात ३ वर्ष पत्रकारिता क्षेत्रातील महत्वपुर्ण मनाला जाणारा (बी.ए,एम. सी.जे ) मास कम्युनीकेशन & जर्नालिसम या व्यवसाय भूमीक परीक्षेचा परिपूर्ण अध्ययन करून प्रथम श्रेणित यश संपादन केले आहे. त्यामुळे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातर्फे




सतीश वाघमारे यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते एमसी जे पदवी प्रदान करण्यात आले. हा भव्यदिव्य पदवी वितरण सोहळा वार - शुक्रवार दि.२० फेब्रुवारी २६ रोजी नांदेड श्री गुरुगोविंद सिंग जी पत्रकारिता महाविद्यालय मालेगाव रोड, नांदेड येथे संपन्न झाला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष- प्रा. विकास कदम, प्रमुख पाहुणे म्हणून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. हुशार सिंग साबळे, डॉ. चंद्रकांत बाविस्कर, डॉ. शेखर घुंगरवार, डॉ. देवदत्त देशपांडे, विकास कदम,आदिजन विचार पिठावर उपस्थित होते.

वाघमारे यांना MCJ पदवी प्रदान करण्यात आल्यामुळे पत्रकार बाबुराव वाघमारे, दत्तात्रय तिपणे, केशव रापतवार नरसिंग अस्वले, उत्तम वाडीकर, साईनाथ कोडगिरे, सनमुख मठदेवरू, गणेश जाधव,अजित पवार, विश्वनाथ अरण्य, नागनाथ ससाणे यांनी अभिनंदन केले आहे.

# कंधार तालुक्यात शिष्यवृत्ती परीक्षा शांततेत संपन्न

**कंधार : (समर्थ गांवकरी)**

आज दिनांक २२ फेब्रुवारी २०२६ रोजी कंधार तालुक्यात इयत्ता पाचवी व इयत्ता आठवीची शिष्यवृत्ती परीक्षा शांततेत व सुरळीत पार पडली. तालुक्यात इयत्ता पाचवीसाठी एकूण ७ परीक्षा केंद्रांवर तर इयत्ता आठवीसाठी ६ परीक्षा केंद्रांवर परीक्षा आयोजित करण्यात आली होती. पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता ५ वी) साठी सकाळच्या सत्रात १२७२ पैकी १२२६ परीक्षार्थी उपस्थित होते, तर दुपारच्या सत्रात १२७२ पैकी १२२४ विद्यार्थी उपस्थित होते. पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता ८ वी) साठी सकाळच्या सत्रात ८१४ पैकी ७७७ विद्यार्थी उपस्थित राहिले, तर दुपारच्या सत्रात ८१४ पैकी ७७६ परीक्षार्थींनी परीक्षा दिली.

# चिमुकल्यांच्या नृत्याविष्काराने प्रेक्षक मंत्रमुग्ध

## नालंदा चिल्ड्रन्स स्कूलचा वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रम ठरला संस्मरणीय

**भोकर : (समर्थ गांवकरी)**

भोकर येथील नालंदा चिल्ड्रन्स स्कूलचा वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा गुरुवारी शहीद प्रफुल नगर येथे उत्साहपूर्ण वातावरणात मोठ्या थाटात पार पडला. सदरील कार्यक्रमात चिमुकल्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या आकर्षक नृत्याविष्कार सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थित प्रेक्षकांना अक्षरशः मंत्रमुग्ध केले. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन तसेच छत्रपती शिवराय भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी नगराध्यक्ष भगवानराव दंडवे, नगरसेवक विठ्ठल पाटील धोंडगे, नगरसेवक साईप्रसाद जटलावार, गौतम



कसबे, विकास क्षीरसागर, बालाजी पाटील गौड, नगरसेवक संजय पाटील घोगरीकर, अ‍ॅड. बालाजी वाघमारे , अ‍ॅड. बालाजी सूर्यवंशी, माधव पवार, एस आर जोंधळे , यु एन एडके, बी एस सरोदे, डि जे सोनकांबळे, बाबुराव सोनकांबळे, डी एस गायकवाड, चंद्रकांत दुधारे, सुधांशू कांबळे, आदी मान्यवर उपस्थित होते. सुमित सर्स क्लासेस च्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या बहारदार स्वागत गीतानंतर नगराध्यक्ष दंडवे, नगरसेवक जटलावार, आणि बालाजी पाटील गौड यांनी आपल्या मनोगतातून आयोजकांचे विशेष कौतुक केले. विद्यार्थ्यांनी हिंदी, मराठी, तेलगू,बंजारा भाषेतील एकापेक्षा एक सरस गीतांसह देशभक्तीपर, सांस्कृतिक व सामाजिक संदेश देणारे विविध नृत्यप्रकार सादर करत आपल्या कलागुणांची अप्रतिम झलक दाखवली. लहानग्यांच्या आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणाला प्रेक्षकांनी टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली.

या स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास, संस्कार व कला यांचा सुंदर संगम पाहायला मिळाला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल शाळेचे संचालक सुमेध हनमंते, आणि प्रशांत हनमंते यांचा ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते बालाजी पाटील गौड यांच्या हस्ते विशेष सन्मान करण्यात आला. पालक व मान्यवरांनी शाळेचे कौतुक करत विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुमेध हनमंते यांनी केले, सहशिक्षक संदीप ताटे, विकास लोखंडे, अक्षरा देशमुख, आणि प्रगती गायकवाड यांनी उत्कृष्ट सूत्रसंचालन केले.

# किनवट पोलिसांची "मास रेड" मोहीम : मटका व गावठी दारू प्रकरणी ४ गुन्हे दाखल

**किनवट : (समर्थ गांवकरी)**

किनवट पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध धंद्या विरोधात राबविण्यात आलेल्या "मास रेड" मोहिमेत मटका जुगार व गावठी दारू विक्रीवर मोठी कारवाई करण्यात आली. शहर व परिसरातील विविध ठिकाणी छापे टाकून पोलिसांनी दोन मटका अड्ड्यांवर तसेच दोन गावठी दारू विक्रेत्यांवर कारवाई केली असून एकूण चार स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पोलीस निरीक्षक गणेश कराड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक सागर झाडे, पोलीस अंमलदार दिलीप सिरमनवार, संग्राम मुंडे, हेड कॉन्स्टेबल प्रदीप आत्राम, सिद्धार्थ वाघमारे, ओंकार पुरी, तसेच पोलीस शिपाई संजय राजने आदींच्या पथकाने विविध ठिकाणी मास रेड ची कारवाई केली. पहिल्या कारवाईत फिर्यादी पोलीस शिपाई सदाशिव माणिकराव अनंतवार



यांनी दिलेल्या तक्रारीवरून विठ्ठल खंडू गीमेकर (वय ५२, रा.घोटी) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपीकडून ८५० रुपये रोख रक्कम, मटक्याचे आकडे लिहिलेल्या चिठ्ठ्या, दोन कागदी चिठ्ठ्या व एक बॉलपेन असा जुगाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

दुसऱ्या कारवाईत फिर्यादी पोलीस शिपाई बाळू भुजंगराव कुडमेते (ब.क्र. २४) यांच्या फिर्यादीवरून देवराव सोनबा बोरकर (वय ५८, रा. कोठारी) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपीकडून १,०५० रुपये रोख रक्कम, मटक्याच्या चिठ्ठ्या व जुगार साहित्य जप्त करण्यात आले.

दोन्ही आरोपी "टाईम ओपन" नावाच्या मटका जुगारावर लोकांकडून पैसे घेऊन स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी जुगार खेळत व खेळवीत असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. या दोन्ही गुन्ह्यांचा पुढील तपास हेड कॉन्स्टेबल दिलीप सिरमनवार यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. तिसऱ्या कारवाईत फिर्यादी पोलीस शिपाई संजय दिगंबर राजने यांनी दिलेल्या फिर्यादीवरून इलवंत महादू मुरमुरे (वय ५३, रा. बोधडी, ) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपीकडून दोन प्लास्टिक कॅनमध्ये सुमारे ४० लिटर हातभट्टीची गावठी दारू (अंदाजे किंमत ४,००० रुपये) जप्त करण्यात आली. आरोपी विनापरवाना बेकायदेशीररीत्या दारू साठवून विक्री करत असल्याचे आढळून आले. या प्रकरणाचा पुढील तपास हेड कॉन्स्टेबल सिद्धार्थ वाघमारे यांच्याकडे देण्यात आला आहे. चौथ्या कारवाईत ही गावठी दारू विक्री संदर्भात स्वतंत्र गुन्हा नोंदविण्यात आला असून संबंधित आरोपीविरुद्ध कायदेशीर कारवाईची प्रक्रिया सुरू आहे. यावेळी माध्यमांशी बोलताना पोलिस निरीक्षक गणेश कराड यांनी सांगितले की, किनवट पोलिस दलाने अवैध जुगार व दारू विक्री विरोधात कठोर भूमिका घेतली असून अशा प्रकारच्या कारवाया पुढेही सातत्याने सुरू राहणार असल्याचा इशारा दिला आहे. "मास रेड" मोहिमेमुळे अवैध व्यवसायिकां मध्ये खळबळ उडाली असून नागरिकांनीही बेकायदेशीर कृत्यांची माहिती पोलिसांना देऊन सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# इस्टिमेटमध्ये नामांकित 'गजाळी'; प्रत्यक्षात हलक्या दर्जाची?

**वसमत : (समर्थ गांवकरी)**

वसमत: नव्या बसस्थानकाच्या बांधकामात आणखी एक मुद्दा पुढे आला असून इस्टिमेटमध्ये नमूद केलेल्या गजाळीच्या (लोखंडी जाळी/स्टील रिइन्फोर्समेंट) दर्जाबाबत प्रश्न उपस्थित झाले आहेत. कागदोपत्री नामांकित व मानक ब्रँडची गजाळी वापरण्याचा उल्लेख असताना प्रत्यक्ष साइटवर हलक्या दर्जाचे साहित्य टाकल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. आरसीसी कामात गजाळी हा मजबुतीचा कणा मानला जातो. त्यामुळे इस्टिमेटमधील स्पेसिफिकेशन आणि प्रत्यक्ष वापर यामध्ये तफावत असेल, तर त्याची गंभीर दखल घेणे आवश्यक असल्याचे जाणकारांचे मत आहे.

# किनवट नगर परिषदेत मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळवदे यांची भेट

- विकासकामांचा समन्वयातून गती देण्याचे आवाहन

**किनवट : (समर्थ गांवकरी)**

किनवट येथे नांदेड जिल्हा परिषद चे मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळवदे यांनी (दि.20) रोजी किनवट नगर परिषदेला सदिच्छा भेट दिली. या भेटीदरम्यान नगर परिषद व पंचायत समितीच्या विविध विकासकामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी मुख्याधिकारी मुंगाजी काकडे, युवा नेते करण येंड्रलवार, नगरसेवक चंद्रशेखर रंगराव नेम्मानिवार, कार्यालयीन अधीक्षक अशोक भालेराव, सामाजिक कार्यकर्ते अन्वर मिर्झा, राजेश जोशी, शहर प्रमुख प्रशांत कोरडे, पत्रकार कचरू जोशी तसेच पंचायत समितीचे




सचिन येरेकार उपस्थित होते.

सर्व मान्यवरांनी पुष्पगुच्छ देऊन मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचे स्वागत केले. सदिच्छा भेटी दरम्यान किनवट शहरातील पाणीपुरवठा, स्वच्छता मोहीम, अंतर्गत रस्ते दुरुस्ती, नाली बांधकाम, सार्वजनिक प्रकाश व्यवस्था आणि शासनाच्या विविध योजनांच्या अंमलबजावणीबाबत समन्वय साधण्यात आला. प तसेच, केंद्र व राज्य शासनाच्या योजना प्रभावीपणे राबवून लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी अधिकारी व पदाधिकारी यांनी समन्वयाने काम करावे, असे आवाहनही त्यांनी केले. स्थानिक स्तरावरील अडचणी व निधीविषयक प्रश्न याबाबत संबंधित विभागांशी पाठपुरावा करण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

या भेटीमुळे किनवट शहरातील प्रलंबित विकासकामांना गती मिळणार असून, प्रशासन व लोकप्रतिनिधी यांच्यातील समन्वय अधिक मजबूत होईल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

# ढगाळ हवामानामुळे फुलवळ परिसरातील शेतकरी धास्तावला



**कंधार : (समर्थ गांवकरी)**

गेल्या दोन दिवसांपासून फुलवळ परिसरात निर्माण झालेल्या ढगाळ वातावरणामुळे गहू आणि हरभरा उत्पादक शेतकऱ्यांची मोठी तारांबळ उडाली आहे. सध्या शेतात ही दोन्ही पिके काढणीच्या अंतिम टप्प्यात असून, अचानक झालेल्या हवामानातील बदलाने हातातोंडाशी आलेला घास हिरावला जाण्याची भीती व्यक्त होत आहे. फुलवळ आणि परिसरातील गावांमध्ये सध्या गहू कापणी आणि हरभरा मळणीची कामे वेगात सुरू आहेत. मात्र, आकाशात ढगांची गर्दी होत असल्याने पावसाच्या धास्तीने शेतकऱ्यांनी मजुरांची जुळवाजुळव करत काढणीसाठी धावपळ सुरू केली आहे. काही ठिकाणी मळणी यंत्रांची प्रतीक्षा करावी लागत असल्याने शेतकऱ्यांचा जीव टांगणीला लागला आहे. जर अवकाळी पाऊस झाला, तर पिकांचा दर्जा घसरून मोठे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता आहे. त्यामुळे निसर्गाच्या लहरीपणापुढे शेतकरी सध्या हतबल झाला असून, लवकरात लवकर पिके सुरक्षित स्थळी नेण्यासाठी शेतकऱ्यांची युद्धपातळीवर धडपड सुरू आहे.

# ओतूर सायकल ग्रुपच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन

- भव्य सायकल रॅलीमध्ये ८०० पेक्षा जास्त सायकल स्वार सहभागी

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३९६ व्या जयंतीनिमित्त ओतूर सायकल ग्रुपने ओतूर ते शिवनेरी शिवजन्मभूमी अशी भव्य सायकल रॅली आयोजित केली होती.सायकल रॅलीचे हे चौथे वर्ष असल्याची माहिती अध्यक्ष जयसिंग डुंबरे व सेक्रेटरी गणेश डुंबरे यांनी दिली.

याविषयी अधिक माहिती देताना ओतूर सायकल ग्रुपचे ज्येष्ठ सदस्य व ग्राम विकास मंडळाचे सचिव प्रदीप गाढवे आणि चैतन्य ज्वेलर्स चे संतोष डुंबरे म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज हे आपले सर्वांचे आराध्य



दैवत आहे. त्यांच्या पराक्रमाला त्यांच्या शौर्याला आणि त्यांच्या दैदिप्यमान कर्तृत्वाला अभिवादन करण्या साठी दरवर्षी ओतूर सायकल ग्रुपच्या वतीने ही सायकल रॅली आयोजित केली जाते. प्रत्येक वर्षाला ही रॅली अधिकाधिक आकर्षक होत चालली आहे. विद्यार्थी,पालक सायकल प्रेमींचा व शिवप्रेमींचा प्रचंड पाठिंबा या सायकल रॅलीला मिळत आहे समाजातील अनेक दानशूर यासाठी सहकार्याचा हात पुढे करताना दिसत आहेत. सायकल चालवा तंदुरुस्त रहा तसेच पर्यावरण वाचवा, असा संदेश रॅली मधून देण्यात येतो"

रॅलीमध्ये सहभागी झालेल्या सर्व सायकल पटूंना आमदार शरद दादा सोनवणे,चैतन्य ज्वेलर्सचे संतोष डुंबरे,साईइलेक्ट्रॉनिक्सचे बाळासाहेब हाडवळे,हिलसन्स चे मनोज पटेल,हॉटेल अमरा चे सुदर्शन शिंदे,चैतन्य ट्रेडर्सचे मनोज घोंगडे यांनी टी शर्ट चे सौजन्य दिले. लकी ड्रॉ मार्फत अनेक बक्षिसांची खैरात यावेळी करण्यात आली.

प्रसिद्ध युवा उद्योजक हर्षलशेठ भाटे,राजेश बोबडे, कॅन्सर तज्ञ डॉक्टर अमोल डुंबरे, प्रतिभा नलावडे यांचे वतीने चार सायकल्स लकी ड्रॉतील विजेत्यांना देण्यात आल्या. नवनिर्वाचित जिल्हा परिषद सदस्य डॉ. छाया तांबे,पंचायत समिती सदस्य प्रशांत डुंबरे,युवा सेनेचे पुणे जिल्हाध्यक्ष सचिन घोलप,आम्ही जिजाऊच्या लेकी च्या संस्थापिका अक्षदा पानसरे- मांडे यांनी सर्व सायकल स्वारां ना मेडल्स बहाल केली.सर्व सायकल पटूंना हॉटेल ब्लू डायमंडचे ऋषीभाऊ डुंबरे यांनी पाचशे कॅपचे वाटप केले.

रॅली मधील प्रत्येकाला काही ना काही बक्षीस मिळावे यासाठी प्रदीप मुरादे, डॉ. वैभव गायकर प्रकाश हिंगणे,आदेश डुंबरे, नाजिम तांबोळी,धनंजय पो.डुंबरे,शेखर ढमाले,अंकुश ढमाले,संतोष पानसरे,विजय तांबे,राजवीर तांबे, कृष्णा तांबे, सचिन तांबे, नितीन डुंबरे, विघ्नहर चे संचालक धनंजय डुंबरे,अनुराग फापाळे, निलेश कवडे,शालन वाकचौरे,जालिंदर सरोदे,दत्तात्रेय बोडके,सुभाष लोहोटे,भाऊसाहेब मुरादे,प्रसाद वल्हवणकर,जयेश हांडे,गणपत फापाळे,संतोष डुंबरे,आतिश डुंबरे,दीपक मंडलिक,गीता डुंबरे,गणेश शिंदे,गणेश तांबे, शार्वी डुंबरे,ऋषीकेश गिते, राजेश पानसरे,महेश डुंबरे, कुणाल लांडगे,सिद्धेश डुंबरे आदींनी वेगवेगळ्या वस्तुरूपाने व रोख स्वरूपात बक्षीसे दिली व सर्व स्पर्धकांना प्रेरणा दिली. यावेळी झालेल्या समारोपप्रसंगी डॉ.छाया तांबे, मोहित ढमाले, प्रशांत डुंबरे, सचिन घोलप वसंत आप्पा डुंबरे डॉ.भरत घोलप,ए. डी.वाकचौरे,महेंद्र पानसरे,विक्रम नलावडे,सोपान नलावडे,जयसिंग डुंबरे, मारुती घाडगे, गणेश डुंबरे ,रविंद्र डुंबरे,पंकज घोलप, हर्षल भाटे, प्रकाश डुंबरे,आनंदराव डुंबरे, आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन भाऊसाहेब खाडे यांनी केले.

# जिल्हाधिकारी कार्यालय पुढे शिवप्रेमींची निदर्शने!

## महाराष्ट्राचा सातबाराच शिवरायांच्या नावे आहे : नगरसेवक सुनील सपकाळ



**बुलढाणा : (समर्थ गांवकरी)**

लोणार तालुक्यातील चिखला काकड या गावी छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा वरून झालेल्या वादात महिलांना अमानुष मारहाण करण्यात आली, याचा सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती बुलढाणा व आम्ही बुलढाणाकर यांनी तीव्र निषेध केला आहे. आज शिवप्रेमींनी जिल्हाधिकारी कार्यालय पुढे जमून घोषणाबाजी केली. त्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांना मागण्यांचे निवेदन शिष्टमंडळाच्या वतीने देण्यात आले. आरोपींवर विविध कलमे दाखल करून कठोर कारवाईची मागणी यावेळी करण्यात आली आहे. सकाळी संगम चौक येथील शिवस्मारकासमोर जमून शिवप्रेमींनी शिवरायांना अभिवादन केले. सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीचे अध्यक्ष गजानन दांदडे,संकल्पक व नगर सेवक सुनील सपकाळ व शहरातील अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते. महाराष्ट्र हा छत्रपती शिवाजी महाराजांचा महाराष्ट्र म्हटला जातो, या राज्याचा सातबारा शिवरायांच्या नावे आहे.मात्र एखाद्या गावात त्यांचा पुतळा बसवायला जागा मिळत नाही ही दुर्दैवाची बाब असल्याचे नगरसेवक सुनील सपकाळ यावेळी म्हणाले. महिलांना समानतेची वागणूक देण्याची शिकवण शिवाजी महाराज व जिजाऊ साहेबांनी आम्हाला दिली, त्यांनी कायम लेकी बाळींचा आदर केला, मात्र त्यांचा पुतळा बसविताना महिलांना अमानुष मारहाण करण्यात आली. त्यांचे कपडे फाडण्यात आले या विकृत मनोवृत्तीचा आम्ही निषेध करीत आहोत असे सुनील सपकाळ यावेळी म्हणाले. त्यानंतर सर्व शिवप्रेमींनी जिल्हाधिकारी कार्यालय मध्ये जमून निवेदन सादर केले. निवेदनानुसार काही सामाजिक घटक सामाजिक वातावरण दूषित करीत आहे.छत्रपती शिवरायांची शिकवण ही सर्वधर्मसमभावाची आहे. मात्र काही लोकांनी सामाजिक तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न चालवण्यात आला आहे.त्यांच्यावर योग्य ती कारवाई करावी, आरोपींना पाठीशी घालण्याचा प्रयत्न होऊ नये, अन्यथा शिवप्रेमी रस्त्यावर उतरतील असा इशारा देण्यात आला आहे. यावेळी नगरपालिका उपाध्यक्ष गजेंद्र दांदडे, राजर्षी शाहू परिवाराचे संदीप दादा शेळके,माणस फाउंडेशनचे अध्यक्ष डी एस लहाने, बावनबुर्जी बचाव कृती समितीचे सुनील जंजाळ पाटील, मनसेचे अमोल रिंढे, पत्रकार राजेंद्र काळे ,गणेश निकम केळवदकर, अनुजाताई सावळे,नगरसेवक सचिन गायकवाड, मराठा सेवा संघाचे डॉक्टर मनोहर तुपकर,पीए. श्रीकृष्ण शिंदे,गोपाल सिंग राजपूत, नगरसेवक विनोद बेडवाल, सुनील उदयकार, रमण राजपूत, बबनराव जाधव, अनंता लहासे, नगरसेवक प्रशांत जाधव,दीपक सोनुने, प्रतीक जाधव,सुनील बरडे, एडवोकेट गणेश सिंग राजपूत, संदीप सोनवणे, सागर घट्टे, वैशाली वैराळकर आरती जोशी, गायत्री सावजी. आदी शिवप्रेमींची मोठ्या संख्येने उपस्थित लाभली.

# शिवजयंतीनिमित्त जळगावात रक्ताचा ओघ

- २१० शिवभक्तांचे रक्तदान
- टायगर ग्रुप व विविध संघटनांचा स्तुत्य उपक्रम
- शिवतीर्थ मैदानावर उत्साहात संपन्न



**जळगाव : (समर्थ गांवकरी)**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९६ व्या जन्मोत्सवाचे औचित्य साधून जळगाव येथील शिवतीर्थ मैदानावर भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. 'शिवजयंती' सामाजिक बांधिलकीतून साजरी करण्याच्या उद्देशाने आयोजित या शिबिरात तब्बल २१० शिवभक्तांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान करून महाराजांना रक्ताभिषेक घातला. गेल्या पाच वर्षांपासून शिवजयंतीनिमित्त हे रक्तदान शिबिर सातत्याने राबविले जात आहे. यावर्षीही टायगर ग्रुप जळगाव शाखा, डॉ. श्रीकांत शिंदे फाउंडेशन, शिवाज्ञा रक्तदाता ग्रुप, सेवा समर्पण रक्तदाता ग्रुप, शिवशंभू संघटना, श्रीमंत शिवतेज प्रतिष्ठान, शिव प्रतिष्ठान हिंदुस्थान, अखिल भारतीय युवक महासंघ आणि शिवान्या ग्रुप या सर्व संघटनांनी एकत्र येत या उपक्रमाचे यशस्वी आयोजन केले. हे संपूर्ण शिबिर टायगर ग्रुपचे संस्थापक वस्ताद जालिंदर जाधव व राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. तानाजी जाधव यांच्या विशेष मार्गदर्शनाखाली पार पडले. याकामी डॉ. भरत गायकवाड व अमोल शेलार यांचे तांत्रिक सहकार्य लाभले. या शिबिराचे नियोजन गौरव उमप, सोपान मानकर, विवेक महाजन, आनंद घुगे व सागर सपके यांनी केले. प्रसंगी टायगर ग्रुपचे शहर अध्यक्ष गौरव उमप, समाजसेवक सोपान मानकर, चिंचोलीचे उपसरपंच आनंद घुगे, ग्रामसेवक सुनील भोई, प्रकाश सपके, मनोज बाविस्कर, नंदलाल मराठे, जितू निंबाळकर, बंटी ताडे, राहुल उमप, रवींद्र पाटील, लाला उमप, प्रेम लोंढे, अंकुश मराठे, विशाल पाटील, भरत लोंढे, गणेश गोपाळ यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

### ४ लाख कोटींच्या निष्क्रिय गुंतवणुकीसाठी

# क्लिअरक्लेमची राष्ट्रीय जनजागृती मोहीम



**पुणे : (समर्थ गांवकरी)**

भारतामध्ये सध्या सुमारे ४ लाख कोटी रुपयांची रक्कम शेअर्स, लाभांश आणि इतर आर्थिक मालमत्तांच्या स्वरूपात निष्क्रिय व अदावी असल्याचे समोर आले आहे. माहितीचा अभाव, जुनी कागदपत्रे हरवणे, पत्ता बदलणे किंवा मूळ गुंतवणूकदारांच्या निधनानंतर वारसांना माहिती नसणे अशा कारणांमुळे अनेक गुंतवणूकदारांना त्यांच्या हक्काची गुंतवणूक परत मिळवता येत नाही. या पार्श्वभूमीवर क्लिअरक्लेम या गुंतवणूकदार सेवा व रिकव्हरी प्लॅटफॉर्मने राष्ट्रीय पातळीवर जनजागृती मोहीम सुरू केली आहे.

जुन्या व विस्मरणात गेलेल्या गुंतवणुकी परत मिळवण्यासाठी क्लिअरक्लेम संपूर्ण प्रक्रियेसाठी मार्गदर्शन व सेवा उपलब्ध करून देत आहे. यामध्ये जुन्या शेअर्स व अदावी लाभांश परत मिळवणे, शेअर प्रमाणपत्रांचे डीमॅटमध्ये रूपांतर, मूळ धारकाच्या निधनानंतर शेअर्सचे ट्रान्समिशन, हरवलेली किंवा डुप्लिकेट शेअर प्रमाणपत्रे मिळवून देणे, तसेच इन्व्हेस्टर एज्युकेशन अँड प्रोटेक्शन फंड (IEPF) कडे वर्ग झालेल्या शेअर्स व लाभांशाचे क्लेम या सेवांचा समावेश आहे.

डीमॅट प्रक्रियेत होणारा विलंब, गुंतवणुकीची कागदपत्रे गहाळ होणे किंवा कुटुंबीयांना गुंतवणुकीची माहिती नसणे यामुळे अनेक गुंतवणूकदार अडचणीत सापडतात. सलग सात वर्षे लाभांश न मिळाल्यास संबंधित शेअर्स IEPF कडे वर्ग होतात, ज्यामुळे त्यांना परत मिळवण्याची प्रक्रिया अधिक क्लिष्ट आणि वेळखाऊ ठरते.

क्लिअरक्लेमचे सह-संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीकांत पंडोरे यांनी सांगितले की, गुंतवणूक क्लेमची प्रक्रिया सर्वसामान्यांसाठी अवघड असते. ती सोपी, पारदर्शक आणि वेळेत पूर्ण करण्याचे संस्थेचे ध्येय आहे. अनेक कुटुंबांना त्यांच्या जुन्या गुंतवणुकीत दडलेली संपत्ती माहित नसते आणि ती योग्य मालकांपर्यंत पोहोचवणे हेच क्लिअरक्लेमचे व्हिजन आहे.

सह-संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी (COO) हार्दिक मानेक यांनी सांगितले की, ग्राहकांचा विश्वास टिकवण्यासाठी पारदर्शकता आणि कार्यक्षम प्रक्रिया महत्त्वाची आहे. अनेक वर्षांच्या गोंधळानंतर संस्थेकडे येणाऱ्या ग्राहकांना स्पष्टता व समाधान देण्यावर कंपनीचे लक्ष आहे.

समर्पित टीमच्या माध्यमातून क्लिअरक्लेम देशभरातील गुंतवणूकदार व त्यांच्या कुटुंबांना विस्मरणात गेलेली आर्थिक मालमत्ता परत मिळवून देण्याचे काम करत असून, त्यामुळे आर्थिक सुरक्षितता व विश्वास वाढण्यास मदत होत आहे.

# बक्षिसे मिळवून चैतन्याची बाजी

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

पुणे जिल्हा परिषद,पुणे, पंचायत समिती,सांस्कृतिक कार्य संचालनालय व तहसिल कार्यालय जुन्नर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शिवजयंती महोत्सव १६ ते १८ फेब्रूवारी २०२६ या कालावधीत जुन्नर याठिकाणी घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांमध्ये पारितोषिके मिळवून सर्वाधिक बक्षिसे ग्राम विकास मंडळ ओतूर संचलित चैतन्य विद्यालय ओतूरच्या विद्यार्थ्यांनी मिळविल्याची माहिती मुख्याध्यापिका राजश्री भालेकर यांनी दिली.शिवजयंती महोत्सवानिमित्त जुन्नर ठिकाणी पुणे जिल्हा परिषद, पंचायत समिती जुन्नर,सांस्कृतिक कार्य संचालनालय व तहसिल कार्यालय जुन्नर यांच्या संयुक्त विद्यमाने चित्रकला,निबंध, वक्तृत्व,गडचढण व सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन केले होते. या विविध स्पर्धांत चैतन्य विद्यालय ओतूर मधील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या झालेल्या स्पर्धांत अनेक विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळविले.सर्व बक्षिस पात्र विद्यार्थ्यांना पंचायत समिती जुन्नरचे गटशिक्षणाधिकारी अशोक लांडे,केंद्र प्रमुख कमलाकांत मुंढे,यश मस्करे, सचिन मुळे यांच्या हस्ते सन्मानचिन्ह,प्रशस्तिपत्रक व रोख रक्कम देऊन गौरविण्यात आले.

# संगमनेरमध्ये 'आनंदी रस्ते' उपक्रम उत्साहात संपन्न

- संगमनेरकरांचा भरभरून प्रतिसाद!

**संगमनेर : (समर्थ गांवकरी)**



रोटरी क्लब संगमनेर तर्फे आयोजित 'आनंदी रस्ते' हा उपक्रम यावर्षीही रविवार, २२ फेब्रुवारी रोजी अतिशय उत्साहात संपन्न झाला. रोटरी क्लब आपली १२१ वर्षे पुर्ण करीत आहेत, त्यानिमित्ताने रोटरी डे चे औचित्य साधून हा प्रकल्प राबविण्यात आला. शहरातील आबालवृद्धांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत या उपक्रमाला भरभरून प्रतिसाद दिला. या कार्यक्रमास संगमनेर विधानसभा मतदारसंघाचे आमदार अमोल खताळ, नाशिक पदवीधर मतदारसंघाचे आमदार सत्यजित तांबे, माजी आमदार सुधीर तांबे, रोटरी डिस्ट्रीक्ट ३१३२ चे असिस्टंट गव्हर्नर अमोल वैद्य, माजी नगराध्यक्ष दुर्गाताई तांबे, यांच्यासह संगमनेर शहरातील अनेक मान्यवर, अबालवृद्ध उपस्थित होते. यंदा या उपक्रमाचे दहावे वर्ष असून, या उपक्रमाची संकल्पना रो. दिलीप मालपाणी यांनी संगमनेरमध्ये पहिल्यांदा राबविली. या निमित्ताने विविध मनोरंजनात्मक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. स्ट्रॉबेरी इंग्लिश मिडियम स्कूल तसेच श्री श्री रविशंकर विद्या मंदिर, शारदा विद्या मंदीर या शाळांनी गायन, पथनाट्य, मल्लखांब, वादनाचे कार्यक्रम तसेच योगा प्रात्यक्षिक सादर केले. तसेच झुंबा डान्स, ओंकार केसेकर यांच्या विद्यार्थ्यांनी मल्लखांब प्रात्यक्षिक, अरविंद गाडेकर यांची व्यंगचित्र, जय भोले ग्रुपतर्फे भजन सादरीकरण, आदी कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली. जायंट गोरिला हा बच्चे कंपनीसाठी प्रमुख आकर्षण होते. वर्मा आर्टस् चे संचालक अक्षय वर्मा यांनी रस्ते सुशोभिकरणाचे अतिशय कठीण असे काम केले. यावेळी मुलांना खेळणी व खाऊचे वाटप करण्यात आले. आमदार अमोल खताळ यांनी आपल्या भावना व्यक्त करतांना सांगितले की, रोटरी क्लब, संगमनेर आयोजित आनंदी रस्ते या उपक्रमाला खूप खूप शुभेच्छा देतो. रोटरीचे कार्य गेली ४२ वर्षापासून सुरु आहे तर आनंदी रस्ते या उपक्रमाचे १० वे वर्ष आहे. रोटरीच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रम रोटरी क्लब नेहमी राबवत असतात त्याबद्दल मी रोटरीच्या टिमचे अभिनंदन करतो. या कार्यक्रमात लहानांपासून, मोठ्यांपर्यंत, आमच्या लाडक्या बहिंणींसह, बच्चे कंपनी यात सामील झाले आहे. सर्वांचे अभिनंदन करुन या प्रकल्पाला मी शुभेच्छा देतो. या प्रकल्पासाठी माजी आमदार डॉक्टर सुधीर तांबे यांनी सांगितले की, रोटरी क्लब सामाजिक कामांसाठी ओळखला जातो विशेषत: एकल महिलांसाठी त्यांनी केलेले काम फार मोठे आहे. आजचा हा उपक्रम सुद्धा फार महत्त्वाचा आहे, जीवनात आनंदी असणे व दुसऱ्याला आनंदी ठेवणे यासारखी दुसरे मोठे काम नाही, हे काम रोटरी क्लब उत्साहाने करीत आहे. त्यांच्या कामाला माझ्या खुप खुप शुभेच्छा. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी रोटरी क्लब संगमनेरचे अध्यक्ष विश्वनाथ मालाणी, सेक्रेटरी सौरभ म्हाळस, उपाध्यक्ष महेश वाकचौरे, खजिनदार संकेत काजळे तसेच प्रकल्प प्रमुख समीर शहा, धीरज देशमुख, प्रकल्प समन्वयक अजित काकडे, नरेंद्र चांडक, सीए संजय राठी, दिपक मणियार, राजेंद्र खोसे, भारतभूषण नावंदर, आनंद हासे, विकास लावरे, डॉ. किशोर पोखरकर व रोटरी सदस्यांनी विशेष मेहनत घेतली. संगमनेरमधील आबालवृद्ध नागरिकांनी या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमाचा समारोप पावणे दोन हजार चौरस फूटाचा भव्य तिरंगा फडकावून करण्यात आला. वंदे मातरमच्या जयघोषाने संपूर्ण परिसर देशभक्तीने भारून गेला.

या उपक्रमासाठी मे. माधव गंगाधर काजळे अँण्ड सन्स्, मायक्रोन एरोसोल, लॅव्हीप्युअर नेक्स्ट, राजपाल क्लॉथ स्टोअर्स, रॉयल इव्हेंटस्, गॅझेट हब, राजेंद्र होंडा, डॉ.सचदेव सोनोग्राफी सेंटर, साईरत्न पेंटिंग वर्क्स्, संत गुलाब बाबा रंग भांडार, साईनाथ एल. साबळे ॲण्ड कंपनी, स्ट्रॉबेरी इंग्लिश मिडीयम स्कूल, सत्यम कॉम्प्युटर्स, साई आशिर्वाद व साई गजानन इंडस्ट्रीज, मोहित कॉम्प्युटर्स, पोखरकर नेत्रालय, चांडक पाईप हाऊस, विश्वविहार हॉलिडेज, खोसे कुल्फी, युवा पॉलिप्रिंट ॲण्ड पॅकेजिंग इंडस्ट्रीज यांनी आर्थिक व सहकार्याच्या स्वरूपात मोलाचे योगदान दिले. 'आनंदी रस्ते' उपक्रमामुळे संगमनेर शहरात सकारात्मक ऊर्जा निर्माण झाली असून, हा उपक्रम पुढील वर्षी अधिक व्यापक स्वरूपात साजरा करण्याचा मानस आयोजकांनी व्यक्त केला.

# शेतकऱ्यांचे कृषी पंप, केबल चोरी करणारी भोजदरीची सराईत टोळी जेरबंद

- तिघा जणांच्या टोळीला घारगाव पोलिसांनी ठोकल्या बेड्या
- स.पो.नि.हेमंत थोरात यांच्या घारगांव पोलिस पथकाची दमदार कामगिरी
- शेतकऱ्यांच्या शेतीवरील विद्युत पंप,केबल चोरी करणारे जेरबंद
- तीन आरोपीची टोळी जेरबंद करण्यात घारगांव पोलीसांना यश



**घारगाव - सतीश फापाळे : (समर्थ गांवकरी)**

गमनेर तालुक्यातील पठार भागात रात्रीच्या सुमारास मोठ्या चलाखीने शेतकऱ्यांचे विहिरी,बोअरवेल मधून कृषी पंप व कॉपर केबलची चोरी करणाऱ्या तिघा जणांच्या टोळीने धुमाकुळ घातला असताना शेतकऱ्यांना दिलासा देणारी कामगिरी घारगाव पोलिस स्टेशनचे सहा.पो.नि.हेमंत थोरात यांनी व त्यांचे पोलिस पथकाने दमदार कामगिरीच्या जोरावर भोजदरी गावांअंतर्गत असलेल्या बाळंदरी येथील सराईत चोरांची टोळी मोठ्या शिताफीने गजाआड केली.

शुक्रवार दि.१३ फेब्रुवारी रोजी रात्रीच्या सुमारास शेतकरी महेश गणपत हांडे रा. भोजदरी,ता. संगमनेर यांचे शेतातील कृषी पंप व कॉपरची केबल तसेच शेततळ्या मधील कृषी पंप व केबल चोरी गेल्याची फिर्याद घारगाव पोलिसांत दाखल करण्यात आली. यापूर्वी देखील अनेक शेतकऱ्यांनी चोरीचे गुन्हे दाखल केले होते.

शेतकऱ्यांचे शेती उपयोगी साहित्य चोरी करणाऱ्या टोळीने पठार भागात हैदोस घातला असताना शेतकऱ्यांच्या भावना तीव्र झाल्या होत्या तर शेतकरी वर्ग मेटाकुटीला आला होता. त्यात पोलिस प्रशासनाच्या कामगिरीवर प्रश्न चिन्ह उपस्थित केले जात होते.सदर गुन्ह्याचे तपास कामी व सबंधित टोळी गजाआड करण्यासाठी वरिष्ठांचे मार्गदर्शन नुसार घारगाव पोलिस स्टेशनचे सहा.पो. नि.हेमंत थोरात यांनी कंबर कसून पो.हे.कॉ बी.वाय गोडे, पो.कॉ प्रमोद गाडेकर,पो. कॉ सुभाष बोडखे,पो.कॉ सुरेश शेळके, पो.कॉ अनिल भांगरे, पो.कॉ महादेव हांडे,पो.कॉ रोहिदास आंधळे,चालक चंद्रकांत मेढे, पो.हे. कॉ सचिन धनाड अपर पोलीस अधीक्षक कार्यालय श्रीरामपुर असे पथक तपास कामी रवाना केले.सदर गुन्ह्यांचा समांतर तपास करत असताना पथकास गोपणीय बातमीदारा मार्फत व तांत्रीक तपासावरुन आरोपी किशोर सुरेश काळे,वय २५ वर्षे, सागर सुरेश काळे वय २३ वर्षे, अनिल देमाभाऊ काळे,वय २७ वर्षे, सर्व रा.बाळंद्री भोजदरी,ता. संगमनेर यांनी सदरच्या चोऱ्या केल्या असल्याची प्राथमिक माहिती पथकास प्राप्त झाली.

घारगाव पोलिस पथकाने सहा.पो.नि.हेमंत थोरात यांचे मार्गदर्शन नुसार तीनही आरोपींना सापळा लावून मोठ्या शिताफीने ताब्यात घेवुन त्यांचेकडे सखोल विचारपुस केली असता त्यांनी घारगाव पोलीस ठाणे हद्दीत विविध ठिकाणी शेतकऱ्यांच्या कृषी पंप सह कॉपर केबल,तसेच इतर साहित्याची चोऱ्या केल्या असल्याची कबुली दिली.

सदर आरोपींना विश्वासात घेऊन विचारपूस केली असता त्यांन शेतकरी दीपक भोर यांची तीनशे फुट कॉपरची केबल,राम गवांदे यांची दोनशे फुट कॉपरची केबल,रविंद्र गुंजाळ यांची शंभर फुट कॉपरची केबल,ज्ञानेश्वर नाईकवाडी यांची दोनशे फूट कॉपरची केबल,भाऊ तळपे यांची दोनशे फुट कॉपरची केबल,भास्कर गुळवे यांची शंभर फूट कॉपरची केबल,गोरक्षनाथ कडाळे यांची एकशे तीस फुट कॉपरची केबल,उत्तम निमसे यांची ऐंशी फुट कॉपरची केबल,संतोष निमसे यांची पन्नास फुट कॉपरची केबल चोरी केली असल्याची कबुली दिली.

यादरम्यान शेतकरी नवनाथ सागर,निलेश सागर,रोहित आहेर,अमोल कहाणे,सुरेश भुतांबरे,महेश हांडे,लक्ष्मण तिटाकरे,सुभाष गुळवे,सिताराम गुळवे, सुभाष घोडे,शिवाजी उगले,रामदास भुतांबरे,संतोष शेळके या वरील सर्व शेतकऱ्यांचे इलेक्ट्रिक ५ एच पी कृषी पंप,भरत पाबळे यांची १.२ एच पी इलेक्ट्रिक कृषी पंप,संदिप वाळुंज यांचा एक फिलीप्स कंपनीचा एल.इ.डी टी.व्ही.,बेलापुर येथील एक ट्रॅक्टरची एक्साईड कंपनीची लाल रंगाची बॅटरी,अशा प्रकारचा चोऱ्या केल्या असल्याची देखील कबुली दिली.घारगाव पोलिस पथकाने सर्व मुद्देमाल हस्तगत करुन जप्त केला आहे.

यादरम्यान या तिन्ही चोरांनी सदरचा मुद्देमाल कुठे दिला अथवा विक्री केला याबाबत घारगाव पोलिस पथक तपास करत असताना दत्तात्रय किसन हुलवळे, रा.चैतन्यपुर,ता. अकोले यांचेकडे ५ एच पी ईलेक्ट्रीक कृषी पंप, व एक ट्रॅक्टरची लालरंगाची एक्साईड कंपनीची बॅटरी,देवराम ज्ञानदेव मधे,गोरख ज्ञानदेव मधे,अशोक अंकुश मधे ,अशोक सोंत्या दुधवडे,रविंद्र बबल्या केदारी,नितिन संजय दुधवडे सर्व रा. बाळंद्री ता,संगमनेर यांचेकडुन प्रत्येकी एक एक ईलेक्ट्रीक कृषी पंप,विशाल सुखदेव दुधवडे रा. बाळंद्री यांचेकडुन ईलेक्ट्रीकल कृषी पंप, व एक एल.इ.डी टि.व्ही,दिपक पवार रा. अकलापुर यांचेकडुन एक ईलेक्ट्रीकल कृषी पंप ,रामदास काशिनाथ वाडगे रा. येठेवाडी, नादुर खंदरमाळ यांचेकडुन एक ईलेक्ट्रीकल कृषी पंप , तुषार बाळु काळे रा.रामवाडी, आळे, ता.जुन्नर यांचेकडून एक ईलेक्ट्रीकल कृषी पंप असा सर्व मुद्देमाल हस्तगत करण्यात मोठे यश आले आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास घारगाव पोलिस स्टेशनचे सहा.पो.नि.हेमंत थोरात यांच्या मार्गदर्शन नुसार घारगाव पोलिस करत आहे.

शेतकरी बांधवांना नम्रपणे आवाहन करण्यात येत आहे. की चोरीचा माल आपण खरेदी करताना योग्य तपासणी करण्यात यावी.आपण सदर चोरीचा माल खरेदी करतात.त्यामुळे पुढील चोरीच्या घटना घडतात.असा माल खरेदी न केल्यास चोऱ्यांचे सत्र थांबवता येऊ शकते.यापुढे चोरीचा माल खरेदी करणाऱ्यांवर देखील गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करण्यात येईल.असा प्रकार आढळून आल्यास घारगाव पोलिस ठाण्यात संपर्क साधा. पोलिस प्रशासनास सहकार्य करावे.सबंधित चोरांवर कायद्यानुसार कठोरात कठोर योग्य ती कारवाई होईल. **- (सहा.पो.निरीक्षक हेमंत थोरात)**

# अकोलेत विधी सेवा महाशिबिर व शासकीय योजनांचा महामेळावा उत्साहात

## न्यायमूर्ती विभा कंकणवाडी यांचे मार्गदर्शन, ११०० हून अधिक नागरिकांना लाभ!

**अकोले (समर्थ गांवकरी)**

सरकारी काम आणि सहा महिने थांब असा अनुभव आला नाही पाहिजे यासाठी शासनाचे योजना सर्वसामान्या पर्यंत पोहचवण्यासाठी असे कार्यक्रम महत्वाचे असतात.जिथे लोकांना लाभ देता येते व कर्तव्य ही सांगता येते असा हा महामेळावा आहे.ज्यांनी सरकारी योजनेचा लाभ घेतला त्यांनी स्वतःची आर्थिक,समाजिक प्रगतीकडे एक पाऊल टाकले आहे. अकोले कराचा या मेळाव्याला चांगला प्रतिसाद मिळाला आसुन प्रत्येकाने उन्नत भारताचे,प्रगतशिल राष्ट्राचे ,सुसंपन्न राज्याचे स्वप्न पाहावे असे प्रतिपादन अहिल्यानगर जिल्ह्याचे पालक न्यायमूर्ती तथा मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाचे न्यायमूर्ती श्रीमती विभा कंकणवाडी यांनी केले .

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली, महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या विशेष निर्देशान्वये अहिल्यानगर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व अकोले तालुका विधी सेवा समिती तसेच जिल्हा व तालुका प्रशासनासह शासकीय विभागांच्या संयुक्त विद्यमाने आणि अकोले व राजूर तालुका वकील संघाच्या सहकार्याने आज औद्योगिक प्रशिक्षण केंद्र अकोलेच्या मैदानावर विधी सेवा महाशिबीर व शासकीय योजनांचा महामेळावा व लाभ वितरण कार्यक्रम संपन्न झाला आहे. यावेळी अहिल्यानगर जिल्ह्याचे पालक न्यायमूर्ती तथा मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाचे न्यायमूर्ती श्रीमती विभा कंकणवाडी व न्यायमूर्ती श्री. रोहित जोशी,अहमदनगर जिल्हा पालक न्यायमूर्ती श्री मेहरोज पठाण,अहमदनगर प्रभारी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष आशिष पाटील,अतिरिक्त जिल्हाधिकारी श्री बाळासाहेब कोळेकर, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे (भा.पो.से.), जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव योगेश पैठणकर, अकोले न्यायालयातील दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठस्तर) धिरज हिंग्लजकर, तालुका वकील बार असोसिएशनचे अध्यक्ष अॅड वसंतराव मनकर व्यासपीठावर उपस्थित होते

यावेळी बोलताना औरंगाबाद खंडपीठाचे न्यायमूर्ती श्रीमती विभा कंकणवाडी म्हणाल्या की न्यायालयीन विभागा अंतर्गत अनेकदा चर्चासत्र ,कार्यशाळा होते मात्र तेथे लोकांची उपस्थिती नसते कारण तिथे आम्ही आश्वासन देत नाही.त्यासाठी वेगळे व्यासपीठ हवे असते जिथे लोकांना लाभ देता येते व कर्तव्य सांगता येते असे व्यासपीठ आजचा महामेळवा आहे. शासन अनेक योजना सुरु करते मात्र सर्व योजनाची माहिती सर्व लोकाना ,शेवटच्या घाटकांना होत नाही .शासनाच्या सर्व योजना प्रत्येक लाभार्थी पर्यंत पोहचली जावी व त्याचा लाभ सर्वांना घेता यावा. तसेंच आदिवासी,दुर्बल,घटक यांना मुख्य प्रवाहात आणता यावे यासाठी हा महामेळवा आहे.याठिकाणी शासनाच्या सर्व विभागाचे स्टॉल लावलेले आहेत यातून सर्वांना माहिती मिळेल यात विनाकारण कुणाची अडचण होणार नाही याची काळजी प्रशासनाने घ्यावी अश्या सूचनाही न्यायमूर्ती श्रीमती विभा कंकणवाडी यांनी केल्या . यावेळी न्यायमूर्ती श्री. रोहित जोशी म्हणाले की न्याय म्हणजे केवळ न्यायालयात दिला जाणारा न्याय नाही.संविधानाचे उदिष्टात म्हटले आहे जस्टीज फॉर ऑल अर्थात न्याय सर्वासाठी आहे त्यामुळं आजचा महामेळावा म्हणजे न्याय दानाचेच एक रूपाने कार्य आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधी याची संकल्पना होती देशाचे प्रत्येक गाव आत्मनिर्भर तसेच् पूर्णत्वास येणारे अर्थीक घटक असणारे गाव असावे .प्रत्येक माणसाला त्याचे हक्क त्याचे दारी,घरी मिळावा म्हणून आजचा कार्यक्रम आहे.ज्ञान म्हणजे पावर आहे मात्र आजच्या काळात माहिती तंत्रज्ञान हे ही एक पावर (ताकद )आहे.प्रत्येकाने आपले कर्तव्य पालन केले नाही तर कुठेतरी कोणी बाधित होतो .प्रशासनाने ही पुढे असे काम करावे की भविष्यात असे मेळावे घेण्याची गरज पडू नये असे आवाहन केले. यावेळी अकोले तालुक्यातील अकराशे पेक्षा जास्त नागरिकां ना लाभ देण्यात आला. सर्व स्टॉल वरती न्यायमूर्तींनी भेट देऊन शासकीय योजनाची माहिती घेतली. बचत गटाच्या वस्तूंची खरेदी सुद्धा केली. अकोले न्यायालयाचे न्यायाधीश राधाकिशन टेमसे, राजूर चे न्यायाधीश सचिन नेहरकर, पंचायत समितीचे गटविकास अधिकारी अमर माने, पोलीस निरीक्षक बोरसे, निवासी नायब तहसीलदार किसन लोहरे, महसूल नायब तहसीलदार प्रमोद सावंत, वीज वितरण उप अभियंता नामदेव शेळके, विठ्ठल सोनवणे, गटशिक्षण अधिकारी अरविंद कुमावत, महिला बालकल्याण अर्चना एखंडे, कृषीअधिकारी रत्नप्रभा शिंदे, पशुधन अधिकारी डॉ. अशोक धिंदळें, पुरवठा अधिकारी संदीप निळे, संजय गांधी निराधार योजना नायब तहसीलदार सचिन बांबळे,सेतू प्रतिनिधी सुशांत वाकचौरे, रोटरी क्लब चे विद्याचंद्र सातपुते, आदींनी जनतेच्या प्रश्नाचे समाधान करण्याचा प्रयत्न केला.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अकोले तालुका विधी सेवा समितीचे सदस्य मच्छिंद्र मंडलिक, राम रुद्रे, सुमिरण मालुंजकर, दत्ता शेणकर, दत्तात्रय मुठे, रामदास पवार, विजया पाडेकर, सुमन जाधव, मंगल मालुंजकर, मीना म्हसे, अशोक उघडे, श्याम खलाने, आदींनी मदत केली.



## कन्या विद्यालय म्हणजे विद्यार्थिनी घडवणारे संस्कारपीठ : पाचपुते



**श्रीगोंदा: (समर्थ गांवकरी)**

श्रीगोंदा येथील रयत शिक्षण संस्थेचे श्रीमंत राजमाता विजयाराजे शिंदे कन्या विद्यालय हे गुणवंत विद्यार्थिनी घडवणारे चालते-बोलते संस्कारपीठ असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री मा. बबनरावजी दादा पाचपुते यांनी केले. विद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभाच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.

या कार्यक्रमास अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष बाबासाहेब भोस, नगराध्यक्षा सुनीताताई खेतमाळीस, उपनगराध्यक्षा अलका अनभुले, जनरल बॉडी सदस्य कुंडलिकराव दरेकर, पोपट आबा खेतमाळीस, तुकाराम कण्हेरकर, प्राचार्य राजेंद्र खेडकर, पत्रकार संघटनेचे जिल्हा सचिव पीटर रणशिंग, प्राचार्य दिलीप भुजबळ, स्थानिक स्कूल कमिटीच्या सदस्या जयश्री दरेकर व रत्नप्रभा बोरुडे, शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा अश्विनी रणसिंग, स्नेहा पवार, ज्योती वायभासे, बापूराव औटी, योगेश भोसले, प्रकाश मोटे आदी मान्यवर उपस्थित होते. सन्माननीय अतिथींच्या हस्ते इयत्ता दहावी बोर्ड परीक्षा, शिष्यवृत्ती परीक्षा, विविध स्पर्धा परीक्षा, चित्रकला परीक्षा तसेच विविध सहशालेय उपक्रम व क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या गुणवंत विद्यार्थिनींना सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी विद्यालयाचे थोर देणगीदार सौ. ज्योत्स्ना भंडारी, चंद्रकांत चौधरी, अशोक मांढरे आणि सचिन आनंदकर यांचा विद्यालयाच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापिका वर्षा भोईटे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रशांत चव्हाण यांनी केले. दुपारी विद्यालयाच्या भव्य मैदानात 'उत्सव स्वरांचा, अविष्कार कलागुणांचा' हा बहारदार सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात पार पडला. श्रीगोंदा परिसरातील शिक्षणप्रेमींनी कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.

## दशक्रिया घाटाची स्वच्छता

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**

सद्गुरू माता सुदीक्षाजी महाराज यांच्या आदेशानुसार श्रीगोंदा तालुक्यातील काष्टी येथील घोडनदीतीरी असलेल्या दशक्रिया घाटाची संतनिरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनच्या वतीने स्वच्छता करण्यात आली. मंडळाच्या सदस्यांनी एकत्र येऊन संपूर्ण घाट व परिसर स्वच्छ केल्याने त्यांच्या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. काष्टी गावातील घोडनदीकाठी असलेल्या या दशक्रिया घाटावर दररोज गावासह परिसरातील गावांतील मयत व्यक्तींचे दशक्रिया विधी पार पडतात. मात्र विधीनंतर वापरलेले साहित्य नष्ट न केल्याने घाट परिसरात मृत व्यक्तींचे कपडे, अर्धवट जळालेले लाकूड, प्लास्टिक पिशव्या, बाटल्या, अन्नपदार्थ, पाने-फुले, मडकी, केस तसेच अंत्यसंस्कार व दशक्रिया विधीचे विविध साहित्य मोठ्या प्रमाणात साचले होते.

## आमदार रोहित पवारांना तात्काळ 'झेड प्लस' सुरक्षा द्या

**कर्जत : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या विमान दुर्घटनेतील धक्कादायक निधनाबाबत सखोल आणि निष्पक्ष चौकशी व्हावी, ही संपूर्ण राज्याची भावना असतानाच, या विषयावर सातत्याने आवाज उठवणारे कर्जत जामखेडचे कार्यसम्राट आमदार रोहित पवार यांच्या सुरक्षेचा प्रश्न आता ऐरणीवर आला आहे. सत्य समोर आणण्यासाठी निर्भीडपणे लढा देणाऱ्या आ.रोहित पवार यांच्या जीवितास धोका निर्माण होण्याची शक्यता असून, त्यांना शासनाने तात्काळ 'झेड प्लस' दर्जाची सुरक्षा पुरवावी, या मागणीसाठी कर्जत तालुक्यातील दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने सोमवारी, दि.२३ रोजी कर्जतचे मा.प्रांताधिकारी यांना संयुक्त निवेदन देण्यात आले.



अजितदादांच्या अपघाती मृत्यूमागे केवळ अपघात आहे की, कोणताही पूर्वनियोजित घातपात, याचा शोध लागणे ही जनसामान्यांची तीव्र इच्छा आहे. आ. रोहित पवार स्वतःच्या जीवाची पर्वा न करता या संवेदनशील विषयावर ठाम भूमिका घेत आहेत. त्यांच्या या संघर्षामुळे हितशत्रूंकडून त्यांना संभाव्य धोका पोहोचू शकतो, अशी भीती कार्यकर्त्यांनी व्यक्त केली आहे.

सध्याची संवेदनशील राजकीय आणि सामाजिक परिस्थिती लक्षात घेता, प्रशासनाने तातडीने 'थ्रेट असेसमेंट' करून त्यांना सर्वोच्च सुरक्षा पुरवणे ही सरकारची प्राथमिक जबाबदारी आहे, असे या निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.

लोकशाही व्यवस्थेत जनतेच्या प्रश्नांसाठी आणि सत्यासाठी लढणाऱ्या लोकप्रतिनिधीला संरक्षण मिळणे आवश्यक असून, या प्रकरणी तातडीने योग्य ती कार्यवाही करून शासन स्तरावर सकारात्मक शिफारस करावी, अशी आग्रही मागणी दोन्ही पक्षांच्या पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी केली आहे.

यावेळी नामदेव राऊत, बाळासाहेब शिंदे (ता.अध्यक्ष NCP-AP), सौ. पूजाताई सूर्यवंशी (महिला ता.अध्यक्ष NCPSP), प्रीतीताई जेवरे, राजेंद्र भैय्या देशमुख, बाळासाहेब साळुंखे, गुलाबकाका तनपुरे, रघुआबा काळदाते, विशाल मेहेत्रे, नितीन धांडे, राम कानगुडे, अजय नेवसे, उमेश परहर, डॉ. चंद्रकांत कोरडे, पप्पू शहाणे, अंगद रुपनर, बाळासाहेब सपकाळ, तात्यासाहेब ढेरे, अभय बोरा, रज्जाक झारेकरी, डॉ. राजेंद्र पवार, जयसिंग थेटे, ऋषिकेश धांडे, माऊली सायकर, प्रसाद जेवरे, ज्ञानदेव लष्कर, पोपट आबा खोसे, प्रकाश थोरात, अजित वांगडे, सावन शेटे, दिलीप जाधव, राहुल नवले, राजेंद्र भांडवलकर, सचिन चव्हाण, राहुल भोसले, दादा चव्हाण, रमेश कचरे, सुशील मराळ, राहुल नेटके, मुस्ताक सय्यद, संजय भिसे, सुमित भैलूमे, सागर सुर्वे, सौरव पाटील यांच्यासह दोन्ही राष्ट्रवादी पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## 'माझी वसुंधरा' अभियानात मिरजगाव ग्रामपंचायतीला उत्तेजनार्थ बक्षिस

### राज्यात मिरजगाव ग्रामपंचायतीचा पुन्हा डंका ; मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार प्रदान

**मिरजगाव : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र शासनाच्या 'माझी वसुंधरा अभियान टप्पा क्र.४.० अंतर्गत कर्जत तालुक्यातील मिरजगाव ग्रामपंचायतीला राज्यात उत्तेजनार्थ बक्षिस मिळाले आहे. यामुळे मिरजगाव ग्रामपंचायतीचा या अभियानात राज्यस्तरावर पुन्हा एकदा डंका वाजला आहे.

या अभियानातंर्गत दि.१ एप्रिल २०२३ ते ३१ मे २०२४ या कालावधीत राबविण्यात आलेल्या विविध पर्यावरण पूरक उपक्रमाच्या अंमलबजावणीमुळे या उत्कृष्ट कार्याची दखल घेत मिरजगाव ग्रामपंचायतीला हा बहुमान प्राप्त झाला आहे. पंचतत्वाचे संवर्धन, संरक्षण व जतन करून शाश्वत विकास साधण्यासाठी माझी वसुंधरा अभियान टप्पा क्र.0.4 मध्ये दहा हजारावरील ग्रामपंचायत गटामध्ये




राज्यस्तरावर " सलग 3 वेळा राज्यात उत्कृष्ट कामगिरी करून यंदाही उत्तेजनार्थ प्रथम क्रमांकाचे मानांकन पुरस्कार मिरजगाव ग्रामपंचायतीला देण्यात आला.

हा पुरस्कार सरदार वल्लभभाई पटेल स्टेडियम, वरळी, मुंबई येथे पुरस्कार वितरण सोहळा आयोजित कार्यक्रमात महाराष्ट्र राज्याचे महामहिम राज्यपाल आचार्य देवव्रत, राज्याच्या उपमुख्यमंत्री श्रीमती. सुनेत्राताई पवार, विधानसभा अध्यक्ष अॅड. राहुल नार्वेकर, पर्यावरण व वतातवरणीय बदल आणि पशुसंवर्धन विभागाच्या मंत्री पंकजा मुंडे, राज्याचे मुख्यसचिव राजेश अग्रवाल, महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या सचिव श्रीमती. जयश्री भोज, म.प्र. नि. मंडळाचे सदस्य सचिव देवेंद्र सिंग, माझी वसुंधरा अभियानाचे संचालक सुधाकर बोबडे आणि इतर मान्यवरांच्या हस्ते नुकताच प्रदान करण्यात आला. मिरजगाव ग्रामपंचायतीच्या तत्कालीन सरपंच सुनिता नितीन खेतमाळस, कर्जत पंचायत समितीचे गटविकास अधिकारी अजिंक्य सूर्यवंशी नितीन खेतमाळस, ग्रा.प सदस्या संगीता कोरडे, ग्रामपंचायत अधिकारी विजयकुमार बनाते, जिल्हा परिषदेचे विस्तार अधिकारी निशांत घोडके, नाईक साहेब मुंबई, वरिष्ठ लिपिक दत्तात्रय तुपे यांनी हा पुरस्कार स्वीकारला. यावेळी सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

यापूर्वी या ग्रामपंचायतीने माझी वसुंधरा अभियानात टप्पा क्र.०१ मध्ये प्रथम तर टप्पा ०.२ मध्ये द्वितीय क्रमांक मिळविला होता.

## शिवजन्मोत्सव सोहळा उत्साह साजरा

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक.. रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज शिवजन्मोत्सव सोहळा निमित्त १९ फेब्रुवारी रोजी शहरातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास शिवप्रेमीनी मोठ्या संख्येनी उत्सफुर्त पणे अभिवादन केले. व तसेच आयोजित रक्तदान शिबिरात तिस दानशूर रक्तदात्यांनी रक्तदान केले आसुन या वेळी मोठ्या उत्साहात शिवजन्मोत्सव साजरा करण्यात आला.

दर वर्षी प्रमाणे यंदाही शहरातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यांचे उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पुजन करून जेष्ठ नागरी वैजनाथ मेघमाळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

## मंदिर परिसरात पेव्हिंग ब्लॉक बसवून मागणीची तात्काळ पूर्तता!

**ढवळे मळा (ता. निघोज) : (समर्थ गांवकरी)**

ढवळे मळा येथे नुकताच काळभैरवनाथ मंदिर येथे मूर्ती स्थापना व कलशारोहणाचा कार्यक्रम भक्तिभावात पार पडला. या कार्यक्रमास उपस्थित राहिलेल्या ग्रामस्थांनी मंदिर परिसरात पेव्हिंग ब्लॉक बसवण्याची मागणी केली होती. ग्रामस्थांच्या भावनेचा आदर राखत राळेगण गावचे लोकनियुक्त सरपंच पंकज दादा कारखिले यांनी दिलेला शब्द अक्षरशः दुसऱ्याच दिवशी पूर्ण करून दाखवला. कार्यक्रमाच्या वेळी निघोज गावचे उपसरपंच श्री. माऊली शेठ वरखडे, राजुशेठ ढवळे, नाथाशेठ ढवळे तसेच इतर ग्रामस्थ उपस्थित होते. मंदिर परिसरात पेव्हिंग ब्लॉक बसवण्याची मागणी त्यांनी एकमुखाने मांडली होती.

ग्रामस्थांची भावना लक्षात घेऊन निघोज जिल्हा परिषद गटाचे नेते सचिन पाटील वराळ यांच्या मार्गदर्शनाखाली पंकज दादा कारखिले यांनी तत्काळ निर्णय घेतला आणि अवघ्या दुसऱ्याच दिवशी मंदिर परिसरात पेव्हिंग ब्लॉकचे काम पूर्ण करून आपला शब्द पाळला.

### – : जाहिर सुचना : –

कै. युवराज निवृत्ती चव्हाण हे रा. तांभोळ, ता. अकोले, जि. अहिल्यानगर येथील रहिवासी असून त्यांच्या नावे मारुती सुझुकी कंपनीची Swoft VDI ही तिचा क्र. MH04EH6883 हे चारचाकी मोटार वाहन नोंदणीकृत आहे. त्यांचे दिनांक १४ जानेवारी २०२२ रोजी निधन झाले आहे.

सदर मोटार वाहन त्यांच्या कायदेशीर वारस व पत्नी सौ. संध्या युवराज चव्हाण यांच्या नावे हस्तांतरीत करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

म्हणून सदर वाहन त्यांच्या नावे हस्तांतरित करण्याबाबत कोणास काही हरकत, आक्षेप किंवा दावा असल्यास, त्यांनी ही जाहिरात प्रसिध्द झाल्यापासन १५ (पंधरा) दिवसांच्या आत लेखी स्वरुपात आवश्यक पुराव्यासह प्रादेशिक परिवहन कार्यालय, श्रीरामपूर येथे संपर्क साधावा. अन्यथा, कोणतीही हरकत नसल्याचे गृहीत धरुन पुढील कार्यवाही करण्यात येईल.

## अवकाळी पावसाचा किनवट तालुक्यात तडाखा

**किनवट : (समर्थ गांवकरी)**

तालुक्यात रविवारी मध्यरात्रीपासून अवकाळी पावसाने हजेरी लावली. सुरुवातीला पाऊस तुरळक ठिकाणी व काही काळासाठीच झाला; मात्र त्यामुळे वीजपुरवठा वारंवार खंडित झाला. सोमवारी दुपारी सुमारे ३ वाजल्यानंतर पावसाचा जोर अचानक वाढला आणि वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊस कोसळू लागला. काही भागांत तुरळक गारपीटही झाल्याने शेतीपिकांचे मोठे नुकसान झाले. या अवकाळी पावसाचा सर्वाधिक फटका गहू, मका आणि चना उत्पादक शेतकऱ्यांना बसला आहे. अनेक ठिकाणी शेतकऱ्यांनी काढणी केलेला शेतमाल शेतातच वाळत घातला होता; तो पावसामुळे भिजून खराब झाला. तर काही शेतांमध्ये काढणीस आलेली पिके



वादळी वाऱ्यामुळे आडवी पडली. परिणामी उत्पादनात घट होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. मोहपूर, मांडवी, बोधडी, किनवट, मांडवा, बेलोरी, पिंपळगाव आणि वंजारवाडी या भागांत पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. शेतकऱ्यांनी तातडीने पंचनामे करून नुकसानभरपाई जाहीर करण्याची मागणी प्रशासनाकडे केली आहे. दरम्यान, किनवट शहरातही पावसाचा जोर कायम राहिल्याने काही भागांत पाणी साचले. वीजपुरवठा खंडित होण्याच्या घटना घडल्याने नागरिकांना त्रास सहन करावा लागला.

## उत्तर देणारी व्यवस्था निर्माण केल्यामुळे स्वराज्य उभे राहिले

**प्रा. हनुमंत भोपाळे**

**नांदेड : (समर्थ गांवकरी)**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या समोर स्वराज्य निर्माण करताना अनेक अडचणी,अडथळे, समस्या आणि प्रश्न होते,या प्रश्नांना त्यांनी अतिशय कल्पकतेने उत्तर देणारी यंत्रणा उभी केल्यामुळेच प्रतिकूल परिस्थितीत स्वराज्य निर्माण होऊ शकले.आपण आपल्या जीवनातील प्रश्न,समस्या, अडचणी आपोआप सुटतील म्हणून वाट न बघता त्या प्रश्नांना उत्तर देणारी व्यवस्था निर्माण केली पाहिजे. वाटच पाहात बसल्याने प्रश्न सुटत नाही, नैराश्य आणि अपयश येते, असे प्रतिपादन सुप्रसिद्ध वक्ते साहित्यिक प्रो.डॉ.हनुमंत मारोतीराव भोपाळे यांनी केले. ते श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचालित कॉलेज ऑफ एज्युकेशन,नांदेडने आयोजित केलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त छत्रपती शिवाजी महाराज प्रेरणेचा हिमालय ह्या विषयावर व्याख्यान देताना प्रमुख वक्ते या नात्याने बोलत होते.




कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमा पूजन व दीपप्रज्वलनाने झाली, अध्यक्षस्थानी प्राचार्या डॉ. सरिता पाटील ह्या होत्या. डॉ. हनुमंत भोपाळे पुढे बोलताना म्हणाले, 'शिवछत्रपतींच्या चरित्राच्या वाचन, चिंतन आणि मननाने आत्मविश्वास आणि नवचैतन्य निर्माण होऊन उदास होऊन बसलेला माणूसही कार्यशील आणि प्रगतीशील बनतो,एवढी ताकद छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरित्रात आहे. प्रेरणेच्या बळावर अडचणीचे पर्वत हलवता येतात आणि ज्यांच्या प्रेरणा संपल्या ते जागचीच हालत नाहीत,अशा निरास,उदास होऊन बसलेल्यांना शिवछत्रपतींचे चरित्र वाचायला द्या.चरित्र ऐकवा, तो पुन्हा यशासाठी सिद्ध होईल. उदात्त ध्येयनिष्ठा, तनमनधन साधना, कल्पक नियोजन,आत्मसंयम, दृढइच्छाशक्ती,आत्मविश्वास, समर्पण,निर्भयता, दूरदृष्टी गुणग्राहकता आणि संघटनशक्तीच्या बळावर छत्रपती शिवाजी महाराजांनी बलाढ्य आणि क्रूरशक्ती परकियशक्तींला बाजूला सारून स्वराज्य निर्माण करून दाखवले.ह्या अलौकिक कार्याची प्रेरणा घेऊन जगणाऱ्या माणसांच्या कार्याला यश येते. जगातील अनेक यशस्वी लढ्याची प्रेरणा शिवाजी महाराजांचे चरित्र आहे.कधी थोडा वेळ अपयश आले तरी खच्चून न जाता अपयशाचे रूपांतर यशात करण्याची शक्ती देणाऱ्या शिवाजी महाराजांचे चरित्राचे पारायण घराघरांत, गावागावात झाली पाहिजे, असे प्रो. हनुमंत भोपाळे यांनी सांगितले. या प्रसंगी छात्र-अध्यापक आदर्श टाक,पूजा कदम,गणेश फुलारी,चंदना कल्याणकर व स्नेहल जाधव यांनी भाषणं, पोवाडा व देशभक्तीपर गीतं सादर करून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रतिभा कदम यांनी केले,तर आभार देवेंद्र सूर्यवंशी यांनी मानले.

कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. महेशकुमार नळगे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. जोशी एम.आर.डॉ.संजीवनी चव्हाण,ग्रंथपाल राम कदम, कार्यालयीन कर्मचारी स्वप्निल दरणे,शरद घोगरे आणि सर्व छात्र-अध्यापक यांनी मोलाचे सहकार्य केले. कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

# मुरबाड येथे कस्तुरी-सुदेश यांचा विवाह सोहळा उत्साहात संपन्न

**मुरबाड : (समर्थ गांवकरी)**

मुरबाड तालुक्यात शिर्के परिवार व ठाकरे परिवारातील कस्तुरी व सुदेश यांचा विवाह सोहळा पारंपरिक पद्धतीने, सामाजिक ऐक्य व साधेपणाचा आदर्श ठेवत मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या सोहळ्याला राज्यभरातील सामाजिक, शैक्षणिक व पत्रकारिता क्षेत्रातील मान्यवरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून नवदांपत्यावर आशीर्वादांचा वर्षाव केला.

या प्रसंगी आशीर्वादपर भाषण करताना थोर समाजसेवक तथा एन के टी समूहाचे अध्यक्ष नानजीभाई खिमजीभाई ठक्कर (ठाणावाला) यांनी विवाह हा केवळ दोन व्यक्तींचा नव्हे, तर दोन कुटुंबांचा, संस्कारांचा व परंपरांचा पवित्र संगम असल्याचे प्रतिपादन केले. "मुलगी ज्या घरात प्रवेश करते ते घर नंदनवन बनते. ती चार परिवारांचे नाव उज्ज्वल करते. सुख-दुःखात एकमेकांना साथ देणे, ज्येष्ठांचा सन्मान राखणे आणि समाजाशी नाळ जपणे हीच विवाहबंधनाची खरी ताकद आहे. संपूर्ण महाराष्ट्रातून समाज आशीर्वाद देण्यासाठी एकत्र येतो, हीच आयुष्यभर केलेल्या समाजकार्याची खरी पावती आहे," असे त्यांनी भावपूर्ण शब्दांत सांगितले.

विवाह सोहळ्यात अनाठायी खर्चाला फाटा देत साधेपणाने व पारंपरिक पद्धतीने विधी पार पाडण्यात आले. जुन्या रूढी-परंपरांचे जतन करत सामाजिक एकात्मतेचा सुंदर संदेश या सोहळ्यातून देण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी नवदांपत्यास कुटुंबातील आई-वडील





## समाजकार्याचीच खरी पावती – नानजीभाई ठक्कर

तसेच सासू-सासरे यांची सेवा करण्याचा, कुटुंबातील संस्कार जपण्याचा व समाजासाठी कार्य करण्याचा संदेश दिला.

या सोहळ्यास माळशेज नागरिक सहकारी पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष हरिभक्त परायण चंद्रकांत महाराज डुंबरे, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे, सामाजिक कार्यकर्ते वसंतराव बुचके, जिल्हा परिषद उपाध्यक्ष सुभाष पवार, सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र पांडे, नवनाथ जाधव, संजय फुलसुंदर यांच्यासह राज्यभरातील अनेक मान्यवर, पत्रकार व सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. ठाकरे परिवार व शिर्के परिवाराने आलेल्या सर्व मान्यवरांचे मनापासून स्वागत केले. उपस्थितांची मोठी गर्दी, साधेपणाचा आदर्श व सामाजिक बांधिलकीचा संदेश यामुळे हा विवाह सोहळा परिसरात चर्चेचा विषय ठरला.



# निस्वार्थी संविधान सेवेबद्दल रावसाहेब घोडके यांना 'आदर्श समन्वयक' पुरस्काराने सन्मानित

**श्रीगोंदा तालुका: (समर्थ गांवकरी)**

संविधान सजगता मंच, पिंपरी-चिंचवड आणि संविधान गुणगौरव समिती, रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित संविधान गुणगौरव परीक्षा २०२५-२०२६ सन्मान पुरस्कार सोहळा व कार्यशाळा उत्साहात पार पडली. या सोहळ्यात निस्वार्थी संविधान सेवेबद्दल रावसाहेब घोडके यांना 'आदर्श समन्वयक' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.



रावसाहेब घोडके हे गेली अनेक वर्षे स्वतःच्या सायकलच्या माध्यमातून संविधान जनजागृतीचे कार्य करत आहेत. त्यांच्या सायकलच्या दर्शनी भागावर भारतीय संविधानाची उद्देशिका, महापुरुषांचे फोटो तसेच पर्यावरण संवर्धनाचे संदेश प्रदर्शित केलेले असतात. या माध्यमातून ते गावोगावी जाऊन सामान्य नागरिकांपर्यंत संविधानाचे महत्त्व, महापुरुषांचे विचार आणि सामाजिक जाणीवा पोहोचवत आहेत.

ते प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये जाऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधतात आणि संविधानाचे महत्त्व पटवून देतात. दरवर्षी संविधान विषयक परीक्षा आयोजित करून विद्यार्थ्यांमध्ये जागृती निर्माण करण्याचे कामही ते सातत्याने करत आहेत. कोणतीही अपेक्षा न ठेवता तन-मन-धनाने ते हे कार्य निस्वार्थीपणे पार पाडत आहेत. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन यावर्षी त्यांना प्रमाणपत्र, ट्रॉफी आणि गोल्ड मेडल देऊन गौरविण्यात आले.

तसेच मिशन गर्ल्स हायस्कूल येथील के. एम. घोडके यांनाही केंद्रप्रमुख म्हणून उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल ट्रॉफी, सन्मानपत्र व गोल्ड मेडल प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

# पडघे विभागात दहावीची परीक्षा सुरळीत सुरू

**भिवंडी : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळ यांच्या वतीने घेण्यात येणारी इयत्ता दहावीची परीक्षा दिनांक २० फेब्रुवारी २०२६ पासून राज्यभर सुरू झाली असून भिवंडी तालुक्यातील पडघे विभागात परीक्षा शांततेत आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडत आहे. विभागातील चार परीक्षा केंद्रांवर एकूण ७५७ विद्यार्थी परीक्षेला बसले असून पहिल्याच दिवशी मराठी विषयाचा पेपर कोणताही अनुचित प्रकार न घडता सुरळीत पार पडला. पडघे विभागातील शारदा विद्यालय पडघे, आर. के. पालवी इंग्रजी शाळा, टी. ए. पाटील इंग्रजी शाळा आणि के. एम. ई. एस. उर्दू हायस्कूल या चार केंद्रांवर परीक्षा सुरू आहे.

# १५ वर्षांच्या मुलीवर अत्याचार करणाऱ्या नराधमास २० वर्षे सश्रम कारावास



**नांदेड जिल्हा: (समर्थ गांवकरी)**

लग्नाचे खोटे आमिष दाखवून एका १५ वर्षीय अल्पवयीन मुलीचे अपहरण करून तिच्यावर पाशवी अत्याचार करणाऱ्या नराधमाला बिलोली न्यायालयाने कठोर शिक्षा सुनावली आहे. आरोपी रामदास मोतीराम काचेबाईनवाड (वय ३२, रा. कासराळी, ता. बिलोली) याला २० वर्षे सश्रम कारावास आणि दहा हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावण्यात आली असून, दंड न भरल्यास अतिरिक्त ३ वर्षे सश्रम कारावासाची तरतूदही न्यायालयाने केली आहे. दिनांक ९ ऑक्टोबर २०२३ रोजी पहाटे ३:०० वाजेच्या सुमारास आरोपीने पीडित अल्पवयीन मुलीला लग्नाचे आमिष दाखवून तिच्या पालकांच्या ताब्यातून पळवून नेले होते. त्यानंतर तिच्या मनाविरुद्ध शारीरिक संबंध प्रस्थापित केले.

याप्रकरणी पीडितेच्या वडिलांनी बिलोली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. त्यानुसार आरोपीवर रामदास मोतीराम काचेबाईनवाड याच्यावर भादंवि कलम ३६६(अ), ३७६ (२)(न), ३७६(३) व पोक्सो कायद्याच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणाचा सखोल तपास करून महिला पोलीस उपनिरीक्षक बळेगावे यांनी न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले. खटल्यादरम्यान सरकार पक्षातर्फे एकूण ६ साक्षीदार तपासण्यात आले. सरकारी अभियोक्त्यांचा प्रबळ युक्तिवाद आणि भक्कम पुराव्यांच्या आधारे, मा. जिल्हा न्यायाधीश-१ तथा अति. सत्र न्यायाधीश श्री. वि. ब. बोहरा यांनी आरोपीला दोषी ठरवून २० वर्षे सश्रम कारावास दहा हजार रुपये आर्थिक दंड दंड न भरल्यास अतिरिक्त ३ वर्षे सश्रम कारावास याप्रमाणे शिक्षा सुनावली आहे. सदर प्रकरणात सरकारच्या वतीने सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. संदीप भीमराव कुंडलवाडीकर व ॲड. जयेश संदीप अग्रवाल यांनी काम पाहिले. त्यांना पैरवी कर्मचारी पो.का. १६८ परमेश्वर अबनाचे (पो.स्टे. बिलोली) यांनी मोलाचे सहकार्य केले.या निकालामुळे समाजात वावरणाऱ्या अशा विकृत प्रवृत्तींना मोठा जरब बसला असून, पीडितेच्या कुटुंबाला न्याय मिळाल्याची भावना व्यक्त होत आहे.

# तरुण संशोधक चि. प्रतिक मधुकर गोर्डे याची शैक्षणिक क्षेत्रातील झेप

■ शाळेपासून आंतरराष्ट्रीय स्तरावरील पीएचडी संशोधनापर्यंतचा प्रेरणादायी प्रवास

**पिंपळगाव : (समर्थ गांवकरी)**

पिंपळगाव निपाणी (ता. अकोले) येथील सर्वसामान्य कुटुंबातील चि.प्रतिक मधुकर गोर्डे या तरुण संशोधकाने शैक्षणिक क्षेत्रात सातत्यपूर्ण परिश्रम,गुणवत्तापूर्ण संशोधन आणि राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवरील कामगिरीच्या जोरावर उल्लेखनीय यश संपादन केले आहे.सध्या तो भारत सरकारच्या प्रतिष्ठेच्या DST INSPIRE Fellowship अंतर्गत National Institute of Technology Rourkela, ओडिशा येथे पीएचडी संशोधन करत आहेत.



प्रतिक याचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण पिंपळगाव निपाणी येथील शाळेत झाले. दहावीच्या परीक्षेत त्यांनी प्रथम क्रमांक मिळवत शैक्षणिक गुणवत्तेची छाप पाडली. पुढे त्याने श्रमिक जुनियर कॉलेज संगमनेर येथे अकरावी-बारावी पूर्ण केली. उच्च शिक्षणासाठी त्यांनी महाराष्ट्र कृषी सीईटीतून प्रवेश मिळवत श्रमशक्ती कॉलेज मालदड येथून बी.टेक. (फूड टेक्नॉलॉजी) पदवी संपादन केली. पदवी अभ्यासक्रमात त्यांनी प्रथम क्रमांक मिळवून विद्यापीठातही अव्वल स्थान पटकावले.यानंतर त्यांनी उच्च शिक्षणासाठी Sant Longowal Institute of Engineering and Technology (SLIET), संग्रूर (पंजाब) येथे एम.टेक. पूर्ण केले. एमटेकमध्येही प्रथम क्रमांकासह गोल्ड मेडल प्राप्त करून त्यांनी शैक्षणिक उत्कृष्टतेची परंपरा कायम राखली.पुढे त्यांनी राष्ट्रीय स्तरावरील GATE व NET या स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण केल्या. त्यांच्या गुणवत्तेची दखल घेत भारत सरकारकडून प्रतिष्ठेची DST INSPIRE Fellowship मिळाल्यानंतर त्याने NIT राउरकेला येथे पीएचडीसाठी प्रवेश घेतला. सध्या ते "अन्न व कृषी उद्योगांसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) अनुप्रयोग" या अत्याधुनिक व महत्त्वपूर्ण विषयावर संशोधन करत आहेत. त्यांच्या संशोधनाचे निष्कर्ष विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय जर्नल्समध्ये प्रकाशित झाले असून त्यांनी अनेक राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये संशोधन सादर करून पुरस्कारही प्राप्त केले आहेत. त्याला नुकत्याच थायलंड येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय रिसर्च संमेलनात उत्कृष्ट संशोधन कार्यासाठी बेस्ट रिसर्च पारितोषकाने सन्मानित करण्यात आले. तसेच चंदीगड येथे झालेल्या 7th Global Agri Meet Conference मध्ये त्याला Best PhD Research Scholar म्हणून सन्मानित करण्यात आले. ग्रामीण पार्श्वभूमीतून येत जागतिक स्तरावर संशोधनात उल्लेखनीय स्थान निर्माण करणाऱ्या प्रतिक गोर्डे याचा हा प्रवास अनेक विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

# शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण

**शिवनेरी : (समर्थ गांवकरी)**

नारायणगाव येथून मेन लाईन ३३ के व्ही सातत्याने फॉल्ट झाल्यामुळे शेतकरी वर्गात सातत्याने चिंतेचे वातावरण पसरलेले आहे . याबाबत खासदार डॉ . अमोल कोल्हे व आमदार शरद सोनवणे व तहसीलदार सुनील शेळके यांनी तातडीने लक्ष घाला अशी चर्चा या भागात शेतकऱ्यांमध्ये सुरू आहे . नारायणगाव येथून येणारी मेन लाईन कुमशेत, गोळेगाव , पिंपळगाव सिद्धनाथ, अलदरे , महाबरेवाडी , सुसर बाग, विठ्ठलवाडी , हापुस बाग , वडज धामणखेल बेलसर , येणेरे , बस्ती , सावरगाव व इतर परिसरात शेतकऱ्यांना खूपच त्रास लाईन फॉल्ट होत आहे. त्यामुळे माणिकडोह येथून येणारी मेन लाईन सातत्याने बंद ठेवण्यात येत आहे.

# PURE EV नेवासा दाखल; ई-मोबिलिटीला मिळणार नवी गती

**नेवासा : (समर्थ गांवकरी)**

भारतातील अग्रगण्य इलेक्ट्रिक दुचाकी उत्पादकांपैकी एक असलेल्या PURE EV कंपनीने नेवासा येथे आपल्या नव्या शोरूमचे उद्घाटन करून ग्रामीण व उपनगर भागात ईव्ही क्रांतीला नवी चालना दिली आहे. गांधी नगरसमोर, विकास फर्निचरजवळ नेवासा-नेवासा फाटा रोड येथे सुरू झालेल्या या शोरूममध्ये कंपनीच्या अत्याधुनिक इलेक्ट्रिक स्कूटर्स व मोटारसायकल्सची संपूर्ण श्रेणी उपलब्ध करण्यात आली आहे. नवीन शोरूममध्ये लोकप्रिय ePluto 7G Max आणि eTryst X यांसारखी मॉडेल्स ग्राहकांसाठी प्रदर्शित करण्यात आली असून, स्थानिक नागरिकांना पर्यावरणपूरक आणि किफायतशीर प्रवासाचा पर्याय उपलब्ध होणार आहे. यासोबतच PuREPower या ऊर्जा साठवणूक उत्पादनांचीही (Energy Storage) श्रेणी येथे उपलब्ध करून देण्यात आली आहे,




ज्यामुळे घरे व व्यवसायांसाठी स्वच्छ ऊर्जेचा वापर सुलभ होणार आहे. कंपनीच्या मते, हा विस्तार PURE EV च्या देशव्यापी वाढीच्या धोरणातील महत्त्वाचा टप्पा आहे. स्वदेशी संशोधन व उत्पादनावर भर देत कंपनी इलेक्ट्रिक मोबिलिटी सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करत आहे. पुढील ३० महिन्यांत देशभरात २५० नवीन डीलरशिप सुरू करण्याचे कंपनीचे उद्दिष्ट असून, त्यामुळे राष्ट्रीय स्तरावरील नेटवर्क ३२० पेक्षा अधिक आउटलेट्सपर्यंत विस्तारण्याची योजना आहे. लांब पल्ल्याच्या ईव्ही वाहनांची वाढती मागणी, सरकारच्या अनुकूल धोरणे आणि वाढती जनजागृती यामुळे इलेक्ट्रिक वाहनांचा स्वीकार वेगाने वाढत आहे. या पार्श्वभूमीवर नेवासा येथे सुरू झालेले PURE EV चे शोरूम स्थानिक ग्राहकांसाठी पर्यावरणपूरक पर्याय उपलब्ध करून देण्यासोबतच स्वच्छ मोबिलिटी आणि ऊर्जा स्वातंत्र्याकडे भारताच्या वाटचालीस पाठबळ देणार असल्याचे कंपनीने सांगितले.

# मुंबईत कठोर निर्देश... पण जामखेडकडे कधी?

**जामखेड : (समर्थ गांवकरी)**

महानगरपालिका हद्दीतील वाढत्या अतिक्रमणांवर कठोर भूमिका घेत अहवाल सादर करण्याचे निर्देश देणारे विधानपरिषद सभापती प्रा. राम शिंदे यांनी आता आपल्या स्वतःच्या मतदारसंघातील जामखेड शहरातील अतिक्रमणाच्या प्रश्नाकडेही तितक्याच ताकदीने लक्ष द्यावे, अशी जोरदार मागणी नागरिकांतून होत आहे. मुंबईत अतिक्रमणांविरोधात प्रशासनाला धारेवर धरणारे नेते जामखेडमध्ये मात्र शांत का? असा थेट सवाल सर्वसामान्य नागरिक विचारत आहेत. जामखेड शहरातील मुख्य रस्ते, बाजारपेठ तसेच महामार्गालगत वाढलेली अनधिकृत बांधकामे आणि फूटपाथवरील अतिक्रमण यामुळे शहराचा श्वास गुदमरू



लागला आहे. वाहतूक कोंडी, अपघातांचा वाढता धोका आणि नागरिकांना भेडसावणाऱ्या दैनंदिन अडचणी गंभीर बनल्या आहेत.अतिक्रमणामुळे पाणीपुरवठा लाईन, गटारकामे आणि रस्ते रुंदीकरणाच्या कामांनाही अडथळे निर्माण होत आहेत. त्यामुळे विकासकामे रखडत असून प्रशासनालाही नियोजनबद्ध काम करणे कठीण होत आहे. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी अतिक्रमणमुक्ती हा पहिला आणि महत्त्वाचा टप्पा असल्याचे स्थानिकांचे मत आहे.

# जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानंतरही जामखेडमधील अतिक्रमण हटविण्यात दिरंगाई

## नगरपरिषद सज्ज, राष्ट्रीय महामार्ग प्रशासन गप्प

**जामखेड : (समर्थ गांवकरी)**

जामखेड शहरातील वाढत्या वाहतूक कोंडीमुळे नागरिक हैराण झाले असून अतिक्रमण हटविण्याच्या कारवाईकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. बस स्थानकापासून शासकीय दूध संघापर्यंत दररोज मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होत असून अवघा एक किलोमीटरचा रस्ता पार करण्यासाठी नागरिकांना तब्बल दोन तासांचा वेळ लागत आहे.जामखेड शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्र. ५४८ डी या मार्गावरील इतर ठिकाणची अतिक्रमणे हटविण्यात आली असली तरी जामखेड शहरातील अतिक्रमणे मात्र अद्याप कायम आहेत. नगरपरिषद प्रशासन, पोलीस प्रशासन व तहसील प्रशासन अतिक्रमण हटविण्यासाठी सज्ज असल्याचे सांगितले जात असले तरी राष्ट्रीय महामार्ग विभागाचे अधिकारी व संबंधित ठेकेदार यांच्याकडून वेळकाढूपणा होत असल्याची चर्चा आहे.सदर महामार्गाची शासकीय हद्द रस्त्याच्या मध्यापासून दोन्ही बाजूस प्रत्येकी १५ मीटर (५० फूट) आहे.



या हद्दीत उभारलेली नियमबाह्य बांधकामे व टपऱ्या प्रस्तावित रस्ते रुंदीकरणास अडथळा ठरत आहेत. परिणामी शहरातील विकासकामे रखडली असून उजनी धरणातून होणारी पाणीपुरवठा योजना देखील ठप्प असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

यापूर्वी बसस्थानक ते खर्डा चौक दरम्यान काही अतिक्रमणे हटविण्यात आली होती; मात्र रस्त्याचे काम वेळेत पूर्ण न झाल्याने पुन्हा अतिक्रमणे वाढली. काही ठिकाणी गटारांवर टपऱ्या उभारण्यात आल्या असून काही टपऱ्या भाड्याने दिल्याची माहिती समोर येत आहे. गटाराच्या सुमारे तीन मीटर (१० फूट) जागेत पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन टाकण्याचे नियोजन आहे. बीड रोड परिसरात तर गटारांवर पक्की बांधकामे असल्याची बाबही समोर आली आहे. त्यामुळे केवळ टपरीधारकांवर कारवाई करून मोठ्या बांधकामांकडे दुर्लक्ष होणार का? असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

जामखेड–सौताडा राष्ट्रीय महामार्गाच्या कामात अडथळा ठरणारी अतिक्रमणे हटविण्याबाबत बैठक घेऊन नगरपरिषदेने संबंधितांना सात दिवसांची नोटीस दिली होती. मात्र ठेकेदाराने वरिष्ठ कार्यालयाशी चर्चा करून पुढील कारवाईचे वेळापत्रक कळविण्यात येईल, असे सांगितल्याची माहिती आहे. त्या अनुषंगाने पुढील कारवाई करण्यात येणार असल्याचे मुख्याधिकारी अजय साळवे (जामखेड नगरपरिषद) यांनी स्पष्ट केले. विण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी आदेश दिले असतानाही राष्ट्रीय महामार्ग विभागाकडून अपेक्षित हालचाल दिसत नसल्याची नाराजी व्यक्त होत आहे. संबंधित अधिकारी सुजित चेमटे यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्यांचा मोबाईल बंद असल्याचे सांगितले जाते. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशालाच केराची टोपली दाखवली जात आहे का? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

# गोदावरी नदीपात्रात नांदेड ग्रामीण पोलीसांची कारवाई

**नवीन नांदेड : (समर्थ गांवकरी)**

गोदावरी नदीच्या पात्रात एकच वेळी पाच ठिकाणी छापा कार्यवाही करून अवैध रित्या वाळू उपसा करणाऱ्या अनेक जणा विरुद्ध ग्रामीण पोलीस स्टेशन पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यवाही करून 2,63,25,000 मुद्देमाल जप्त केला असुन गुन्हा दाखल करण्यात आला असून या कार्यवाही प्रकरणी वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी ग्रामीण पोलीस स्टेशन अधिकारी कर्मचारी यांच्ये अभिनंदन केले आहे पोलीसांनी दिलेल्या माहिती पत्रकार नुसार,पोलीस ठाणेनांदेड ग्रामीण गुरन 162/2026 कलम 303(2),3(5) भा.न्या.सं, सहकलम 48 (7).48(8) महराष्ट्र जमीन महसूल अधिनियम कलम 9,15 पर्यावरण संरक्षण अधिनियम व कलम 3,7 सार्वजनिक संपती नुकसान प्रतिबंधक अधिनियमगुन्हा घडला तारीख वेळ व ठिकाण



गोपनीय माहीती वरून दिनांक 22 फेब्रुवारी रोजी वेळ 15.30 वाजता मौ. वांगी, इंजेगाव, नागापुर, सिध्दनाथ, पुणेगाव, हद्दीतील गोदावरी नदीपात्रात फिर्यादीचे नाव व पत्तागवेंद्र गंगाधर सिरमलवार व्यवसाय पोकॉ/ नेमणुक पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीन गुन्हा दाखल तारीखदिनांक 23/02/2026 रोजी 04.51 यांचे मार्गदर्शनाखाली अविनाश कुमार, पोलीस अधीक्षक, नांदेड श्रीमती अर्चना पाटील, अपर पोलीस अधीक्षक, भोकर सुरज गुरव, अपर पोलीस अधीक्षक, नांदेड मा. श्री प्रशांत शिंदे, उप विभागीय पोलीस अधिकारी, इतवारा

गुन्हा उघडकीस अणणारे पोलीस अधिकारी व अंमलदार पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर, पोउपनि कुसमे, पोउपनि भिसे, पोहेकॉ जाधव, पोहेकॉ/ केंद्रे, पोकॉ/गवेंद्र सिरमलवार, पोकॉ/शंकर, पोकॉ शेख समीर, पोकॉ/ चावरे सर्व नेमणुक पो.स्टे. नांदेड ग्रामीण. आरोपीचे नाव1 ) करण सोनटक्के 2) शहाजी सोनटक्के 3) छगन चुकतरे सर्व रा. ब्राम्हणवाडा 4) गजानन म्हस्के रा. नागापुर व इतरअनोळखी 07 इसमजप्त मुद्देमाल / एकूण मुद्देमाल 1) पाच मोठ्या लोखंडी बोटी प्रती बोट किंमत 30,00,000/-रू असे एकुन 1,50,00,000/-रू. 2) पाच मध्यम लोखंडी बोटी (फायबर बोटी) इंजिनसह प्रती बोट किंमत अंदाजे 15,00,000/-रू असे एकुन 75,00,000/-रू 3) अंदाजे 85 ब्रास रेती (वाळु) किंमत 4,25,000/- रुपये, 4) तिन इंजन 9,00,000/- रूपये 5) एकुन 50 तराफे 25,00,000/- रूपये असा एकुण 2,63,25,000/-रू मुद्देमाल

थोडक्यात हकीकत अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक नांदेड यांनी ऑपरेशन फ्लश आऊट अंतर्गत अवैधरित्या गौण खनिज (रेती) उपसा व वाहतुक करणारे लोकांवर कारवाई करणे बाबत सर्व पोस्टे प्रभारी अधिकारी यांना आदेशित केले आहे.

त्या अनुषंगाने ओमकांत चिंचोलकर, पोलीस निरीक्षक पो.स्टे. नांदेड ग्रामीण हे दिनांक 22 फेब्रुवारी26 रोजी वरील अधिकारी व अंमलदार यांचे सह पो.स्टे. हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना 14.00 वाजता गोपनीय माहिती मिळाली की, मौ. वांगी, इंजेगाव, नागापुर, सिध्दनाथ, पुणेगाव, परीसरातील गोदावरी नदीपात्रात बोटी, इंजीन व तराफेच्या साहयाने अवैध रेती उपसा करूण साठवणुक होत आहे अशा माहीती वरूण वरील अधिकारी व अंमलदार असे मौ. वांगी, इंजेगाव, नागापुर, सिध्दनाथ, पुणेगाव, हद्दीतील गोदावरी नदीपात्रात वेळ अंदाजे 14.30 ते 24.00 वाजता पर्यत सलग 10 तास पाच ठिकाणी छापा करवाई केली असता नदी पात्रातुन बोटी, तराफे व इंजीनच्या सहयाने रेती काढणारे अनोळखी सात आरोपी पोलीसांना पाहुन पळुन गेले.

# डॉ. मोहिनी सूर्यवंशी यांना राज्यस्तरीय आरोग्यरत्न पुरस्कार

**तामसा : (समर्थ गांवकरी)**

तामसा प्राथमिक स्वास्थ्य केंद्र च्या वैद्यकीय अधिकारी डॉ. मोहिनी सूर्यवंशी यांना राज्यस्तरीय आरोग्य रत्न पुरस्कार सन्मानित करण्यात आलं. आज दि २२ फेब्रुवारी रोजी मुंबई येथे सभागृह यशवंतराव चव्हाण सेंटर मुंबई येथे बाळासाहेब ठाकरे आरोग्यरत्न पुरस्कार आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर,आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांच्या हस्ते राज्यस्तरीय पुरस्कार जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ संगीता देशमुख यांच्या उपस्थितीत प्राथमिक आरोग्य केंद्र तामसा येथे कार्यरत डॉ.मोहिनी सूर्यवंशी वैधकीय अधिकारी यांना प्रदान करण्यात आला. तालुका आरोग्य अधिकारी डॉ संजय मुरमुरे यांच्या नियंत्रणाखाली असलेले जिल्ह्यात अव्वल ठरलेले प्रा आ केंद्र तामसा मागील सलग तीन वर्ष प्रसूती जिल्ह्यात प्रथम कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया सलग तीन वर्ष शत



प्रतिशत उद्दिष्ट पूर्ण, सलग तीन वर्ष पुरुष शस्त्रक्रिया, क्षयरोग रुग्ण, कुष्ठरुग्ण, हत्तीपाय रुग्ण, इतर राष्टीय कार्यक्रमामध्ये जिल्ह्यात प्रथम ठरल्याने आज राज्यस्तरीय पुरस्कारा साठी पात्र ठरले असून .मान्यवरांचा हस्ते हा राज्यस्तरीय पुरस्कार देण्यात आलं.

सन्मानासाठी कुटुंब कल्याण पुरुष शस्त्रक्रिया सर्जन डॉ. साहेबराव भिसे, TL सर्जन डॉ दीपक कदम लेप्रोस्कॉपी सर्जन डॉ रमेश बोले,यांचे मोलाचे योगदान लाभले होते ,तसेच प्रसूतीसाठी वर्षा कऱ्हाळे,आदी परिचारिका विष्णू ढोले , मीनाक्षी राठोड यांचे खुप मोठे योगदान लाभले , पुरुष शस्त्रक्रिया प्रमोटर मध्ये संतोष सानप माळेगाव यांचे मोलाचे योगदान होते औषध निर्माण अधिकारी मारोती चव्हाण , सर्व समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्य सहायक पुरुष व स्त्री, सर्व आरोग्य सेवक व सेविका, शिपाई या सर्वांचे तसेच या प्रा आ केंद्र तामसा संबंधित तालुक्यातील, जिल्ह्यातील सर्व अधिकारी कर्मचारी या सन्मानासाठी योगदान लाभले राज्यस्तरीय पुरस्कार मिळाल्याबद्दल डॉक्टर मोहिनी सूर्यवंशी यांचा सर्व स्तरावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# चेअरमन पदी मुसळे, व्हा. चे. कल्याणकर यांची निवड



**अर्धापूर : (समर्थ गांवकरी)**

तालुक्यातील आंबेगाव सेवा सहकारी सोसायटीच्या चेअरमनपदी आनंदराव मुसळे तर व्हाईस चेअरमन पदी उत्तमराव कल्याणकर यांची बिनविरोध निवड झाल्याची घोषणा निवडणूक निर्वाचन अधिकारी अरुणा केंद्रे, सहाय्यक व्ही. एस.गोरे,सचिव पंडित कपाटे यांनी जाहीर करतात उपस्थितांनी जल्लोषात निवडीचे स्वागत केले आहे. आंबेगाव सेवा सहकारी सोसायटी निवडणुक बिनविरोधपार पाडण्यासाठी गोविंदराव पाटील मुसळे,सरपंच प्रतिनिधी अमोल डोंगरे यांनी पुढाकार घेऊन सर्वांना विश्वासात घेऊन सेवा सहकारी सोसायटी बिनविरोध काढून चेअरमनपदी आनंदराव मुसळे तर व्हाईसचेअरमन उत्तमराव कल्याणकर यांची बिनविरोध निवड करण्यात आली यावेळी संचालक बालासाहेब देशमुख,भाऊराव भोकरकर, खंडू मुदखेडे,बालासाहेब मुसळे,रावसाहेब मुसळे,शिवानंद शिप्परकर,कल्याबाई भोकरकर,शिवनंदा शिप्परकर,बाजीराव डोंगरे, पांडुरंग जोंधळे आदी संचालकाची बैठक होऊन.या बैठकीत चेअरमन पदी आनंदराव मुसळे,तर व्हाईस चेअरमन पदी उत्तमराव कल्याणकर यांची बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर होतात सर्व चेअरमन व्हाईस चेअरमन व संचालकाचा सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या यावेळी प्रल्हाद मुसळे,रणजित मुसळे,केशव कल्याणकर खंडेराव कोरेवाड,पंडित खाडेकर आदीसह अनेक गावकरी मंडळी उपस्थित होते.आंबेगाव सहकारी सोसायटीवर भाजपाचे वर्चस्व प्रस्थापित केले असल्याची माहिती भाजपाचे गोविंदराव मुसळे पाटील यांनी दिली आहे.

# अण्णा हजारे यांचे कार्य जगाला दिशादर्शक

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांचे कार्य जगाला दिशादर्शक असून सर्वसामान्य जनतेसाठी हजारे यांनी आयुष्यभर योगदान देऊन सेवाभाव केला असल्याचे प्रतिपादन मुंबई येथील सामाजिक कार्यकर्ते गणेशशेठ बोंबले यांनी व्यक्त केले आहे. बोंबले यांनी रविवार दि.२२ रोजी राळेगण सिद्धी येथे भेट दिली तसेच ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांना भेटले तसेच गाव व परिसरातील विविध सामाजिक कार्याची पाहणी केली. यावेळी ते बोलत होते. बोंबले यांचा मित्र परिवार यावेळी उपस्थित होता . बोंबले यावेळी म्हणाले आजही हजारे यांना भेटल्यानंतर माझ्यासारख्या युवकांना प्रेरणादायी काम करण्याची महत्त्वाकांक्षा निर्माण होते.

# प्रदूषणाची राखेची येणारी घातक धूळ त्वरित बंद करा

**नवीन नांदेड : (समर्थ गांवकरी)**

सिडको हडको परिसरलगत असलेल्या औद्योगिक वसाहती मधून येणारी काळी धूळ राख त्वरित थांबविण्यात यावी अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा असे निवेदन सिडकोतील नगरसेवक व प्रतिनिधी सदस्य यांनी प्रदूषण विभागाचे उपप्रादेशिक अधिकारी शिंदे यांना निवेदन दिले आहे. सिडको हडको परिसरातील यापुर्वी औद्योगीक वसाहतीतून होणा-या प्रदुषणाच्या विरोधात निवेदन देण्यात आले होते,औद्योगिक वसाहत परिसरातील अ.क्र. कोहीनूर फिड्स लि.,,कपिल ॲग्रो, श्रीनिवासा कॅटर फिड्स,सिध्दा रामेश्वरा,श्रीनिवासा ॲग्रो या कंपन्याद्वारे सिडको- हडको परिसरात चिमणी द्वारे होणारे प्रदुषण अतिशय घातक असल्यामुळे सिडको हडको परिसरातील नागरीकांना अनेक प्रकारच्या रोगराई पसरत



## भाजपा नगरसेवक यांच्यी मागणी

आहेत,कारखान्याच्या विरोधात अनेक मोठमोठे आंदोलने यापूर्वी करण्यात आले होते. पंरतू काही दिवस काही हे प्रदुषण बंद करण्यात आले होते. गेल्या काही दिवसापासून या कारखान्याद्वारे पूर्वी प्रमाणे घातक अशी धुळ सिडको-हडको व गुंडेगाव परिसरात पसरत आहे.अनेक निवासस्थानी व गच्चीवर जिवनाश्यक दाळी ,गहु, ज्वारी यासह दैनंदिन वापरातील कपडे खराब झाले असून त्या धुळीपासून कॅन्सर, दमा व वेगवेगळे आजार झाले असुन यापुढे पण होण्याची शक्यत आहे.

या कारखान्यावर कायद्यानुसार कठोर कार्यवाही तात्काळ करण्यात यावी व काळी राख बंद करावी अशी मागणी मनपा प्रभाग क्रमांक 20 चे भाजपा नगरसेवक वैजनाथ देशमुख, सौ.सुवर्णा सतिश बसवदे , सौ.निरंजना राजू लांडगे ,माजी नगरसेवक संजय इंगेवाड व राजु लांडगे ,सतिश बस्वदे ,सिडको हडको परिसरातील महिला पुरुष यांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती. सिडको-हडको व गुंडेगाव येथील नागरीकांना या धुळीपासून मुक्त करावे,ही मागणी करण्यात आली धुळ बंद झाली नाही तर सिडको- हडको व गुंडेगाव नागरीकांच्या वतीने तीव्र आंदोलन उग्र स्वरुपाचे आंदोलन करण्यात येईल असा इशारा निवेदनाद्वारे दिला आहे.

# श्री गुरु गोबिंद सिंघजी अभियांत्रिकी व तंत्र शिक्षण संस्था, विष्णुपुरी, नांदेडची विद्यार्थिनी

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

श्री गुरु गोबिंद सिंघजी अभियांत्रिकी व तंत्र शिक्षण संस्था, विष्णुपुरी, नांदेड येथील बी.टेक. यंत्र अभियांत्रिकी शाखेत अंतिम वर्षात शिकत असलेली विद्यार्थिनी साक्षी तेजराम ठाकरे हिची "Scheepswerf Slob, Netherlands" या प्रतिष्ठित कंपनीमध्ये रु.६१.०० लाख प्रतिवर्ष (म्हनजेच जवळपास रु.४ लाख + इतर सोयी प्रतिमाह) वेतनावर निवड झाली आहे. मुलाखत प्रक्रिये मध्ये परिचय फेरी व तांत्रिक फेरी अश्या दोन फेऱ्या होत्या त्यात साक्षी तेजराम ठाकरे हिने कठोर परिश्रम, चिकाटी, बुद्धिमत्ता विभागीतील प्राध्यापकांचे मार्गदर्शन व प्राप्त केलेल्या तांत्रिक ज्ञानाच्या बळावर हे यश संपादन करून संस्थेचा नावलौकिक उंचावला आहे. हे यश SGGSIE&T परिवारासाठी अत्यंत अभिमानास्पद असून, त्याने संस्थेतील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी उदाहरण



निर्माण केले आहे. विशेष म्हणजे या संस्थेतून मेकॅनिकल विभागाची ही पहिली आंतरराष्ट्रीय प्लेसमेंट आहे.

साक्षी तेजराम ठाकरे हिचे प्राथमिक शिक्षण एस.टी. जोसेफ हायस्कूल, नागपूर येथे झाले असून तिने अभियांत्रिकी शिक्षणासाठी श्री गुरु गोबिंद सिंघजी अभियांत्रिकी व तंत्र शिक्षण संस्था विष्णुपुरी, नांदेड ची निवड केली. ती बी. टेक. यंत्र अभियांत्रिकीच्या अंतिम वर्षात शिकत असून, तिची "Scheepswerf Slob, Netherlands" या प्रतिष्ठित कंपनीमध्ये रु.६१ लाख प्रतिवर्ष वेतनावर निवड झाली आहे.

एस.जी.जी.एस. संस्थेत प्रवेश घेतल्यापासूनच ती विविध क्षेत्रात अभ्यासाबरोबरच विविध तांत्रिक स्पर्धेमध्ये आपला ठसा उमटवत आली आहे.

1. बी. टेक. यंत्र अभियांत्रिकीच्या दुसऱ्या वर्षात तिने राष्ट्रीय स्तरावरील रोबोकॉन २०२४ (आशिया पॅसिफिक आंतरराष्ट्रीय स्पर्धा) या रोबोटिक स्पर्धेत एसजीजीएसचे प्रतिनिधित्व केलेले आहे.
2. आरएनएक्सजी या कॉलेजच्या अधिकृत रोबोटिक्स क्लबचे वित्त प्रमुख आणि मुख्य सदस्य म्हणून तिने आपली जबाबदारी पार पडली आहे.
3. पदवीच्या तिसऱ्या वर्षात स्मार्ट इंडिया हॅकेथॉन या स्पर्धेत भाग घेवून स्मार्ट इंडिया हॅकेथॉन ही स्पर्धा जिंकलेली आहे. ज्यात रोख रु. १,००,०००/- चे पारितोषिक व प्रमाणपत्र मिळवले आहे. हार्डवेअर आवृत्ती (टीम लीड).
4. ग्रँड ॲम्बेसेडर कारचे प्रदर्शन, औद्योगिक रोबोटिक्स शाखा आणि इतर अनेक विभागीय प्रकल्पात तिचा मोलाचा सहभाग होता.

संस्थेचे संचालक डॉ. मनेश कोकरे यांनी संस्थेतील विद्यार्थ्यांना तांत्रिक कौशल्या विकसित करण्यासाठी नेहमीच प्रोत्साहन व सर्व साहित्य (Project Material) संस्थेमार्फत असतात. त्याचाच परिपाक म्हणून विभागप्रमुख डॉ. एस. जोगी आणि डॉ. ए. मिश्रा यांच्या प्रेरणेतून प्रा. तिलक जाधव, प्रा. डॉ. जीत पाटील, जे एस सारडा यांचे मार्गदर्शनाखाली सदर विद्यार्थिनीने हा यश संपादन केलेले आहे. हे यश SGGSIE&T परिवारासाठी अत्यंत अभिमानास्पद असून, त्याने संस्थेतील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी उदाहरण निर्माण केले आहे.

# वासुंद्यातील नानकर मळा-दावलमलिक रस्त्याचे भूमिपूजन

## सुजित झावरे पाटील यांच्या हस्ते शुभारंभ; शेतकऱ्यांना मोठा दिलासा



**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

वासुंदे गावातील नानकर मळा ते दावलमलिक रस्त्याचे भूमिपूजन जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष व शिवसेना नेते सुजित झावरे पाटील यांच्या शुभहस्ते पार पडले.

या रस्त्याच्या विकासामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. पूर्वी शेतकऱ्यांना अवजार, ट्रॅक्टर व पिकाची ने-आण करताना अडचणी येत होत्या. आता हा रस्ता सुधारित होत असल्याने शेतमालाची वाहतूक सोपी होईल. रस्त्याचे रुंदीकरण करून पक्का रस्ता झाल्यास वाहतूक सुरळीत होईल. अशी अपेक्षा शेतकऱ्यांनी व्यक्त केली.

वासुंदे परिसरात गेल्या काही काळात स्थानिक अनेक रस्त्यांचे प्रश्न सुजित झावरे पाटील यांच्यामुळे मार्गी लागले आहेत.

यामुळे शेतकरी वर्गात समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. ग्रामस्थांनी सुजित झावरे पाटील यांच्यासह स्थानिक नेत्यांचे आभार मानले.

हा रस्त्यामुळे ग्रामीण भागाच्या प्रगतीला चालना मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. यावेळी गुरुदत्त पतसंस्था चेअरमन बा. ठ. झावरे, जेष्ठ नेते भागूजी झावरे, माजी उपसरपंच शंकर बर्वे, शरद पाटील, रणजित पाटील, सरपंच विमल झावरे, उपसरपंच बाळासाहेब शिंदे, चेअरमन सूर्यभान भालेकर, व्हा. चेअरमन लक्ष्मण झावरे, विलास साठे, पो. मा. झावरे, रामदास झावरे,भाऊसाहेब सैद, बाळासाहेब झावरे, लहानू झावरे, रा. बा. झावरे, इंजि. निकील दाते, दिलीप पाटोळे, सोन्याबापू बर्वे, बी एम झावरे सर, सुभाष शिंदे, श्रीकांत साळुंके, मारुती उगले, शांताराम झावरे, शिवाजी झावरे,निवृत्ती बर्वे, संपत झावरे, भिकाजी झावरे, पा. ल. बर्वे, सुभाष राऊत, अंकुश झावरे, स्वप्नील झावरे, संभाजी झावरे, डॉ. प्रसाद झावरे, निवृत्ती झावरे, ओंकार झावरे, संदीप झावरे, अक्षय झावरे, आदी यावेळी उपस्थित होते.

> वासुंदे येथील स्थानिक रस्त्यांचा प्रश्न सुजित झावरे पाटील यांच्यामुळे मार्गी लागत आहे. त्यामुळे स्थानिक वाहतूक सोपी झाली असून शेतकरी वर्गामध्ये आनंदाचे वातावरण आहे. रस्त्यांमुळे खऱ्या अर्थाने ग्रामीण विकासाला चालना मिळत आहे. यापुढेही असेच प्रश्न मार्गी लावून सर्वसामान्यांच्या प्रश्नांना न्याय द्यावा.
>
> **- बा. ठ. झावरे (चेअरमन, गुरुदत्त पतसंस्था)**



# स्वारातीम विद्यापीठात संत गाडगे बाबा जयंती साजरी

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीतील स्वागत कक्षामध्ये आज सोमवार, दि.२३ फेब्रुवारी, २०२६ रोजी संत गाडगे बाबा यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या प्रसंगी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. मनोहर चासकर यांच्या हस्ते संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक हुशारसिंग साबळे, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ.शैलेश वाढेर, ज्ञानस्त्रोत केंद्राचे संचालक डॉ. जगदीश कुलकर्णी, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ.मारुती गायकवाड, उपकुलसचिव डॉ. रवि सरोदे, कार्यकारी अभियंता तानाजी हुस्सेकर, सहा.कुलसचिव रामदास पेद्देवाड, अनिरुद्ध रेहगावकर, जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम, अधीक्षक के. डी. पाटील, डॉ.लक्ष्मीकांत आगलावे, हेमलता पाटील व शिवाजी चांदणे यांची प्रमुख उपस्थिती होती.

# अर्धापूर नगरपंचायतीने राबविले स्वच्छता अभियान, संत गाडगेबाबा यांच्या जयंती उत्साहात साजरी

**अर्धापूर : (समर्थ गांवकरी)**

"हाती झाडू, मुखी राष्ट्रसंतांचे नाव" अशा उत्साही वातावरणात अर्धापूर शहरात स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. निमित्त होते थोर समाजसुधारक संत गाडगेबाबा यांच्या जयंतीचे. केवळ हार-फुले अर्पण करून औपचारिकता न पाळता, प्रत्यक्ष कृतीतून गाडगेबाबांच्या विचारांचा वारसा जपत नगरपंचायत प्रशासनाने शहराचा कानाकोपरा चकाचक केला. या मोहिमेची सुरुवात शहरातील गजबजलेल्या बसस्थानक परिसरापासून झाली. 'स्वच्छता हीच सेवा' हा मंत्र जपत लोकप्रतिनिधी आणि प्रशासकीय अधिकारी स्वतः रस्त्यावर उतरले.




सार्वजनिक ठिकाणांवरील साचलेला कचरा, प्लास्टिक आणि अस्वच्छता दूर करून परिसराचा चेहरामोहरा बदलण्यात आला. प्रारंभी मोहिमेच्या सुरुवातीला गाडगेबाबांच्या प्रतिमेचे पूजन करून स्वच्छतेचा निर्धार करण्यात आला. या उपक्रमाचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे केवळ आदेश न देता मुख्याधिकारी जगदीश दळवी यांच्यासह सर्व विभागांच्या प्रमुखांनी स्वतः हातात झाडू घेऊन श्रमदान केले. प्रशासकीय अधिकाऱ्यांचा हा उत्साह पाहून नागरिकांमध्येही स्वच्छतेबाबत सकारात्मक संदेश गेला. प्रमुख उपस्थिती या मोहिमेत लोकप्रतिनिधी आणि प्रशासकीय यंत्रणेचा मोठा सहभाग पाहायला मिळाला. नगराध्यक्षा सौ.वैशाली प्रवीण देशमुख, उपनगराध्यक्ष मुक्तेदरखॉन पठाण, मुख्याधिकारी: जगदीश दळवी, माजी नगराध्यक्ष छत्रपती कानोडे,व्यंकटी राऊत, ॲड.योगेश माटे सर्व नगरसेवक व कर्मचारी. सहभाग होता. प्रशासकीय पथकाचा सक्रीय सहभाग घेत केवळ औपचारिकता न पाळता प्रशासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनीही हातात झाडू घेऊन श्रमदान केले. यावेळी नगर अभियंता संदीप वानखडे, स्वच्छता निरीक्षक कैलास गायकवाड, लेखापाल रामसिंग लोध यांच्यासह शरद चापके, अक्षय कांबळे,सुंदर सरगर,विशाल वाघमारे, विश्वास चिलकेवाड व नगरपंचायतीच्या स्वच्छता दूतांनी विशेष परिश्रम घेतले.

> "केवळ आजचा दिवस नव्हे, तर'स्वच्छ अर्धापूर, सुंदर अर्धापूर'हे आमचे कायमस्वरूपी ध्येय आहे. नागरिकांनी कचरा कुंडीतच टाकावा आणि शहराला प्रदूषणमुक्त ठेवण्यासाठी सहकार्य करावे, हीच गाडगेबाबांना खरी श्रद्धांजली ठरेल." **— जगदीश दळवी (मुख्याधिकारी, न.पं. अर्धापूर)**

### एसएमएफजी इंडिया क्रेडिटने "सर्वोत्तम सेवा" उपक्रमांतर्गत पशु विकास दिनाद्वारे 1.55 लाखांहून अधिक

# ग्रामीण जीवनांवर सकारात्मक प्रभाव

**अहिल्यानगर: (समर्थ गांवकरी)**

भारतातील अग्रगण्य एनबीएफसींपैकी एक असलेल्या एसएमएफजी इंडिया क्रेडिटने 14 फेब्रुवारी 2026 रोजी आपल्या प्रमुख पशुधन कल्याण आणि ग्रामीण उपजीविका उपक्रमाचा 8 वा पशु विकास दिन (PVD) यशस्वीरीत्या पूर्ण केला. 'सर्वोत्तम सेवा: पशु, परिवार आणि प्रगती' या संकल्पनेवर आधारित या उपक्रमाने पशुधनाचे आरोग्य, कुटुंबाचे कल्याण आणि शाश्वत प्रगती यांना बळकटी देत सर्वांगीण ग्रामीण विकासाबाबत संस्थेची बांधिलकी अधिक दृढ केली. 2014 मध्ये सुरू करण्यात आलेला पशु विकास दिन हा उपक्रम पशुपालन करणाऱ्या व्यक्तींच्या अत्यावश्यक आरोग्य गरजांकडे लक्ष देतो आणि त्यांना मोफत पशुवैद्यकीय



सेवा व तज्ज्ञ मार्गदर्शन उपलब्ध करून देतो. गेल्या काही वर्षात हा उपक्रम देशातील सर्वात मोठ्या एकदिवसीय पशुधन कल्याण कार्यक्रमांपैकी एक म्हणून विकसित झाला आहे. एसएमएफजी इंडिया क्रेडिटने 1.55 लाखांहून अधिक जीवनांवर सकारात्मक प्रभाव साधला असून, यात सुमारे 1.4 लाख गुरांवर उपचार तसेच 14,000 हून अधिक लोकांना आरोग्यसेवा सहाय्य देण्यात आले. त्यायोगे 30,000 हून अधिक कुटुंबांना लाभ झाला. हा उपक्रम 16 राज्यांमध्ये आणि एसएमएफजी ग्रामशक्तीच्या 510 शाखांमध्ये राबविण्यात आला. त्यातून कंपनीची ग्रामीण भारतातील सखोल पोहोच दिसून येते. महाराष्ट्रात पशु विकास दिन 59 ठिकाणी आयोजित करण्यात आला आणि 19,000 हून अधिक जनावरांना अत्यावश्यक आरोग्य सेवा पुरविण्यात आल्या.

त्याचा लाभ 5,200 हून अधिक कुटुंबांना झाला. प्रत्येक शिबिरात स्थानिक पशुवैद्यकीय डॉक्टरांकडून मोफत तपासणी, जनावरांसाठी मोफत औषधांचे वितरण व लसीकरण, तसेच दूध देणाऱ्या पाळीव गुरांचे उत्पादन वाढविण्यासंदर्भात मार्गदर्शन अशा सेवा देण्यात आल्या. उपक्रमाच्या यशस्वी समारोपाबद्दल भाष्य करताना एसएमएफजी इंडिया क्रेडिटचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. रवी नारायणन म्हणाले, "'सर्वोत्तम सेवा' म्हणजे सेवेला तिच्या सर्वोच्च मानकांवर पोहोचवणे. अशा वेळी सह अनुभूती परिणामांशी जोडली जाते आणि हेतू वा उद्दिष्टाचे चीरकालीन बदलामध्ये रुपांतर होते. ग्रामीण भारतात पशुधनाचे आरोग्य, कुटुंबांची सुरक्षितता आणि आर्थिक प्रगती या सगळ्या गोष्टी परस्परांशी घट्ट जोडलेल्या आहेत.

जनावरांची काळजी घेऊन, उपजीविका बळकट करून आणि समुदायाच्या स्वास्थ्याला पाठबळ देऊन पशु विकास दिन हा या परिसंस्थेला पोषक बनविण्याच्या आमच्या बांधिलकीचे प्रतीक आहे. या उपक्रमाद्वारे शेती करणाऱ्या कुटुंबांना सक्षम करतील आणि तळागाळातून सर्वसमावेशक विकासाला चालना देतील असे शाश्वत परिणाम निर्माण करण्याचा आम्ही प्रयत्न करतो."

## Physics Wallahच्या १६ विद्यार्थ्यांची JEE Main 2026 मध्ये दमदार कामगिरी

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

JEE Main २०२६ (सेशन १) परीक्षेत पुण्यातील Physics Wallah (पीडब्ल्यू) संस्थेच्या १६ विद्यार्थ्यांनी ९८.५ टक्क्यांहून अधिक गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. त्यापैकी पुण्यातील निवासी जिशान सुरज तांबोळी याने ९९.७६ टक्के गुण मिळवत विशेष लक्ष वेधले. ९९ टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये तो आघाडीवर राहिला. प्रथमेश खोरे (९९.५९ टक्के) आणि सोनिया धोंद्रे (९९.४७ टक्के) यांनीही उत्कृष्ट कामगिरी करत शहराचे नाव उज्ज्वल केले. या निकालानंतर विद्यार्थ्यांच्या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे. National Testing Agency (एनटीए) यांनी १६ फेब्रुवारी २०२६ रोजी JEE Main सेशन १चा निकाल जाहीर केला. ही परीक्षा



देश-विदेशातील ६५८ केंद्रांवर पार पडली होती. देशभरातील विविध राज्यांमध्येही पीडब्ल्यूच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश मिळवले. जम्मू-काश्मीरमधील अमितेश्वर सिंग (९९.८३ टक्के), मेघालयमधील विष्णू भारद्वाज उपाध्याय (९८.९६ टक्के) आणि अंदमान-निकोबार बेटांतील हेमाक्षी कुमार (९८.२६ टक्के) यांनी आपल्या राज्यात अव्वल स्थान पटकावले. पीडब्ल्यूच्या तंत्रज्ञान-सक्षम विद्यापीठ केंद्रातून तयारी केलेल्या जिशानने विषयानुसारही उच्च गुण मिळवले. भौतिकशास्त्रात ९९.५५ टक्के, रसायनशास्त्रात ९९.७२ टक्के आणि गणितात ९९.४४ टक्के गुण मिळवत त्याने सर्वांगीण प्रावीण्य सिद्ध केले. पीडब्ल्यूचे विद्यापीठ-ऑफलाइनचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित गुप्ता यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत पुढील JEE Advanced परीक्षेसाठी अधिक जोमाने तयारी करण्याचे आवाहन केले. अपेक्षित गुण न मिळालेल्या विद्यार्थ्यांनी निराश न होता पुढील सेशनसाठी प्रयत्न सुरू ठेवावेत, असेही त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे विविध भौगोलिक भागांतील विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षांची तयारी अधिक सुलभ करण्याच्या पीडब्ल्यूच्या प्रयत्नांना बळ मिळाल्याचे मानले जात आहे.

## 'घरवाली पेडवाली'च्या सेटवर सीरत कपूरची पोपट 'रिओ' सोबत खास मैत्री

**पुणे: (समर्थ गांवकरी)**

घरवाली पेडवाली या अलौकिक शक्तींवरील हॉरर-कॉमेडी मालिकेत सावीची भूमिका साकारणारी अभिनेत्री सीरत कपूर सेटवरील उत्साही उपस्थितीसाठी ओळखली जाते. नुकत्याच झालेल्या शूटिंगदरम्यान तिला एक अनोखा सहकलाकार मिळाला—'रिओ' नावाचा प्रशिक्षित पोपट. या अनपेक्षित सहवासामुळे शूटिंगदरम्यान हलकाफुलका आनंद आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. दीर्घकाळ चालणाऱ्या शूटिंगमध्ये रिओसोबत झालेली मैत्री सीरतसाठी संस्मरणीय ठरली. या अनुभवाबद्दल बोलताना ती म्हणाली, "मी पहिल्यांदाच पक्ष्यासोबत, विशेषतः पोपटासोबत शूटिंग करत होते. रिओ उत्तम प्रशिक्षित आहे आणि



सीनदरम्यान शिस्तबद्धपणे प्रतिक्रिया देतो. त्याच्यासोबत गप्पा मारणे आणि संवाद साधणे अभिनेत्री म्हणून माझ्यासाठी खूप रोमांचक अनुभव होता." सीरतने सांगितले की, सध्याच्या एपिसोडमध्ये तिच्या पात्राचे रिओसोबत काही हृदयस्पर्शी आणि हलकाफुलके प्रसंग आहेत, जे प्रेक्षकांना नक्की आवडतील. शूटिंगदरम्यान पोपटाची काळजी घेण्यासाठी प्रशिक्षकांनी विशेष लक्ष दिले—वेळेवर अन्न, पुरेसे ब्रेक आणि आरामदायी वातावरण यामुळे संपूर्ण युनिटला समाधान वाटले. ती पुढे म्हणाली, "माझ्या आयुष्यात याआधी कुठलाही पाळीव प्राणी नव्हता, त्यामुळे हा अनुभव पूर्णपणे वेगळा आणि आनंददायी होता. रिओसोबत वेळ घालवताना प्राण्यांसोबतचे नाते किती खास असते याची जाणीव झाली. भविष्यात मला पाळीव कुत्रा ठेवण्याचीही इच्छा आहे." या अनोख्या अनुभवामुळे मालिकेच्या कथानकातही एक वेगळी मोहकता आली असल्याचे निर्मिती टीमचे मत आहे. प्रेक्षकांना सावी आणि रिओ यांच्यातील संवाद असलेले भाग लवकरच पाहायला मिळणार आहेत.

## २८ फेब्रुवारीपर्यंत प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या वतीने राज्य शासनातर्फे देण्यात येणाऱ्या विविध सामाजिक पुरस्कारांसाठी पात्र व्यक्ती व संस्थांकडून २८ फेब्रुवारी २०२६ पर्यंत प्रस्ताव मागविण्यात आले आहेत. समाजाच्या उन्नतीसाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या घटकांनी आपले प्रस्ताव मुदतीत सादर करावेत, असे आवाहन सहायक सहसंचालक विनोद लोंढे यांनी केले आहे. अहिल्यानगर येथील इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या सहायक संचालक कार्यालयामार्फत हे प्रस्ताव स्वीकारले जाणार आहेत. यामध्ये प्रामुख्याने महात्मा बसवेश्वर सामाजिक समता- शिवा पुरस्कार, नटराज पुरस्कार, विश्वकर्मा पुरस्कार व क्रांतीवीर राजे उमाजी नाईक पुरस्कार या मानाच्या पुरस्कारांचा समावेश आहे.

## पर्नोड रिकार्ड इंडियाकडून महाराष्ट्रात सीग्राम्स एक्सक्लेमेशनचा शुभारंभ

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

पर्नोड रिकार्ड इंडिया ने महाराष्ट्रात सीग्राम्स एक्सक्लेमेशन! या नव्या ब्रँडचा शुभारंभ जाहीर केला आहे. गेल्या 30 वर्षांतील कंपनीची ही सर्वात महत्त्वाकांक्षी आणि नाविन्यपूर्ण घोषणा मानली जात आहे. सिग्राम्स एक्सक्लेमेशन! हा भारतातील एकमेव असा ब्रँड पोर्टफोलिओ आहे, ज्यामध्ये एकाच ब्रँडअंतर्गत पाच वेगवेगळ्या स्पिरिट्स प्रकारांचा समावेश आहे, व्हिस्की, व्होडका, जिन, रम आणि ब्रँडी. हे सर्व प्रकार प्रीमियम ॲडमिक्स सेगमेंटमध्ये समान किंमत श्रेणीत उपलब्ध असतील. हा ब्रँड एंट्री-लेव्हल प्रीमियम किंमत श्रेणीतील मोठ्या संधीच्या पार्श्वभूमीवर धोरणात्मक पद्धतीने सादर करण्यात आला असून, भारतातील वेगाने वाढणाऱ्या तरुण प्रौढ ग्राहकवर्गाला लक्षात घेऊन तयार करण्यात आला आहे. या ब्रँडचा लक्ष्यित ग्राहकवर्ग 26 ते 30 वर्षे वयोगटातील आहे. हे ग्राहक सहजपणे




आपली वेगळी ओळख निर्माण करणारे असून, वेगळेपणाकडे आकर्षित होतात. ते आपल्या मित्रपरिवारासोबत गटांमध्ये जोडलेले असतात आणि जेव्हा मिश्र गटांमध्ये एकत्र येतात, तेव्हा प्रत्येकाची पेयाची आवड वेगवेगळी असते. त्यामुळे व्हिस्कीबरोबरच जिन, व्होडका, रम आणि ब्रँडी यांसारख्या इतर श्रेणींची मागणीही वाढत असल्याचे दिसून येते. दरवर्षी 20 दशलक्षांहून अधिक ग्राहक कायदेशीर मद्यपान वयोगटात प्रवेश करत असताना, एक्सक्लेमेशन! सहज परवडणाऱ्या प्रीमियम किंमत श्रेणीत दर्जेदार स्पिरिट्सची अपूर्ण राहिलेली बाजारपेठेतील गरज पूर्ण करण्याचे काम करते. "इट्स टाइम फॉर एक्सक्लेमेशन!" या ब्रँडच्या संकल्पनेद्वारे, भारतातील नव्या पिढीच्या ग्राहकांसाठी साध्या क्षणांना असामान्य अनुभवांमध्ये रूपांतरित करणारा प्रेरक घटक म्हणून या ब्रँडची मांडणी करण्यात आली आहे. पर्नोड रिकार्ड इंडियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी जीन टुबूल म्हणतात, "गेल्या तीन दशकांहून अधिक काळापासून पर्नोड रिकार्ड इंडिया देशातील प्रीमियम स्पिरिट्स उद्योगाच्या घडणीत अग्रस्थानी राहिले आहे. एक्सक्लेमेशन! हा ब्रँड ग्राहकांच्या सखोल समजुतीतून तयार करण्यात आला असून, मिश्र गटातील सामाजिक प्रसंगांसाठी प्रीमियम दर्जा आणि विविधतेची अपेक्षा ठेवणाऱ्या भारतातील नव्या पिढीच्या ग्राहकांसाठी डिझाइन करण्यात आला आहे. एक्सक्लेमेशन! म्हणजे धाडस, नवकल्पना आणि उत्सवाचा एकत्रित अनुभव आहे. या लाँचद्वारे प्रीमियम ॲडमिक्स सेगमेंटमध्ये व्हिस्की, व्होडका, जिन, रम आणि ब्रँडी या पाच स्पिरिट्स श्रेणींना एकत्र आणणारा आमचा पहिला एकात्मिक ब्रँड सादर करण्यात आला आहे, जो येत्या दशकात उद्योगाच्या वाढीपेक्षा अधिक वेगाने प्रगती करेल, अशी अपेक्षा आहे. एक्सक्लेमेशन! हा केवळ एक ब्रँड नसून, उत्कृष्ट चवीसाठी जागतिक तंत्रज्ञानाच्या मदतीने तयार करण्यात आलेल्या सर्वोत्तम भारतीय स्पिरिट्सचे मिश्रण आहे."

## लोकमंगल प्रथम कृषी राज्यस्तरीय पुरस्काराचे थाटात वितरण

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

शेतकऱ्यांना आधार देण्याकरिता आणि त्यांच्या सन्मानासाठी प्रत्येक संस्था आणि राजकीय नेत्यांनी पुढे येण्याची गरज आहे. राज्यामध्ये समृद्ध शेतकऱ्यांचा एक समूह तयार केला, तर राज्य आणि देश प्रगतीपथावर मार्गक्रमण करेल. तरुणांनी शेती व्यवसायामध्ये चांगल्या पद्धतीने काम करून शेतीचे उत्पादन वाढवणे गरजेचे आहे तसेच पुरस्कार प्राप्त शेतकऱ्यांनी एक दिवस सोलापूर येथे येऊन आमच्या परिसरातील शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्याची देखील त्यांनी विनंती केली. शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्याकरिता प्रत्येकाने प्रयत्न करणे गरजेचे असल्याचे मत लोकमंगल समूहाचे अध्यक्ष आमदार सुभाष देशमुख यांनी व्यक्त केले. लोकमंगल समूह आयोजित ,लोकमंगल कृषी व कृषी संलग्नित महाविद्यालय पूरस्कृत लोकमंगल



कृषी राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा प्रसंगी आमदार देशमुख हे बोलत होते. पद्मश्री पुरस्कार प्राप्त डॉ. श्रीरंग लाड परभणी (ज्येष्ठ कृषी शास्त्रज्ञ) व सह्याद्री फार्मर प्रोड्युसर कंपनीचे संस्थापक अध्यक्ष डॉ. विलास शिंदे (नाशिक )हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीराम ग्रामीण संशोधन विकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष रोहन देशमुख यांनी केले. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या लोकमंगल कृषी पुरस्काराचे महत्त्व आणि नियोजन सांगितले यंदाचे हे प्रथम वर्ष असून, ज्या शेतकऱ्यापासून या कार्यक्रमाची सुरुवात झाली त्या सर्व शेतकऱ्यांना मनापासून शुभेच्छा देत त्यांनी उपस्थित सर्व शेतकऱ्यांचे अभिनंदन केले आणि ही पुरस्काराची परंपरा यापुढेही कायम राहणार असल्याचे सांगितले. कार्यक्रमाची सुरुवात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून करण्यात आली.यावेळी बोलताना पद्मश्री श्रीरंग लाड म्हणाले की, शेतकऱ्याने पारंपरिक पद्धतीने पिकाची लागवड न करता आधुनिक पद्धतीने लागवड करून सतत देखभाल करणे गरजेचे आहे. कपाशीची लागवड केल्यानंतर त्या झाडाला किती फांद्या आहेत.? किती बोंड लागलेत.? त्याचे वजन किती? .त्यातून मिळणारा कापूस किती.? या सगळ्या गोष्टीचा अभ्यास करून जमिनीकडच्या बाजूला येणाऱ्या फांद्या कट केल्या तर झाडाच्या वरील इतर फांद्याच्या बोंडाचे वजन वाढते, पर्यायी उत्पादनामध्ये वाढ होते. एकरी पाच ते सहा क्विंटल कापूस निर्माण करणाऱ्या शेतकऱ्याच्या शेतामध्ये १२ ते १८ क्विंटल पर्यंत उत्पादन मिळू शकते. अशा छोट्या, छोट्या गोष्टीची दक्षता घेऊन शेतकऱ्यांनी उत्पादन वाढविणे गरजेचे असल्याचे मतही लाड यांनी व्यक्त केले. यावळी नाशिकचे सह्याद्री फार्मर प्रोड्युसर कंपनी लिमिटेड चे डॉ. विलास शिंदे, कृषी विज्ञान केंद्र नंदुरबार येथील प्रमुख शास्त्रज्ञ डॉक्टर राजेंद्र दहातोंडे, ज्येष्ठ पत्रकार कृष्णकांत चव्हाण आदींनी आपले मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ. सचिन फुगे यांनी केले, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अजित कुरे यांनी केले.

## सायकल रॅली उत्साहात संपन्न

**अहिल्यानगर: (समर्थ गांवकरी)**

श्री गुरु तेग बहादूर साहिब जी यांच्या ३५० व्या शहीदी समागमानिमित्त आयोजित भव्य सायकल रॅलीचा शुभारंभ जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी हिरवा झेंडा दाखवून केला. या रॅलीची सुरुवात जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरातून करण्यात आली. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते, बलदेव सिंग वाही, अमरप्रीत वाही, अमनदीप वाही, अश्विंदर मल्होत्रा, ब्रह्मा लोंगियानी, मोंटू लोंगियानी, इकजस नारंग, गुरजस नारंग, हरप्रीत नारंग, कुलबीर सिंग वाही, रविंदर सिंग नारंग आदी मान्यवर उपस्थित होते. जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातून सुरू झालेली ही रॅली सुरभी हॉस्पिटल, गुलमोहर पोलीस चौकी, श्रीराम चौक, प्रोफेसर कॉलनी चौक, प्रेमदान चौक, नायरा पेट्रोल पंप, दिल्ली गेट, मार्केट यार्ड, कोटला स्टँड आणि डीएसपी चौक मार्गे मार्गक्रमण करत भाई दया सिंह जी गुरुद्वारा येथे पोहोचली.

## अभिषेक कळमकर हे हनी ट्रॅपचे बळी, त्या महिलेने पुण्यातील युवकालाही फसवलं अन् पैसे उकळले - खासदार लंकेंचा दावा

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

शरद पवार गटाचा शहर जिल्हाध्यक्ष अभिषेक कळमकर याचे प्रकरण हे हनी ट्रॅप असल्याचा दावा खासदार निलेश लंके यांनी केला आहे. ज्या महिलेने हे आरोप केले आहेत तिने या आधी पुण्यातील एका युवकासोबतही असाच प्रकार केला. त्याच्याकडून तडजोड करून काही रक्कम उकळल्याचा दावाही लंके यांनी केला. राष्ट्रवादी शरद पवार गटाचे अहिल्यानगर शहर जिल्हाध्यक्ष अभिषेक कळमकर यांच्याविरोधात एका महिलेने अत्याचाराचा गुन्हा दाखल केला आहे. सोबतच त्यांचे काही आक्षेपार्ह व्हिडीओ देखील व्हायरल झालेत. त्यावर निलेश लकं यांनी प्रतिक्रिया दिली. निलेश लंके म्हणाले की, "हा संपूर्ण प्रकार हनी ट्रॅपचा आहे. अभिषेक कळमकरवर ज्या महिलेने आरोप केले आहेत त्या महिलेने पुणे जिल्ह्यात



एका युवकाबाबत असाच एक प्रकार केला आहे. त्या प्रकरणात संबंधित युवकाकडून तडजोडनामा करून काही रक्कम देखील घेतली आहे. राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या विमान अपघाताबाबत आमदार रोहित पवारांनी संशय व्यक्त केला. याबाबत बोलताना खा. निलेश लंके यांनी प्रतिक्रिया दिली असून रोहित पवारांकडून ज्या पद्धतीने मांडणी केली आहे. त्यावरून या अपघाताबाबत नक्कीच संशय येत असल्याचे लंके म्हणाले. सोबतच रोहित पवारांना झेड प्लस सुरक्षा मिळावी अशी मागणी त्यांच्या कार्यकर्त्यांकडून केली जात आहे. त्यावर बोलताना, एखादा व्यक्ती स्पष्ट वक्ता असला की त्याला समाजातील काही दुर्जनांकडून धोका असतो, त्यामुळे रोहित पवारांना सुरक्षा मिळायला हवी असं लंके म्हणाले. राज्यसभेच्या एका जागेबाबत महाविकास आघाडीमध्ये मतभेद असल्याचं समोर आलं आहे. राज्यसभेच्या जागेबाबत शिवसेना ठाकरे गट आणि काँग्रेस यांच्या चर्चा सुरू असून राष्ट्रवादीला या चर्चेपासून दूर ठेवण्यात आल्याचे बोललं जात आहे. याबाबत खासदार निलेश लंके यांना विचारले असता ते म्हणाले की, "कोणताही मोठा निर्णय घ्यायचा असेल तर तो पवार साहेबांना विचारात घेऊनच घेतला जातो. मधल्या काळात शरद पवार यांची तब्येत खराब असल्याने चर्चा झाली नसेल. मात्र निर्णय हा त्यांच्या विचारानेच होईल."



## दिव्यात फुटवेअर शॉप आगीच्या भक्ष्यस्थानी

**ठाणे, दिवा : (समर्थ गांवकरी)**

आज दिनांक २३/०२/२०२६ रोजी १३:५२ वाजताच्या सुमारास शिवतेज व्हीला इमारत, छत्रपती शिवाजी महाराज चौक, दिवा-आगासन रोड, दिवा. ठाणे या ठिकाणी शिवतेज इमारतीच्या तळ मजल्यावरती असलेल्या फुटवेअर शॉप (मालक:- श्री. अब्दुल वारसी) या फुटवेअरच्या दुकानांमध्ये आग लागली होती. सदर घटनास्थळी अग्निशमन दलाचे जवान ०१-रेस्क्यू वाहनासह व ०१-फायर वाहनासह उपस्थित होते. सदर घटनास्थळी कोणालाही दुखापत नाही. सदर घटनास्थळी दुकानाला लागलेली आग अग्निशमन दलाचे जवान यांच्या मदतीने पूर्णपणे विझविण्यात आली होती. परिस्थिती नियंत्रणात आहे.

## हिंद सेवा मंडळाचे रामकरण सारडा विद्यार्थी गृहाच्या माजी विद्यार्थी संघाचा स्नेह मेळावा संपन्न

### रामकरण सारडाच्या विद्यार्थ्यांनी माजी विद्यार्थ्यांच्या आदर्श घेऊन जीवनात यशस्वी होऊन राष्ट्र उभारणीच्या कार्यात योगदान द्यावे - ब्रिजलाल सारडा

**अहिल्यानगर: (समर्थ गांवकरी)**

"कर्मण्येवाधिकारस्ते"या ब्रीद वाक्यप्रमाणे हिंद सेवा मंडळाचे कार्य सुरू आहे. रामकरण सारडा विद्यार्थी गृहाची स्थापनेला ११३ वर्षाची परंपरा लाभलेली आहे. रामकरण सारडा विद्यार्थी गृहातील विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी हिंदसेवा मंडळाचे अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक, कार्याध्यक्ष डॉ.रमेश झरकर,मानद सचिव संजय जोशी व हिंद सेवा मंडळाचे सर्व पदाधिकारी यांचे विशेष लक्ष आहे.

रामकरण सारडा विद्यार्थी गृहाचे माजी विद्यार्थी विविध क्षेत्रात उच्चपदस्थ नोकरी व स्वतःचा व्यवसाय करीत आहेत.भगवद्रीते सांगितलेल्या निष्काम कर्मयोगाचे आचरण करावे.ध्येयवादी राहुन विद्यार्थ्यांनी माजी विद्यार्थ्यांच्या



आदर्श घेऊन जीवनात यशस्वी होऊन राष्ट्र उभारणीच्या कार्यात योगदान द्यावे.आदर्श नागरिक बनावे.असे प्रतिपादन हिंद सेवा मंडळाचे माजी कार्याध्यक्ष ब्रिजलाल सारडा यांनी केले आहे.

हिंद सेवा मंडळाचे रामकरण सारडा विद्यार्थीगृहात माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा व दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ संपन्न झाला.यावेळी माजी विद्यार्थ्यांनी सारडा वस्तीगृहाला २४ खुर्ची, क्रीडा साहित्य,टी-शर्ट,स्वेटर व दिवंगत माजी विद्यार्थी कै.पांडुरंग सोन्याबापु दळवी यांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदतीचा धनादेश देण्यात आला. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी उपप्राचार्य विश्वनाथ लाहोटी, हिंदसेवा मंडळाचे माजी कार्याध्यक्ष ब्रिजलाल सारडा, सिद्धार्थ सारडा,ह.सा.शिंदे, खेतमाळीस सर,साठे सर,बळीद सर ,सुनील कुलकर्णी,ताकपिरे सर,सौ.मेघा ख्रिस्ती वस्तीगृहाचे अधीक्षक बंडू भोसले,गजानन भांडवलकर विशाल म्हस्के, सागर खळे,विकी निक्रड,अमोल बगाडे,अभिजीत भांडवलकर आदी उपस्थित होते. विश्वनाथ लाहोटी म्हणाले, रामकरण सारडाचे माजी विद्यार्थी आजही सामाजिक बांधिलकी जपत वस्तीगृहाला भेट देऊन क्रीडा साहित्य मिष्ठान्न भोजन व मदत देऊन सहकार्य करीत आहे ही बाब कौतुकास्पद आहे. या कार्यक्रमात माजी विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त करताना असे सांगितले की,रामकरण सारडाच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी सर्वतोपरी मदत करू असे सांगितले.यावेळी ब्रिजलाल सारडा यांनी माजी विद्यार्थ्यांच्या संघाची स्थापना करुन विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी संघटना स्थापन करावी.यासाठी हिंदसेवा मंडळ सहकार्य करेन. सूत्रसंचालन बबन धनवडे यांनी केले तर आभार सुनील कुलकर्णी यांनी मानले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व विद्यार्थ्यांना मिष्ठान्न भोजन देण्यात आले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी माजी विद्यार्थी संघाचे नवनाथ ढोणे,आश्विन साठे, दत्तात्रय आग्रे,संतोष सुपेकर,किरण गायकवाड,ज्ञानेश्वर हळनोर, नवनाथ गायके,धर्मनाथ तांदळे, श्रीकांत बुधवंत,बाळू बुधवंत, अरुण नागरगोजे,उत्तम नगर आदींनी परिश्रम घेतले.



## ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

थोर समाजसुधारक, स्वच्छता व सामाजिक समतेचे प्रणेते संत गाडगे महाराज यांच्या जयंतीनिमित्त ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी संत गाडगे महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. या प्रसंगी अपर जिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. संदीप माने, उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) रूपाली भालके, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) वैशाली माने, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) वरुणकुमार सहारे, उपजिल्हाधिकारी (रोहयो) शशिकांत गायकवाड, तहसीलदार (सर्वसाधारण) सचिन चौधर, तहसीलदार (संगणक/सांख्यिकी) संदीप थोरात, तहसीलदार (रेतीगट) अमोल कदम तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. संत गाडगे महाराज यांनी कीर्तनांच्या माध्यमातून समाजात स्वच्छता, नैतिकता आणि समतेचा संदेश दिला. त्यांच्या कार्यातून समाजजागृतीची चळवळ उभी राहिली.

# जिल्हाध्यक्षपदी सार्थक पाटील

**सांगली : (समर्थ गांवकरी)**

मराठा समाजातील वैचारिक, सामाजिक आणि पत्रकारितेच्या क्षेत्रात कार्यरत असलेल्या मराठा सेवा संघ प्रणित तानुबाई बिरजे पत्रकार परिषद कक्षाच्या सांगली जिल्हाध्यक्षपदी सार्थक गणेश पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती पुढील तीन वर्षांच्या कालावधीसाठी जाहीर करण्यात आली असून समाजातील विविध स्तरांतून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

जिल्ह्यातील पत्रकार परिषद कक्षाचे संघटनात्मक बळकटीकरण, समाजप्रबोधन आणि पत्रकारांना संघटित करण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे. सार्थक पाटील यांनी समाजकार्य व संघटनात्मक कार्यामध्ये सातत्याने योगदान दिले असून, त्यांच्या कार्यपद्धतीत स्पष्टता, नेतृत्वगुण आणि संघटन कौशल्य यांची



झलक दिसून येते. त्यांच्या नियुक्तीमुळे सांगली जिल्ह्यात पत्रकार परिषद कक्षाच्या माध्यमातून समाजातील प्रश्नांना अधिक प्रभावीपणे वाचा फोडली जाईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

नियुक्तीपत्रामध्ये त्यांना पदाचा कार्यभार तत्काळ स्वीकारून जबाबदाऱ्या निष्ठापूर्वक पार पाडण्याचे आवाहन करण्यात आले आहे. जिल्हाध्यक्ष आर.एस. पवार यांनी त्यांना शुभेच्छा देत आगामी कार्यकाळ यशस्वी होवो, अशा सदिच्छा व्यक्त केल्या.

> "मराठा सेवा संघ प्रणित तानुबाई बिरजे पत्रकार परिषद कक्षाच्या सांगली जिल्हाध्यक्षपदी काम करण्याची संधी मिळणे ही माझ्यासाठी मोठी जबाबदारी आणि सन्मानाची बाब आहे. जिल्ह्यातील पत्रकारांना संघटित करताना समाजप्रबोधन आणि समाजातील प्रश्नांना प्रभावीपणे वाचा फोडणे, हे माझे प्राधान्य असेल. संघटनेच्या बळकटीकरणासाठी पारदर्शक, सकारात्मक आणि सर्वसमावेशक कार्यपद्धती राबवण्याचा माझा प्रयत्न राहील. सर्व सहकाऱ्यांच्या सहकार्याने आगामी तीन वर्षांत पत्रकार परिषद कक्ष अधिक सक्षम आणि प्रभावी बनवू."

## महिला सक्षमीकरणाला चालना : ई-बस ड्रायव्हर प्रशिक्षण पूर्ण

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

एका मोबिलिटी, कॅपिटल रीजन अर्बन ट्रान्सपोर्ट (सीआरयूटी), ट्रॅव्हल टाइम आणि जीआयझेड यांच्या संयुक्त सहकार्याने २० महिला ड्रायव्हर्ससाठी आयोजित दोन आठवड्यांचा ई-बस ड्रायव्हर कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वीरित्या पूर्ण झाला. पुण्यातील चाकण येथील एका मोबिलिटीच्या उत्पादन प्रकल्पात हा उपक्रम राबविण्यात आला. डॉईश जेसेलशाफ्ट फर इंटरनॅशनल झुसामेनारबीट (जीआयझेड)ने आपल्या सीएसआर आराखड्याअंतर्गत या उपक्रमाला पाठिंबा दिला, तर ट्रॅव्हल टाइमने प्रशिक्षणाची अंमलबजावणी केली. सीआरयूटीच्या सार्वजनिक परिवहन ताफ्यात महिलांचे प्रमाण वाढवणे आणि इलेक्ट्रिक सार्वजनिक वाहतुकीच्या दिशेने राज्याच्या परिवर्तनाला चालना देणे हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश होता. या प्रशिक्षणात ई-बसचे प्रत्यक्ष ड्रायव्हिंग सत्र, तांत्रिक मॉड्यूल्स, रिजनरेटिव्ह ब्रेकिंग, अवजड वाहन हाताळणी, बॅटरी प्रणाली, ऊर्जा व्यवस्थापन, चार्जिंग प्रोटोकॉल्स, हाय-व्होल्टेज सुरक्षा आणि दैनंदिन तपासणी यांसारख्या महत्त्वाच्या घटकांचा समावेश होता. यासोबतच बचावात्मक ड्रायव्हिंग, रस्ते सुरक्षा, प्रवासी व्यवस्थापन आणि आपत्कालीन परिस्थितीतील प्रतिसाद यावरही विशेष भर देण्यात आला. संवाद कौशल्य, ग्राहक सेवा, आत्मविश्वास वाढ आणि व्यावसायिक आचारसंहिता यांसारख्या सॉफ्ट स्किल्सचेही प्रशिक्षण देण्यात आले, ज्यामुळे महिला चालक प्रत्यक्ष प्रवासी सेवेसाठी अधिक सक्षम बनल्या. तसेच उत्पादन प्रक्रिया, असेंब्ली लाईन, चाचणी सुविधा आणि चार्जिंग पायाभूत सुविधा यांचा मार्गदर्शित दौरा आयोजित करून इलेक्ट्रिक बसच्या कार्यप्रणालीबाबत सखोल माहिती देण्यात आली. एका मोबिलिटीच्या ग्रुप प्रेसिडेंट रितिका मेहता यांनी सांगितले की, गतीशीलतेचे भवितव्य शाश्वत आणि सर्वसमावेशक असावे, हा आमचा विश्वास आहे. हा उपक्रम केवळ तांत्रिक प्रशिक्षणापुरता मर्यादित नसून रोजगाराच्या संधी निर्माण करणे, आत्मविश्वास वाढवणे आणि महिलांना सार्वजनिक परिवहनाच्या नेतृत्वासाठी सक्षम करणे हे त्यामागील उद्दिष्ट आहे. ट्रॅव्हल टाइमचे संचालक विवेक काळकर यांनी सांगितले की, प्रत्यक्ष रस्त्यावर ड्रायव्हिंग सराव, सेफ्टी ड्रिल्स आणि प्रवासी-केंद्रित दृष्टिकोनाच्या माध्यमातून महिला चालकांना पूर्णपणे कार्यक्षम बनविण्यावर भर देण्यात आला. सर्व २० सहभागींनी प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केले असून त्या सीआरयूटीच्या इलेक्ट्रिक बस ताफ्यात सामील होण्यासाठी सज्ज आहेत.

## संतूरने खऱ्या चंदन लेपपासून बनवलेली अगरबत्ती लाँच केली

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

विप्रो कन्स्युमर केअर अँड लाईटिंगचा प्रमुख ब्रँड असलेल्या संतूरने अगरबत्ती (धूपबत्ती) क्षेत्रात प्रवेश केला असून, संतूर अगरबत्ती लाँच केली आहे, जी खऱ्या चंदनाच्या लेपाचा वापर करून बनवली आहे.

या लाँचद्वारे संतूरने घरातील वातावरण सुगंधित करण्याच्या (होम अँबियन्स) क्षेत्रात आपला विस्तार केला असून, चंदनावर आधारित उत्पादनांशी असलेल्या दीर्घकाळच्या विश्वासावर आधारित हा पुढचा टप्पा आहे.

संतूर ब्रँड अनेक दशकांपासून आपल्या पर्सनल केअर उत्पादनांमध्ये चंदनाचा वापर करत आले आहे. या नवीन उत्पादनाच्या माध्यमातून, हा ब्रँड आपला तोच




वारसा अगरबत्तीच्या क्षेत्रात पुढे नेत आहे, ज्यामध्ये मंदिरे आणि घरांमध्ये पारंपरिकपणे वापरल्या जाणाऱ्या खऱ्या चंदन लेपाचा मुख्य घटक म्हणून वापर करण्यात आला आहे.

संतूर अगरबत्तीची रेंज तीन प्रकारांमध्ये उपलब्ध आहेत: चंदन लेप, चंदन आणि मोगरा, चंदन आणि केसर. या सर्व अगरबत्त्या खऱ्या चंदनाच्या लेपापासून तयार करण्यात आल्या असून, त्या पारंपरिक आणि ओळखीचा सुगंध देतात

या लाँचबद्दल बोलताना, विप्रो कंझ्युमर केअर अँड लाइटिंगच्या बिझनेस डेव्हलपमेंटचे जीएम उषासिस साहा यांनी सांगितले, "खऱ्या चंदन लेपपासून बनवलेली संतूर अगरबत्ती सादर करताना आम्हाला खूप आनंद होत आहे. प्रत्येक संतूर अगरबत्ती ही परंपरेचे प्रतीक आहे, जी शेकडो वर्षांपासून मंदिरे आणि घरांमध्ये दरवळणाऱ्या त्याच खऱ्या चंदन लेपाचा वापर करून ती तयार करण्यात आली आहे." संतूर अगरबत्ती 125 ग्रॅमच्या झिपलॉक पॅकमध्ये आणि 20 ग्रॅमच्या पाऊच पॅकमध्ये स्थानिक किराणा दुकानांमध्ये उपलब्ध असेल, या श्रेणीत एकूण सात वेगवेगळे एसकेयू (SKU) असतील.

## ४ लाख कोटींच्या निष्क्रिय गुंतवणुकीसाठी क्लिअरक्लेमची मोहीम

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

भारतामध्ये सध्या सुमारे ४ लाख कोटी रुपयांची रक्कम शेअर्स, लाभांश आणि इतर आर्थिक मालमत्तांच्या स्वरूपात निष्क्रिय व अदावी असल्याचे समोर आले आहे. माहितीचा अभाव, जुनी कागदपत्रे हरवणे, पत्ता बदलणे किंवा मूळ गुंतवणूकदारांच्या निधनानंतर वारसांना माहिती नसणे अशा कारणांमुळे अनेक गुंतवणूकदारांना त्यांच्या हक्काची गुंतवणूक परत मिळवता येत नाही. या पार्श्वभूमीवर क्लिअरक्लेम या गुंतवणूकदार सेवा व रिकव्हरी प्लॅटफॉर्मने राष्ट्रीय पातळीवर जनजागृती मोहीम सुरू केली आहे.

## कोल्हापुरातील फेमस रॅपर 'ए किंग'चं 'वाघ आला' हे हटके रॅप साँग प्रदर्शित

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

मराठी संगीतविश्वात आजकाल वेगवेगळ्या धाटणीची गाणी प्रदर्शित होत आहेत. त्यामुळे मराठी संगीताचा प्रभाव महाराष्ट्रभर वाढत चालला आहे. महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्ह्यातील यंग रॅपर 'ए किंग'च नुकतचं "वाघ आला" हे रॅप गाण प्रदर्शित झाल आहे. तर विशेष म्हणजे या गाण्याचं संपूर्ण चित्रीकरण कोल्हापुरातील ग्रामीण भागात झालं आहे. या गाण्याचे दिग्दर्शन ए किंग आणि विकास पवार यांनी केले आहे. या गाण्यात रॅपर ए किंग सोबत अनिता गनमाळे, मित्तल पांड्या, करण बोरे, सूरज कांबळे, सौरभ या कलाकारांनी काम केले आहे. या गाण्याची गीतरचना ए किंगने केली असून या गाण्याचे संगीत



प्रवीण एवाळे यांनी केले आहे. राकेश कांबळे आणि विवेक साठे हे डीओपी आहेत. प्रोजेक्ट हेड योगेश आणि विरेन आर टू हे आहेत. रॅपर ए किंग या गाण्याच्या प्रोसेसविषयी सांगतो, "मला संगीताची लहानपणापासूनच आवड होती म्हणून मी संगीत क्षेत्रात आलो. रॅप, हिप हॉप हे संगीत मी क्रांतीचं प्रतीक मानतो. जेणेकरून ज्या आर्टिस्टला आपल्या लिखाणातून एखादा संदेश द्यायचा आहे. किंवा प्रबोधन करण्यासाठी रॅप संगीताचा उपयोग होतो. मला मोटिवेशनल, एनर्जेटिक आणि मनोरंजन करणार एक गाण बनवायचं होत. तर मला वाघ आला या शब्दांमधून गाण सुचत गेल. आणि मी ते रॅप फॉर्म मध्ये करायचं ठरवलं. रेकॉर्डिंगच्या वेळेस मी जवळपास तीनदा रिटेक दिले कारण हे एकदम हाय पिचवर गाणं आहे." पुढे तो गाण्याच्या चित्रीकरणाविषयी सांगतो,"कोल्हापुरातील शिरोली एम आय डी सीतील इंदिरानगर परिसरात या गाण्याचं चित्रीकरण झालं. या गाण्याच्या शूटींगचा किस्सा म्हणजे गावातले एक आजोबा अचानक सेटच्या इथे आले आणि म्हणाले मला घ्या गाण्यात तुमच गाण फेमस होईल. त्यांच्यासोबत गाण्याचं शूट केलं.

## या उन्हाळ्यात कन्फर्मटीकेटसह ट्रेन प्रवास अधिक फायदेशीर बनवा

**१% कॅशबॅक ऑफर सुरू**

**नवी दिल्ली : (समर्थ गांवकरी)**

कन्फर्मटीकेट, भारतातील आघाडीचे अधिकृत B2C ऑनलाइन ट्रेन तिकीट आणि प्रवास उपयुक्तता प्लॅटफॉर्म, ixigo ग्रुपमध्ये सामील व्हा. उन्हाळी हंगामाच्या अनुषंगाने, कन्फर्मटीकेटने मर्यादित कालावधीसाठी १% कॅशबॅक ऑफरची घोषणा केली आहे. कन्फर्मटीकेट ॲपवर ट्रेन तिकिटे बुक करणाऱ्या वापरकर्त्यांना त्यांच्या कन्फर्मटीकेट वॉलेटमध्ये थेट १% कॅशबॅक मिळेल. या कॅशबॅकवर कोणतीही कमाल मर्यादा नाही, म्हणजेच वापरकर्ते त्यांना हवे तितके कॅशबॅक दावा करू शकतात. ही ऑफर ३१ मे २०२६ पर्यंत संपूर्ण उन्हाळी प्रवास हंगामात चालेल. प्रवासी संपूर्ण ऑफर कालावधीत अमर्यादित कॅशबॅक मिळवू शकतात. क्रेडिटच्या




तारखेपासून ९० दिवसांच्या आत त्यांच्या पुढील ट्रेन बुकिंगवर हा कॅशबॅक दावा करता येईल. कुटुंबे, विद्यार्थी आणि सुट्टीतील लोकांसाठी हा अतिरिक्त फायदा असेल. तुम्हाला लक्षणीय बचतीचा फायदा होईल, विशेषतः जेव्हा तुम्ही अनेक ट्रिपचे नियोजन करता. बुकिंग केल्यावर कॅशबॅक आपोआप तुमच्या वॉलेटमध्ये जमा होईल, ज्यामुळे संपूर्ण प्रक्रिया सोपी आणि अखंड होईल. या उपक्रमाबद्दल भाष्य करताना, ixigo ट्रेन्स आणि कन्फर्मटीकेटचे सीईओ दिनेश कुमार कोठा म्हणाले, "उन्हाळा हा भारतातील प्रवासासाठी सर्वात व्यस्त काळ आहे. या काळात कुटुंबे, विद्यार्थी आणि व्यावसायिक मोठ्या संख्येने ट्रेनने प्रवास करतात. ३१ मे पर्यंत चालणारी ही ऑफर प्रवाशांना त्यांच्या सुट्ट्या आणि परतीच्या ट्रिपमध्ये महत्त्वपूर्ण फायदे देईल. कॅशबॅकवर कोणतीही मर्यादा न ठेवता आणि रिडेम्पशन सोपे करून, आम्ही प्रवाशांना अधिक बचतीसह विश्वासार्हपणे प्रवास करता येईल याची खात्री करत आहोत. ट्रेन बुकिंग अधिक सोपे, पारदर्शक आणि फायदेशीर बनवण्याचे आमचे ध्येय आहे."

कन्फर्मटीकेट तंत्रज्ञान-आधारित आणि ग्राहक-केंद्रित सेवांद्वारे प्रवास अनुभवांमध्ये सतत सुधारणा करत आहे.

प्लॅटफॉर्म उच्च-अचूकता प्रतीक्षा यादी अंदाज देते, वापरकर्त्यांना माहितीपूर्ण बुकिंग निर्णय घेण्यास मदत करते. याव्यतिरिक्त, जवळच्या ट्रेन्स, पर्यायी प्रवास योजना, थेट ट्रेन स्थिती, सोपे पीएनआर ट्रॅकिंग, त्वरित परतफेड, सीट उपलब्धता अलर्ट आणि जलद यूपीआय पेमेंट यासारख्या वैशिष्ट्ये देखील उपलब्ध आहेत. वापरकर्ते निवडक स्थानकांवर "फूड ऑन ट्रेन" सेवेद्वारे त्यांच्या सीटवर जेवण ऑर्डर करू शकतात.

या वैशिष्ट्यांचा उद्देश प्रवासाची अनिश्चितता कमी करणे, विश्वसनीय पर्याय प्रदान करणे आणि एकूण प्रवास सुलभ करणे आहे.

## नव्या पदाधिकाऱ्यांची निवड जाहीर

**राजूर : (समर्थ गांवकरी)**

क्रांतिकारी आदिवासी युवा प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य (K A ग्रुप) या सामाजिक संघटनेची अकोले तालुक्यातील वार्षिक आढावा बैठक उत्साहात पार पडली. संघटनेचे राज्य नेतृत्व संदीप भाऊ गवारी यांच्या मार्गदर्शनाखाली अकोले तालुक्यात संघटनेचे कार्य सुरू असून गेल्या वर्षभरात विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. मागील एक वर्ष अकोले तालुक्याचे अध्यक्ष म्हणून अरुण गोंदके यांनी कार्यभार सांभाळला. त्यांच्या नेतृत्वाखाली संघटनेने ग्रामस्तरावर जनजागृती, युवक संघटन, शैक्षणिक मार्गदर्शन आणि सामाजिक प्रश्नांवर पाठपुरावा असे विविध उपक्रम यशस्वीपणे पूर्ण केले. संघटनेच्या नियमांनुसार दरवर्षी पदाधिकाऱ्यांची फेरनिवड करण्यात येते.

## "कॉलेजमध्ये असताना मुलींची छेड काढणाऱ्यांना मी थेट जाब विचारायचे."

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

झी टीव्हीवरील 'लक्ष्मी निवास' मालिकेत सध्या भूमिका आणि राज बुंदेला यांच्या भोवती फिरणारे एक रोचक कथानक सुरू आहे. श्रीनिवास आणि लक्ष्मी यांची धाकटी मुलगी रिया मुंजाल साकारत असलेली भूमिकाच्या आयुष्यात अचानक करोडपती राज बुंदेला (प्रियाम गुज्जर) प्रवेश करतो आणि त्यानंतर अनेक अनपेक्षित बदल घडू लागतात. भूमिकाला पाहताच तिच्याकडे आकर्षित झालेला राज, पहिल्याच दिवशी तिच्या कुटुंबीयांकडे विवाहाचा प्रस्ताव घेऊन धाडसाने उपस्थित होतो. कठीण प्रसंगी कुटुंबाला दिलेल्या त्याच्या सातत्यपूर्ण आधारामुळे, श्रीनिवास आणि कुटुंबीय हळूहळू त्याच्यावर विश्वास ठेवू लागतात आणि त्याच्या प्रस्तावाचा गंभीरपणे विचार करू लागतात.



भूमिकाच्या प्रवासाला अनेक स्तर आहेत. उत्साही, मनमोकळी आणि आनंदी भूमिका अचानक अशा परिस्थितीत सापडते, ज्यासाठी भावनिकदृष्ट्या ती तयार नसते. कथानक पुढे सरकत असताना प्रेक्षकांना कुटुंबाच्या अपेक्षा सांभाळणे, स्वतःच्या भावना आणि निर्णय ऐकणे आणि स्वतःचा आवाज शोधण्याचा धैर्याने केलेला प्रयत्न असा तिचा अंतर्गत संघर्ष पाहायला मिळतो. विशेष म्हणजे भूमिकाची ही भावनिक ताकद रिया मुंजाललाही तिच्या खऱ्या आयुष्यात खोलवर अनुभवायला मिळते. रिया सांगते, "मी कॉलेजला असताना आमच्या कॅम्पसमधून ये-जा करताना अनेक वेळा तिने इव्ह-टीजिंगची प्रकरणे किंवा मुलींसोबत अयोग्य वर्तन होताना पाहायचे. माझ्या मैत्रिणींशी किंवा माझ्याशी कुणी गैरवर्तन केले तर मी कधीच गप्प बसू शकले नाही. अशा प्रसंगी तिथल्या तिथे बोलून दाखवणे किंवा त्या व्यक्तीला थेट जाब विचारणे ही माझी पहिली प्रतिक्रिया असायची. नंतर जरी धोका किती होता याचा विचार मनात आला तरी त्या क्षणी स्वतःचा ठामपणे बचाव करणे महत्त्वाचे वाटायचे."

## जयती भाटिया नव्या रहस्यमय भूमिकेत!

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

झी टीव्हीवरील लोकप्रिय मालिका जाने अनजाने हम मिले सध्या कथानकातील नव्या वळणांमुळे चर्चेत आहे. भरत अहलावत (राघव) आणि आयुषी खुराणा (रीत) यांच्या प्रमुख भूमिका असलेल्या या मालिकेत आता जबरदस्त नाट्य रंगणार असून अनुभवी अभिनेत्री जयती भाटिया दमदार पुनरागमन करत आहेत. यापूर्वी शारदा या भूमिकेतून प्रेक्षकांच्या मनात घर करणाऱ्या जयती भाटिया यांना प्रेम आणि द्वेष दोन्ही मिळाले होते. मात्र यावेळी त्या पूर्णपणे वेगळ्या आणि रहस्यमय अवतारात दिसणार आहेत. त्या 'शालिनी बत्रा' ही नवी व्यक्तिरेखा साकारणार असून



तिच्या आगमनाने कथानकात नवा ट्विस्ट येणार आहे. शालिनीच्या व्यक्तिरेखेबाबत सध्या प्रेक्षकांमध्ये मोठी उत्सुकता आहे. आपल्या नव्या भूमिकेबद्दल बोलताना जयती भाटिया म्हणाल्या, "शालिनी बत्रा ही व्यक्तिरेखा अजून विकसित होत आहे. ती सकारात्मक असेल की नकारात्मक, हे अद्याप स्पष्ट नाही. कथा जसजशी पुढे जाईल तसतसा तिचा प्रवास उलगडत जाईल. एवढे मात्र निश्चित की ती लंडनहून परतली आहे आणि एक सेवाभावी संस्था तसेच आश्रम चालवते, जिथे ती गरजू मुलांची काळजी घेते. तिच्या भूतकाळात काहीतरी दडलेले आहे. शारदा आणि शालिनी एकच व्यक्ती आहे की नाही, हे पाहणे प्रेक्षकांसाठी खूपच रोचक ठरेल."

## जागतिक कॅन्सर महिन्याच्या निमित्ताने सुरु केले 'झिरो टू हिरो' अभियान

**पुणे : (समर्थ गांवकरी)**


पुण्यातील पहिले ४०० बेड्सची क्षमता असलेले 'क्वाटरनरी केअर सेंटर' असलेल्या अपोलो हॉस्पिटल्स पुणेतर्फे जागतिक कॅन्सर महिन्यानिमित्त 'झिरो टू हिरो' या जनजागृती मोहिमेचा शुभारंभ आज करण्यात आला. कॅन्सरचे अगदी पहिल्या टप्प्यात निदान झाल्यास रुग्णाचे प्राण वाचू शकतात, हा संदेश जनमानसापर्यंत पोहोचवण्यासाठी ही मोहीम राबवली जात आहे. कॅन्सरचे लवकरात लवकर निदान झाल्यास त्यावर मात करणे शक्य आहे, या अपोलोच्या विश्वासावर ही मोहीम आधारित आहे. कॅन्सर तपासणी (स्क्रीनिंग), प्रतिबंधासाठी उपाययोजना आणि वेळेत उपचार यांचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी या




उपक्रमात नामवंत तज्ज्ञ डॉक्टर, कॅन्सरवर मात केलेले नागरिक आणि आरोग्य क्षेत्रातील मान्यवर एकत्र आले आहेत. अपोलो हॉस्पिटल्स पुणे येथील 'ऑन्कोलॉजी सेंटर ऑफ एक्सलन्स'मध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि विविध शाखांचे तज्ज्ञ उपलब्ध आहेत, त्यांच्या समन्वयाने याठिकाणी कॅन्सरवर सर्वसमावेशक उपचार केले जातात. हे केंद्र अचूक आणि लवकर निदानासाठी एआय-सक्षम PET-CT, अचूक रेडिएशन थेरपीसाठी VARIAN EDGE LINAC, आणि मूत्रपिंड, स्त्रीरोग, जठरांत्र (Gastrointestinal), तसेच मान व डोक्याच्या कॅन्सरवरील जटिल शस्त्रक्रियांसाठी Da Vinci Xi रोबोटिक प्रणाली यांसारख्या आधुनिक उपकरणांनी सुसज्ज आहे. प्रगत निदान चाचण्या, अचूक रेडिएशन आणि रोबोटिक शस्त्रक्रियेच्या जोरावर हे केंद्र कॅन्सरचे लवकर निदान, अचूक उपचार आणि जलद रिकव्हरी यासाठी आवश्यक त्या सर्व घटकांचा समन्वय साधून तयार केलेला दृष्टिकोन अवलंबते. तंत्रज्ञान-आधारित आणि रुग्ण-केंद्रित सेवेद्वारे कॅन्सरवरील उपचारांचे परिणाम सुधारण्यासाठी अपोलो हॉस्पिटल्सची वचनबद्धता यातून पुन्हा एकदा अधोरेखित होते.

या उपक्रमाच्या शुभारंभाप्रसंगी बोलताना अपोलो हॉस्पिटल्स पुणेच्या सीईओ डॉ. मनीषा करमरकर म्हणाल्या, "कॅन्सरविरुद्धच्या लढाईत त्याचे लवकरात लवकर निदान होणे आणि त्याला प्रतिबंध घातला जाणे ही सर्वात प्रभावी शस्त्रे आहेत. वेळेत केलेला उपचार रुग्णाचे प्राण वाचवण्याची शक्यता मोठ्या प्रमाणात वाढवतात आणि 'कॅन्सरवर मात करता येते' या अपोलोच्या अनेक वर्षांच्या विश्वासाला बळकटी देतात. मात्र, तपासणी तेव्हाच यशस्वी होते जेव्हा लोक त्यात उत्स्फूर्तपणे सहभागी होतात. अनेकदा भीती, सामाजिक कलंक, चुकीची माहिती आणि जागरूकतेचा अभाव यामुळे निदानालाच उशीर होतो. अपोलो हॉस्पिटल्स पुणेचा 'प्रोहेल्थ' (ProHealth) हा भारतातील पहिला एआय-सक्षम प्रतिबंधात्मक आरोग्य कार्यक्रम असून, तो प्रगत तपासणी आणि जोखीम मूल्यमापनाद्वारे व्यक्तींना स्वतःच्या आरोग्याविषयी जागरूक राहण्यास व नियंत्रण ठेवण्यास सक्षम करतो."

सिनियर सर्जिकल ऑन्कोलॉजिस्ट, रोबोटिक आणि HIPEC स्पेशालिस्ट डॉ. स्निता सिनुकुमार म्हणाल्या, "जवळपास ४० ते ५०% कॅन्सर हे केवळ प्रतिबंधात्मक उपाय, योग्य जीवनशैली आणि नियमित तपासणीद्वारे रोखले जाऊ शकतात किंवा त्यांचे लवकरात लवकर निदान होऊ शकते. डिजिटल मॅमोग्राफी, पॅप स्मीअर, लो-डोस सीटी स्कॅन, कोलोनोस्कोपी, पीएसए (PSA) चाचणी आणि मौखिक (oral) तपासणी यांसारख्या चाचण्यांमुळे लक्षणे दिसण्यापूर्वीच कॅन्सरचा शोध घेता येतो.



AROTE
Dental Clinic
smile more..live more..

डॉ. सौ. स्वप्नाली
अतुल आरोटे (तांबे)
B.D.S. (Dental Surgeon)
Reg.No.: A-17501
दंतरोग तज्ञ
वेळ :
सकाळी १० ते दुपारी १
व संध्याकाळी ५ ते ८
उपलब्ध उपचार
* रुट कॅनॉल ट्रीटमेंट
* हिरडयांवरील उपचार व शस्त्रक्रिया
* वेडेवाकडे दात सरळ करण्याचे उपचार
* दात व जबडयांवरील शस्त्रक्रिया
* कृत्रिम दंतरोपण शस्त्रक्रिया
* लहान मुलांच्या दातांवरील उपचार
पत्ता : ओम शांती बिल्डिंग, ताजणे मळा,
नवीन नगर रोड, संगमनेर, जि.अ.नगर
फोन : (०२४२४)२२२३४३



महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026 मंगळवार दि. २४ फेब्रुवारी २०२६



दशरथ चव्हाण
मॅनेजिंग डायरेक्टर

आदर्श इंजिनिअरिंग सर्विसेस

जनरेटर विक्री व दुरस्ती
१५ के व्ही ए पासुन २००० के व्ही ए

Mumbai off.: 203, Kokn Apt., Plot No. 1053,Sector - 5
Land Mark Mayur Bar Hotel, KoparKhairane, Navi Mumbai 400 709.
Mob.: +91-8286562340 / 9004511593/8652653990 /8286562350
Pune Off.: At Post Vadaj, Taluka Junnar, Dist.- 410 502
Email: dasharathschavan@gmail.com Website: www. adarshengineering.net



मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे • नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 • पाने : ४ • वर्ष : ४थे • अंक : ०९५ • किंमत : ४ रूपये • Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com


# वरोरा येथे पत्रकारांचे राज्यस्तरीय अधिवेशन उत्साहात संपन्न

## स्मॉल अँड मिडीयम न्यूज पेपर असोसिएशन तर्फे प्रभावी ठराव; पत्रकारांच्या समस्यांवर सखोल चिंतन



**वरोरा (प्रतिनिधी)–** चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा नगर भवन सभागृहात स्मॉल अँड मिडीयम न्यूज पेपर असोसिएशन, महाराष्ट्र राज्य तर्फे पत्रकारांचे एक दिवशीय राज्यस्तरीय खुले अधिवेशन भव्य आणि दिमाखात पार पडले. पत्रकारांच्या सामाजिक, आर्थिक आणि व्यावसायिक प्रश्नांवर सखोल चर्चा होऊन विविध ठराव मांडण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थापक अध्यक्ष उत्तम वाडकर होते, तर उद्घाटक म्हणून ज्येष्ठ संपादक मारोती घुमे उपस्थित होते. प्रमुख अतिथी म्हणून वरोरा नगराध्यक्षा अर्चना ठाकरे, शिवसेना चंद्रपूर-वणी आर्णी लोकसभा संघटक मुकेश जिवतोडे, राष्ट्रीय सचिव ईश्वरसिंग शेंगर, राष्ट्रीय कार्याध्यक्ष योगेश तुरेराव, प्रदेश अध्यक्ष संतोष धरमकर, संघटनेच्या राष्ट्रीय कार्यकारणी महिला अध्यक्ष डॉ. भारती मुरकुटे, पत्रकार संरक्षण समितीचे प्रदेशाध्यक्ष विनोद पात्रे, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस डॉ. विश्वास आरोटे, तसेच राज्य सचिव आशिष घुमे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर उपस्थित मान्यवरांनी काल, आज आणि उद्याची पत्रकारिता या विषयावर मार्गदर्शन केले. नगराध्यक्षा अर्चना ठाकरे यांनी पत्रकार संघाच्या उपक्रमांचे कौतुक करत, पत्रकार समाजातील वास्तव मांडतात; त्यांच्या निष्ठेमुळेच लोकशाहीचे अस्तित्व टिकून आहे, असे गौरवोद्गार काढले. शिवसेनेचे लोकसभा संघटक मुकेश जिवतोडे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. ते म्हणाले की, पत्रकार हे समाजाचे सजग प्रहरी आहेत. अन्याय, भ्रष्टाचार आणि अंधारात झाकलेल्या सत्याला प्रकाशात आणण्याचे धैर्य त्यांच्यात आहे. आजच्या काळात प्रामाणिक पत्रकारितेला अनेक अडचणी आहेत, तरीही ती समाज परिवर्तनाची शक्ती आहे. शासनाने ग्रामीण पत्रकारांच्या प्रश्नांकडे गंभीरतेने पाहावे आणि त्यांना आवश्यक सुविधा द्याव्यात, असे मत त्यांनी मांडले. अधिवेशनात ग्रामीण आणि लघु वृत्तपत्रांना शासनमान्यता व आर्थिक साहाय्य मिळावे, यावर विशेष भर देण्यात आला. लघु वृत्तपत्रांना मुद्रण व कागदावरील जीएसटीमधून सूट मिळावी, ज्येष्ठ पत्रकारांच्या सन्मान निधीच्या अटी शिथिल कराव्यात, तसेच राजमाता जिजाऊ, अहिल्यादेवी होळकर आणि सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त राज्य शासनाकडून दर्शनी जाहिराती वितरित व्हाव्यात, अशी मागणी अधिवेशनातून करण्यात आली. तसेच अधिस्विकृतीपत्र प्रक्रियेत ग्रामीण पत्रकारांना सुलभता मिळावी, शासनमान्य यादीत नसलेल्या वृत्तपत्रांना पुन्हा जाहिराती सुरू कराव्यात, पत्रकारांसाठी स्वतंत्र घरकुल योजना राबवावी, त्यांच्या मुलांना शिक्षण हक्क कायद्यात सवलती द्याव्यात, यूट्यूब आणि डिजिटल माध्यमांना अधिकृत नोंदणी द्यावी, तसेच राज्य परिवहनच्या सर्व प्रकारच्या बससेवांमध्ये पत्रकारांना सवलती मिळाव्यात, अशा मागण्या करण्यात आल्या. माध्यम स्वातंत्र्यावर हक्कभंगासारख्या कारवायांमुळे निर्माण होणाऱ्या दडपशाहीविरोधात पत्रकारांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे संरक्षण करण्याची गरजही ठळकपणे अधोरेखित करण्यात आली. या सर्व ठरावांचे सादरीकरण आणि प्रास्ताविक योगेश तुरेराव यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन महादेव जबंगी (सोलापूर) यांनी केले, तर आभार प्रदर्शन संतोष धरमकर यांनी मानले. या अधिवेशनाने पत्रकारांच्या समस्यांकडे शासन आणि समाजाचे लक्ष वेधत, पत्रकारांच्या सन्मान, सुरक्षा आणि सामाजिक प्रतिष्ठेसाठी महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. वरोरा येथील हा उपक्रम पत्रकार संघटनेच्या इतिहासात एक प्रेरणादायी अध्याय ठरला आहे.






















## पुरस्कार सोहळा ठरला आकर्षणाचा केंद्रबिंदू


अधिवेशनाच्या समारोपावेळी राज्यातील कार्यक्षम पत्रकार आणि सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्यांचा सन्मान करण्यात आला.राज्यस्तरीय युवा पत्रकार पुरस्कार व्हॉइस ऑफ मीडिया डिजिटल विंगच्या प्रदेशाध्यक्ष अश्विनी पुरी यांना जाहीर झाला. जीवन गौरव पुरस्कार डॉ. विश्वास आरोटे (संपादक दैनिक समर्थ गावकरी), पंढरीनाथ बोकारे (ज्येष्ठ पत्रकार, नांदेड), राजू पाटील (संपादक दैनिक मनोगत व द रिंगण लाईव्ह, औसा), डॉ.किशोर पाटील (संपादक दैनिक स्वराज्य तोरण, भिवंडी), रमाकांत साळुंके (संपादक साप्ताहिक सिद्धेश्वर संदेश, सोलापूर), ज्ञानेश्वर धुळे (संपादक साप्ताहिक कारंजा सामना), डॉ. मेहबूब मालाबोडी (डिपार्टमेंट एक्सप्रेस, कर्नाटक), विलासकुमार सिंधे (दैनिक हेज्जे गुरुटू, कर्नाटक), सुरेश चिंचोळकर (साप्ताहिक बिरसा वार्ता, यवतमाळ), आनंद शुक्ला (साप्ताहिक जागरण, वर्धा) आणि श्याम ठेंगडी (दैनिक तरुण भारत, वरोरा) यांना देण्यात आला. तसेच देवदूत पुरस्कार वरोरा उपजिल्हा रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. प्रफुल खुजे यांना देण्यात आला.



संस्थापक संघटक
मा.श्री.संजय भोकरे
राष्ट्रीय अध्यक्ष
मा.श्री.अशोकराव वानखेडे
प्रदेश अध्यक्ष
मा.श्री.गोविंदराव वाकडे
प्रदेश कार्याध्यक्ष
मा.श्री.निलेश सोमाणी
राज्य समन्वयक
श्री. नितीन शिंदे



संकल्प असावेत
नवे तुमचे मिळाव्यात
त्यांना नव्या दिशा
प्रत्येक स्वप्न पूर्ण
व्हावे तुझेह्याच
वाढदिवसाच्या
शुभेच्छा:!



सोशल मिडीया प्रदेश अध्यक्ष
श्री.सिध्दार्थ भोकरे
प्रदेश संपर्क प्रमुख
मा.श्री.वैभव स्वामी
इलेक्ट्रॉनिक मिडीया प्रदेश अध्यक्ष
श्री.अतुल परदेशी



आरोग्य सेल प्रदेश अध्यक्ष
मा.श्री.अमितकुमार खाडे
राज्य निवड समिती अध्यक्ष
मा.श्री.रुपेश पाडमुख
प्रवक्ते
मा.श्री.रमेश डोंगरे



सांस्कृतिक विभाग अध्यक्ष प्रदेश अध्यक्ष
श्री.संदिप भटेवरा
कायदेविषयक सल्लागार
ॲड.रचना भालके
प्रदेश प्रसिध्दी प्रमुख
मा.श्री.नवनाथ जाधव

# मा. श्री. निलेश सोमाणी

## प्रदेश कार्याध्यक्ष

## यांना वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा



श्री.रमजान मन्सुरी
गुजरात प्रदेश अध्यक्ष
श्री.मनिष महाजन
मध्यप्रदेश अध्यक्ष
राजश्री चौधरी
दिल्ली प्रदेश अध्यक्ष



श्री.आबा खवणेकर
गोवा प्रदेश संपर्क प्रमुख
श्री.रघुनाथ सोनवणे
दिल्ली प्रदेश संपर्क प्रमुख



मा.श्री.अशोक देढे
प्रदेश उपाध्यक्ष
मा.श्री.महेश पानसे
प्रदेश उपाध्यक्ष
मा.श्री.अभयकुमार दांडगे
प्रदेश उपाध्यक्ष
मा.श्री.किशोर रायसाकडा
प्रदेश उपाध्यक्ष

शुभेच्छूक :-

**प्रदेश कार्यकारिणी सदस्य/ विभागीय अध्यक्ष**

सौ.सुरेखा खानोरे (सचिव), श्री.नितीन जाधव (मंत्रालय संपर्क प्रमुख),
श्री.नयन मोंढे (विदर्भ प्रमुख), श्री.सुनील फुलारी (अमरावती विभाग अध्यक्ष),
श्री.शैलेश पालकर (कोकण विभागीय अध्यक्ष), श्री.अनिल सावंत (मराठवाडा विभागीय अध्यक्ष),
श्री.अनुपकुमार भार्गव (नागपूर विदर्भ प्रमुख), श्री.भुवनेश दुसाने (उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष),

श्री.प्रशांत कांबळे (मुंबई), श्री.सुरेश खोसे (अहिल्यानगर), श्री.स्वामीराज गायकवाड (सोलापूर),
श्री.संग्राम मोरे (नांदेड),
श्री.स्वामी शिरकुल (मुंबई), श्री.सुभाष विसे (ठाणे), श्री.बाजीराव फराकटे (कोल्हापूर),
श्री.अनिल रहाणे (अहिल्यानगर), कु.श्रध्दा ठोंबरे (बदलापूर), श्री.पराग कुंकूलोळ (पिंपरी चिंचवड),
श्री.लक्ष्मण डोळस (नाशिक), श्री.सिताराम गावडे (सिंधूदूर्ग), श्री.अरुण लोखंडे (तुळजापूर),
श्री.शरद नागदेवे (नागपूर), श्री.रुपेश पाडमुख (नांदेड), प्रभू गोरे,
श्री.सुभाष डोके (प्रदेश का. सदस्य), श्री.राजेंद्र कोर्टे पाटील (पंढरपूर),
श्री.कुंडलिक वाळेकर (औरंगाबाद), श्री.रवींद्र गुरव (नंदुरबार), श्री.अबरार मिर्झा (जळगाव),
श्री.संतोष खालकर (सातारा), श्री.पंकज सोनवणे (वाशिम), प्रा.जसपाल सिंह सिसोदिया (धुळे),
श्री.संजोग काळदंते (पश्चिम महाराष्ट्र सचिव), श्री.नाविद अहमद (हिंगोली), विकास कदम (सातारा)

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ; मुंबई
महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ; मुंबई

## संघटनेचे सर्व जिल्हा पदाधिकारी, तालुकाध्यक्ष व सभासद



# डॉ. श्री. विश्वासराव आरोटे

## पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा
## दैं. स. गांवकरीचे संपादक


हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : अ–१, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# सरकारी कामे तातडीने मार्गी लावा शासनाच्या योजना सर्वसामान्य पर्यंत पोहोचवा न्यायमूर्ती श्रीमती कंगणवाडी

अकोले (समर्थ गांवकरी)

सरकारी काम आणी सहा महिने थांब असा अनुभव आला नाही पाहिजे यासाठी शासनाचे योजना सर्वसामान्या पर्यंत पोहचवण्यासाठी असे कार्यक्रम महत्वाचे असतात.जिथे लोकांना लाभ देता येते व कर्तव्य ही सांगता येते असा हा महामेळावा आहे.ज्यांनी सरकारी योजनेचा लाभ घेतला त्यांनी स्वतःची आर्थिक,समाजिक प्रगतीकडे एक पाऊल टाकले आहे.अकोले कराचा या मेळाव्याला चांगला प्रतिसाद मिळाला आसुन प्रत्येकाने उन्नत भारताचे,प्रगतशिल राष्ट्राचे ,सुसंपन्न राज्याचे स्वप्न पाहावे असे प्रतिपादन अहिल्यानगर जिल्ह्याचे पालक न्यायमूर्ती तथा मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाचे न्यायमूर्ती श्रीमती विभा कंकणवाडी यांनी केले .

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली, महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या विशेष निर्देशान्वये अहिल्यानगर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व अकोले तालुका विधी सेवा समिती तसेच जिल्हा व तालुका प्रशासनासह शासकीय विभागांच्या संयुक्त विद्यमाने आणि अकोले व राजूर तालुका वकील संघाच्या सहकार्याने आज औद्योगिक प्रशिक्षण केंद्र अकोलेच्या मैदानावर विधी सेवा महाशिबीर व शासकीय योजनांचा महामेळावा व लाभ वितरण कार्यक्रम संपन्न झाला आहे.यावेळी अहिल्यानगर जिल्ह्याचे पालक न्यायमूर्ती तथा मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाचे न्यायमूर्ती श्रीमती विभा कंकणवाडी व न्यायमूर्ती श्री. रोहित जोशी,अहमदनगर जिल्हा पालक न्यायमूर्ती श्री मेहरोज पठाण,अहमदनगर प्रभारी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष आशिष पाटील,अतिरिक्त जिल्हाधिकारी श्री बाळासाहेब कोळेकर, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे (भा.पो.से.), जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव योगेश पैठणकर, अकोले न्यायालयातील दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठस्तर) व्यासपीठावर उपस्थित होते

यावेळी बोलताना औरंगाबाद खंडपीठाचे न्यायमूर्ती श्रीमती विभा कंकणवाडी म्हणाल्या की न्यायालयीन विभागा अंतर्गत अनेकदा चर्चासत्र ,कार्यशाळा होते मात्र तेथे लोकांची उपस्थिती नसते कारण तिथे आम्ही आश्वासन देत नाही.त्यासाठी वेगळे व्यासपीठ हवे असते जिथे लोकांना लाभ देता येते व कर्तव्य सांगता येते असे व्यासपीठ आजचा महामेळवा आहे.शासन अनेक योजना सुरु करते मात्र सर्व योजनाची माहिती सर्व लोकाना ,शेवटच्या घाटकांना होत नाही .शासनाच्या सर्व योजना प्रत्येक लाभार्थी पर्यंत पोहचली जावी व त्याचा लाभ सर्वांना घेता यावा.तसेंच आदिवासी,दुर्बल,घटक यांना मुख्य प्रवाहात आणता यावे यासाठी हा महामेळवा आहे.याठिकाणी शासनाच्या सर्व विभागाचे स्टॉल लावलेले आहेत यातून सर्वांना माहिती मिळेल यात विनाकारण कुणाची अडचण होणार नाही याची काळजी प्रशासनाने घ्यावी अश्या सूचनाही न्यायमूर्ती श्रीमती विभा कंकणवाडी यांनी केल्या .

यावेळी न्यायमूर्ती श्री. रोहित जोशी म्हणाले की न्याय म्हणजे केवळ न्यायालयात दिला जाणारा न्याय नाही.संविधानाचे उदिष्टात म्हटले आहे जस्टीज फॉर ऑल अर्थात न्याय सर्वासाठी आहे त्यामुळं आजचा महामेळावा म्हणजे न्याय दानाचेच एक रूपाने कार्य आहे.राष्ट्रपिता महात्मा गांधी याची संकल्पना होती देशाचे प्रत्येक गाव आत्मनिर्भर तसेच् पूर्णत्वास येणारे अर्थीक घटक असणारे गाव असावे .प्रत्येक माणसाला त्याचे हक्क त्याचे दारी,घरी मिळावा म्हणून आजचा कार्यक्रम आहे.ज्ञान म्हणजे पावर आहे मात्र आजच्या काळात माहिती तंत्रज्ञान हे ही एक पावर (ताकद ) आहे.प्रत्येकाने आपले कर्तव्य पालन केले नाही तर कुठेतरी कोणी बाधित होतो .प्रशासनाने ही पुढे असे काम करावे की भविष्यात असे मेळावे घेण्याची गरज पडू नये असे आवाहन केले.

यावेळी अकोले तालुक्यातील अकराशे पेक्षा जास्त नागरिकां ना लाभ देण्यात आला. सर्व स्टॉल वरती न्यायमूर्तींनी भेट देऊन शासकीय योजनाची माहिती घेतली. बचत गटाच्या वस्तूंची खरेदी सुद्धा केली.

अकोले न्यायालयाचे न्यायाधीश राधाकिशन टेमसे, राजूर चे न्यायाधीश सचिन नेहरकर, पंचायत समितीचे गटविकास अधिकारी अमर माने, पोलीस निरीक्षक बोरसे, निवासी नायब तहसीलदार किसन लोहरे, महसूल नायब तहसीलदार प्रमोद सावंत, वीज वितरण उप अभियंता नामदेव शेळके, विठ्ठल सोनवणे, गटशिक्षण अधिकारी अरविंद कुमावत, महिला बालकल्याण अर्चना एखंडे, कृषीअधिकारी रत्नप्रभा शिंदे, पशुधन अधिकारी डॉ. अशोक धिंदळें, पुरवठा अधिकारी संदीप निळे, संजय गांधी निराधार योजना नायब तहसीलदार सचिन बांबळे,सेतू प्रतिनिधी सुशांत





वाकचौरे, रोटरी क्लब चे विद्याचंद्र सातपुते, आदींनी जनतेच्या प्रश्नाचे समाधान करण्याचा प्रयत्न केला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अकोले तालुका विधी सेवा समितीचे सदस्य मच्छिंद्र मंडलिक, , सुमिरण मालुंजकर, , दत्तात्रय मुठे, रामदास पवार, विजया पाडेकर, सुमन जाधव, मंगल मालुंजकर, मीना म्हसे, अशोक उघडे, श्याम खलाने, आदींनी मदत केली.

## कोळगाव येथे जूनपासून विज्ञान शाखेचे वरिष्ठ महाविद्यालय सुरू होणार : रयतचे चेअरमन चंद्रकांत दळवी यांची घोषणा

### कोळगावच्या शिष्टमंडळाशी चर्चेनंतर निर्णय; हेमंत नलगे यांची माहिती

श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)

रयत शिक्षण संस्थेच्या कोळगाव येथील वरिष्ठ महाविद्यालयाचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित होता. अखेर कोळगावच्या शिष्टमंडळाशी झालेल्या चर्चेनंतर येत्या जून महिन्यापासून कोळगाव येथे विज्ञान शाखेचे वरिष्ठ महाविद्यालय सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती माजी सरपंच तथा स्थानिक स्कूल कमिटी सदस्य हेमंत नलगे यांनी दिली.

रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी यांनी नुकतीच श्रीगोंदा येथील रयत संकुलाला भेट दिली. यावेळी कोळगावचे माजी सरपंच हेमंत नलगे, रोहन नलगे, विजय नलगे, नितीन नलगे, विश्वास थोरात तसेच प्राचार्य शहाजी हिरडे यांनी दळवी यांची भेट घेऊन कोळगाव येथे वरिष्ठ महाविद्यालय सुरू करण्याची मागणी केली.

हेमंत नलगे यांनी चर्चेदरम्यान सांगितले की, त्यांच्या आजोबा नारायणराव केरबा नलगे यांनी १९५७ साली सहा एकर सहा गुंठे जागा रयतचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांना विद्यालयासाठी खरेदी करून दिली होती. सुरुवातीला त्या ठिकाणी विद्यालय सुरू करण्याचे नियोजन होते. मात्र १९६० साली नागेश खंडेराव लगड यांनी दीड एकर व तत्कालीन ग्रामपंचायत सरपंच भास्करराव नलगे यांनी दीड एकर जागा उपलब्ध करून दिल्याने, गावालगतच्या सोयीस्कर ठिकाणी विद्यालय सुरू करण्यात आले.१९५६ ते १९५८ या कालावधीत विद्यालय कोळगाव येथील श्री कोळाईदेवी मंदिरात भरत होते. १९५९ साली कर्मवीर भाऊराव पाटील आणि १९६० साली नारायणराव नलगे यांचे निधन झाले. त्यानंतर ग्रामस्थांनी पुढाकार घेत गावात दगडी दहा खोल्यांची इमारत बांधून विद्यालय सुरू ठेवले. पुढे येथे कला व विज्ञान शाखेचे कनिष्ठ महाविद्यालय सुरू करण्यात आले. ग्रामस्थांनी वेळोवेळी नलगे यांनी दिलेल्या जागेवर वरिष्ठ महाविद्यालय सुरू करण्याची मागणी केली होती. तत्कालीन चेअरमन, अध्यक्ष शरद पवार तसेच इतर पदाधिकाऱ्यांकडेही पाठपुरावा करण्यात आला; मात्र मागणी पूर्ण झाली नव्हती. संबंधित जागेचा मूळ उद्देश लक्षात घेऊन तेथे वरिष्ठ महाविद्यालय अथवा बीसीएस, एमसीएस, आयटीआय यांसारखे व्यावसायिक अभ्यासक्रम सुरू करावेत, अशी मागणी हेमंत नलगे यांनी केली.

यावेळी चेअरमन दळवी यांनी त्या जागेवर पाईपलाईनद्वारे पाणी आणून शेती सुरू करता येईल का, याबाबत विचारणा केली. त्यावर हेमंत नलगे यांनी संबंधित जागा वरिष्ठ महाविद्यालयासाठीच दिली असल्याचे स्पष्ट करत गाव व परिसरातील विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी महाविद्यालय सुरू करण्याचा आग्रह धरला.

यानंतर चेअरमन दळवी यांनी येत्या जून महिन्यापासून सध्या गावातील उपलब्ध इमारतीमध्ये विज्ञान शाखेचे वरिष्ठ महाविद्यालय सुरू करण्यात येईल, असे सांगितले. माजी आमदार राहुल जगताप यांनीही सुरुवातीला गावातील इमारतीत महाविद्यालय सुरू करून पुढील टप्प्यात नलगे यांनी दिलेल्या जागेवर स्वतंत्र इमारत उभारण्याचा मानस व्यक्त केला.

या भेटीवेळी संस्थेचे सचिव विकास देशमुख, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य रवींद्र पवार, जनरल बॉडी सदस्य तथा माजी आमदार राहुल जगताप, बाबासाहेब भोस, उत्तर विभागाचे निरीक्षक नवनाथ बोडखे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

दरम्यान, जून महिन्यात कोळगाव येथे प्रत्यक्षात वरिष्ठ महाविद्यालय सुरू होणार का, याबाबत ग्रामस्थांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे.

## पिंपळगावरोठा जय मल्हार विद्यालय नवीन शाळा इमारत बांधकाम प्रगतीपथावर : उर्वरित बांधकामासाठी निधीची आवश्यकता

पिंपळगाव (समर्थ गांवकरी)

पिंपळगाव रोठा .ता.पारनेर जिल्हा .अहिल्या नगर येथील जय मल्हार शिक्षण प्रसारक संस्थेचे जय मल्हार विद्यालय पिंपळगावरोठा येथील नवीन इमारतीचे बांधकाम प्रगतीपथावर असुन तिन मजली इमारतीचे सिमेंट प्लास्टर पर्यंतचे काम झाले आहे.बाकी राहीलेल्या कामांमध्ये इमारतीचे प्लंबिंग, इलेक्ट्रिक फिटींग, लादीकाम, पाणी व्यवस्था पाण्याची टाकी, सॅनिटरी फिटींग, दरवाजे खिडक्या,शटर, इमारतीचे गेट, सवरक्षण भिंत, खेळाचे मैदान, आणि मुख्य प्रवेशद्वार कमान इत्यादी कामांसाठी अजून निधी ५० लाख रुपये पर्यंतचा खर्च अपेक्षित आहे. तरी विद्यालयाचे माजी विद्यार्थी, माजी विद्यार्थ्यांनी, शिक्षक कर्मचारी वृंद, पालकवर्ग, ग्रामस्थ, मुंबईकर पुणेकर मंडळी तसेच इतर देणगीदार यांनी पुन्हा यथाशक्ती देणगी देऊन इमारत बांधकामासाठी मदत करावी.सदर देणगी आयकर कलम इन्कम टॅक्स (80G) खाली करसवलत प्राप्त आहे. त्याचा देखील देणगीदारांना लाभ घेता येईल. सन २०२६ च्या जुन महिन्याच्या अगोदर शाळा इमारतीचे बांधकाम पूर्ण करण्याचे संस्थेचे व जय मल्हार विद्यालयाचे उद्दिष्ट आहे. त्याचवेळी शाळेच्या भव्यदिव्य इमारतीचा उद्घाटन सोहळा संपन्न करण्यात येणार आहे.संस्थेचे बचत खाते नंबर -५४१४७४७३३३ सेन्ट्रल बँक ऑफ इंडिया असे असुन अधिक माहितीसाठी संस्थेचे सचिव अँड. पांडुरंग विठ्ठल गायकवाड. मो. नंबर ९८२२६२०१४२ आणि विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री उत्तम गणपत सुंबरे सर मो.नंबर ९६२३८०८०५५ यांच्याशी संपर्क साधावा.

शाळेच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त सन २०२३ मध्ये शाळा इमारतीचे बांधकाम सुरू करण्यात आले होते. आत्ता पर्यंत अंदाजे एक कोटी रुपये पर्यंतचा



खर्च शाळा बांधकामावर खर्च झालेला आहे. थोर समाजरत्न दानशूर शेठ डॉ नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला यांच्या संस्थेच्या माध्यमातून १०० ब्रास लादी इमारत बांधकामामध्ये दान रुपात मिळणार आहे. महाशिवरात्रीच्या पावन पवित्र काळात शेठ नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला यांनी प्रत्यक्ष विद्यालयाला भेट देऊन शाळेच्या नवीन इमारत बांधकामाची पाहणी करून समाधान व्यक्त केले. आणि समाजातील दानशूर दातृत्व असणाऱ्या देणगीदारांनी उर्वरित शाळेच्या राहीलेल्या कामांसाठी मदत करावी असे आवाहन केले.

## काष्टीत घोडनदीतीरी दशक्रिया घाटाची स्वच्छता; संतनिरंकारी मंडळाचा उपक्रम

श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)

सद्गुरू माता सुदीक्षाजी महाराज यांच्या आदेशानुसार श्रीगोंदा तालुक्यातील काष्टी येथील घोडनदीतीरी असलेल्या दशक्रिया घाटाची संतनिरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनच्या वतीने स्वच्छता करण्यात आली. मंडळाच्या सदस्यांनी एकत्र येऊन संपूर्ण घाट व परिसर स्वच्छ केल्याने त्यांच्या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

काष्टी गावातील घोडनदीकाठी असलेल्या या दशक्रिया घाटावर दररोज गावासह परिसरातील गावांतील मयत व्यक्तींचे दशक्रिया विधी पार पडतात. मात्र विधीनंतर वापरलेले साहित्य नष्ट न केल्याने घाट परिसरात मृत व्यक्तींचे कपडे, अर्धवट जळालेले लाकूड, प्लास्टिक पिशव्या, बाटल्या, अन्नपदार्थ, पाने-फुले, मडकी, केस तसेच अंत्यसंस्कार व दशक्रिया विधीचे विविध साहित्य मोठ्या प्रमाणात साचले होते. त्यामुळे परिसरात अस्वच्छतेचे साम्राज्य पसरले होते.

या समस्येची दखल घेत संतनिरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनच्या माध्यमातून मंडळाच्या सदस्यांनी पुढाकार घेतला. सकाळी आठ वाजल्यापासून सुरू झालेल्या या उपक्रमात दहा ते पंधरा सदस्यांनी दिवसभर परिश्रम घेत घाट व घोडनदी परिसराची स्वच्छता केली आणि संतसेवा बजावली.

या स्वच्छता मोहिमेसाठी गावचे लोकनियुक्त सरपंच साजन पाचपुते, उपसरपंच शितल नितीन ढमे व ग्रामविकास अधिकारी शरद कवडे यांनी ग्रामपंचायतीमार्फत झाडू, घमेले, टिकाव, खोरे, दातुळ आदी स्वच्छतेचे साहित्य उपलब्ध करून दिले.

स्वच्छता अभियानात प्रभाकर शिंदे, अमोल रसाळ, रविंद्र राहिंज, विठ्ठल शिंदे, शिवाजी श्रीराम, विकास लिंमकर, भाऊसाहेब खेंडके, दिलीप उमाप, राजाराम वीर, मिनीनाथ आढागळे, सुरेंद्र गुप्ता, नंदिनी श्रीराम यांच्यासह संतनिरंकारी मंडळाचे सेवेकरी सहभागी झाले होते.

### रांगोळीतून स्वच्छतेचा संदेश

स्वच्छता उपक्रमानंतर मंडळाच्या सदस्यांनी घाट परिसरात रांगोळी काढून व फलक लावून स्वच्छतेचा संदेश दिला. स्वच्छ जल, स्वच्छ मन, प्रदूषण अंदर हो या बाहर दोनो हानिकारक है, जल बचाओ, कल बचाओ, सभी की है ये जिम्मेदारी, साफ हो ये दुनिया हमारी, प्रदूषित पानी हमारी हानी, स्वच्छ काष्टी, सुंदर काष्टी अशा घोषवाक्यांद्वारे नागरिकांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून देण्यात आले.

## निस्वार्थी संविधान सेवेबद्दल रावसाहेब घोडके यांना 'आदर्श समन्वयक' पुरस्काराने सन्मानित

श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)







संविधान सजगता मंच, पिंपरी-चिंचवड आणि संविधान गुणगौरव समिती, रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित संविधान गुणगौरव परीक्षा २०२५-२०२६ सन्मान पुरस्कार सोहळा व कार्यशाळा उत्साहात पार पडली. या सोहळ्यात निस्वार्थी संविधान सेवेबद्दल रावसाहेब घोडके यांना 'आदर्श समन्वयक' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

रावसाहेब घोडके हे गेली अनेक वर्षे स्वतःच्या सायकलच्या माध्यमातून संविधान जनजागृतीचे कार्य करत आहेत. त्यांच्या सायकलच्या दर्शनी भागावर भारतीय संविधानाची उद्देशिका, महापुरुषांचे फोटो तसेच पर्यावरण संवर्धनाचे संदेश प्रदर्शित केलेले असतात. या माध्यमातून ते गावोगावी जाऊन सामान्य नागरिकांपर्यंत संविधानाचे महत्त्व, महापुरुषांचे विचार आणि सामाजिक जाणीवा पोहोचवत आहेत.

ते प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये जाऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधतात आणि संविधानाचे महत्त्व पटवून देतात. दरवर्षी संविधान विषयक परीक्षा आयोजित करून विद्यार्थ्यांमध्ये जागृती निर्माण करण्याचे कामही ते सातत्याने करत आहेत. कोणतीही अपेक्षा न ठेवता तन-मन-धनाने ते हे कार्य निस्वार्थीपणे पार पाडत आहेत. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन यावर्षी त्यांना प्रमाणपत्र, ट्रॉफी आणि गोल्ड मेडल देऊन गौरविण्यात आले.

तसेच मिशन गर्ल्स हायस्कूल येथील के. एम. घोडके यांनाही केंद्रप्रमुख म्हणून उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल ट्रॉफी, सन्मानपत्र व गोल्ड मेडल प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मानव दादा कांबळे होते, तर उद्घाटक म्हणून रवि लांडगे उपस्थित होते. प्रमुख अतिथी म्हणून बगाडे व बोदडे यांची उपस्थिती लाभली. संविधान अभ्यासक नुरखा पठाण सर यांनी प्रमुख मार्गदर्शन केले.

यावेळी अंकीता घोडके, पालक, विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जल संवर्धनाच्या दिशेने संत निरंकारी मिशनचे जुन्नर-आंबेगाव तालुक्यातील नारायणगाव, जुन्नर सह बोरी-आळेफाटा, घोडेगाव, चास-कडेवाडी आणि चिंचोली (कोकणे) येथे भव्य स्वच्छता अभियान संपन्न...!!

जुन्नर (समर्थ गांवकरी)

जुन्नर-आंबेगाव तालुक्यातील मीना नदी - नारायणगाव, भास्कर घाट-जुन्नर सह कुकडी नदी-बोरी,आळेफाटा, घोडेगाव, चास-कडेवाडी आणि चिंचोली (कोकणे) येथील घोडनदीचा घाट / किनारा (तिर) परिसर सह पुण्यात एकाच वेळी ४२ ठिकाणी निरंकारी स्वयंसेवकांनी केले नदीपात्र स्वच्छ..!=घइ

जुन्नर-आंबेगाव (पुणे) : - जेव्हा सेवा हीच साधना ठरते आणि निसर्गाविषयी संवेदनशीलता जीवनाचा मूलमंत्र बनते, तेव्हा समाजाला नवी दिशा देणारे पवित्र संकल्प जन्माला येतात. मानवसेवा व लोककल्याणाच्या या दिव्य भावनेला साकार रूप देत संत निरंकारी मिशनच्या वतीने 'प्रोजेक्ट अमृत' अंतर्गत 'स्वच्छ जल-स्वच्छ मन' या अभियानाच्या चौथ्या टप्प्याचे आयोजन रविवार, २२ फेब्रुवारी २०२६, सकाळी ८ ते ११ वाजेपर्यंत परम श्रद्धेय निरंकारी सतगुरु माता सुदीक्षा जी महाराज यांच्या कृपाशीर्वादाने एवं निरंकारी राजपिता जी यांच्या पावन मार्गदर्शनाखाली संपूर्ण भारतभर एकाच वेळी राबविण्यात आले.

या अभियाना अंतर्गत पुणे जिल्ह्यातील घोडनदी सह कुकडी, मिना, इंद्रायणी, मुळा, मुठा, भीमा, भामा, घोडनदी, पवना, वेळू, कऱ्हा, मांडवी, आनंदी या नद्यांसह शहरातील विविध तलाव अशा ४२ ठिकाणी ही मोहीम विशेष राबविण्यात आली. यात घोडनदी-घोडेगाव चांडोली - मंचर, मीना नदी - नारायणगाव, भास्कर घाट-जुन्नर सह कुकडी नदी- बोरी,आळेफाटा ब्रांच च्या माध्यमातून सर्वच ठिकाणी जवळच्या नदीच्या पात्रात / घाटांवर भव्य स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. यावेळी अनेक क्षेत्रातील मान्यवर, समाजसेवक, कार्यकर्ते, जलप्रेमी, निसर्गप्रेमी सह मिशनचे बहुतेक स्वयंसेवक / सेवादार मोठ्या संख्येने आवर्जून उपस्थित होते.

या प्रसंगी संत निरंकारी मिशनचे श्री नंदकुमार झांबरे यांनी माहिती देताना सांगितले की, हा विशाल उपक्रम देशभरातील १६०० हून अधिक ठिकाणी तसेच पुण्यामध्ये ४२ ठिकाणी एकाच वेळी या अभियानाचे आयोजन





करण्यात आले होते. पाणी हे केवळ एक साधन नसून जीवनाचा आधार आणि ईश्वराची अमूल्य देणगी आहे त्याचे संरक्षण करणे हे प्रत्येक नागरिकाचे नैतिक कर्तव्य आहे हि जागृती समाजामध्ये निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. संत निरंकारी मिशनने बाबा हरदेव सिंह जी यांच्या प्रेरणादायी शिकवणी आत्मसात करून सन २०२३ मध्ये संस्कृती मंत्रालय, भारत सरकार यांच्या सहकार्याने 'प्रोजेक्ट अमृत'ची सुरुवात केली होती.

जलसंवर्धन हा उपक्रम केवळ एखाद्या दिवसापुरता किंवा मर्यादित मोहिमेपुरता न ठेवता, तो एक जीवनशैली, संस्कार आणि सेवाभाव म्हणून स्वीकारण्याची प्रेरणा बनेल - जिथे स्वच्छ जलातून स्वच्छ मन आणि स्वच्छ समाज देखील घडू शकेल.

निरंकारी सतगुरु माताजींचा संदेश सदैव हाच राहिला आहे की, आपण ही पृथ्वी पुढील पिढ्यांसाठी अधिक

# शिवजयंतीनिमित्त ब्राह्मणवाडा येथे विविध आरोग्य शिबिरांचे यशस्वी आयोजन

## १०० रक्तदाते, २० मोतीबिंदू शस्त्रक्रिया, २२० रुग्णांची मोफत तपासणी





ब्राह्मणवाडा (समर्थ गांवकरी)

सन्माननीय श्री शंकरजी गायकर साहेब ( राष्ट्रीय प्रवक्ते तथा सह मंत्री विश्व हिंदू परिषद)यांच्या संकल्पनेतून आदिम आदिवासी आरोग्यवर्धिनी फाउंडेशन संचलित श्री सुखप्रदा हॉस्पिटल, ब्राह्मणवाडा येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त विविध आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते.

दि. १९ फेब्रुवारी रोजी भव्य रक्तदान शिबिर, मोफत नेत्रतपासणी व मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर यशस्वीपणे पार पडले.

रक्तशिवमावळ्यांचे या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. सुमारे १०० रक्तदात्यांनी रक्तदान करून आपल्या लाडक्या राजाचा जन्मोत्सव सामाजिक उपक्रमातून साजरा केला. हे रक्तदान शिबिर हरिश्चंद्र अर्पण ब्लड स्टोरेज सेंटर यांच्या सहकार्यातून संपन्न झाले.

त्याच दिवशी झालेल्या नेत्रतपासणी व मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरालाही उत्कृष्ट प्रतिसाद मिळाला. यामध्ये सुमारे १२० रुग्णांची नेत्रतपासणी करण्यात आली. तपासणीतून २० रुग्णांमध्ये मोतीबिंदूचे निदान झाले असून त्यांच्यावर तात्काळ शस्त्रक्रिया करण्यात आली. सदर तपासणी व शस्त्रक्रिया सुप्रसिद्ध नेत्ररोगतज्ज्ञ डॉ. सुप्रिया तोरकडी मॅडम व इतर तज्ज्ञ डॉक्टरांच्या उपस्थितीत, रोटरी दर्शन संगमनेर यांच्या सहकार्याने पार पडल्या.

दि. २० फेब्रुवारी रोजी मेडिकव्हर हॉस्पिटल यांच्या सहकार्याने मोफत सुपर स्पेशालिटी आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात डॉ. जगदीश वाबळे (चऊ मेडिसिन), डॉ. अमेय इथापे (इंटरव्हेन्शनल कार्डिओलॉजिस्ट), डॉ. पंकज नंदागवळी (जनरल व लॅप्रोस्कोपिक सर्जन), डॉ. अमित सुर्वे (ऑर्थोपेडिक सर्जन), डॉ. सागर कोटकर (स्त्रीरोग व प्रसूती तज्ज्ञ), डॉ. अतुल पवार (युरो सर्जन) व डॉ. पायल रांगरेज (फिजिओथेरपिस्ट) यांनी रुग्णसेवा बजावली. या शिबिरामध्ये सुमारे २२० रुग्णांची मोफत तपासणी करण्यात आली.

या सामाजिक उपक्रमाचे आयोजन अकोले तालुका मेडिकल असोसिएशन, निमा अकोले-संगमनेर, प्राथमिक आरोग्य केंद्र, ब्राह्मणवाडा व ग्रामपंचायत कार्यालय, ब्राह्मणवाडा यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते.या उपक्रमांमुळे ग्रामीण व दुर्गम आदिवासी भागातील नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध होऊन छत्रपती शिवाजी महाराज जयंती सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून साजरी करण्यात आली.

# मुलांमध्ये कवितेचे बीज रुजवण्याचे उत्तम माध्यम म्हणजे काव्यांकुर : बाल साहित्यिक सुभाष किन्होळकर



बुलढाणा (समर्थ गांवकरी)

सध्याच्या काळात वाचन चळवळ लोप पावते की काय असे वाटत असतांना बालकांसाठी एखादी चळवळ चालवणं खूप कठीण आहे. काव्यांकुरच्या माध्यमातून बालकांना मोठे व्यासपीठ उपलब्ध करून देण्याची जबाबदारी मृण्मयी मल्टीपर्पज सोसायटीने घेतली. ही कौतुकास्पद बाब आहे .कविता सादर करणे म्हणजे खूप सोपी गोष्ट आहे असे नाही .ओठांची हालचाल करत असतांना शब्दांचे उच्चारण चांगले होते, त्या माध्यमातून आंतरिक भावना व विचारांचे प्रगटीकरण होते.हे लहान मुलांच्या लकबीतून सहजपणे बाहेर येते. पालकांनीही आपल्या मुलांमधील वेगळेपण जपण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे. काव्यांकुरच्या माध्यमातून लहान मुलांनी विविध प्रकारच्या कविता सादर करत असतांना शेतीमातीची ,देशभक्तीची, मातृभाषेची गोडी सांगणारी, बहिणाबाईंची अशा विविध प्रकारच्या कविता सादर करून वैचारिक प्रगल्भता दाखवली. मुलांनी सादर केलेल्या कवितांमध्ये त्यांच्या पालकांचेही मोठे योगदानही वाखाण्यासारखे आहे. पालकांनी काव्यांकुरकडे स्पर्धेच्या माध्यमातून न बघता ही आपल्या पाल्यासाठी व्यासपीठावर काहीतरी सादर करण्यासाठी असलेली खूप मोठी संधी आहे. या दृष्टीने बघावे. त्यातूनच आपल्या मुलांमधील जिज्ञासू वृत्ती जागृत होईल . त्यातून त्यांच्यामध्ये चांगल्या प्रकारची ऊर्जा निर्माण होईल असे मत बाल साहित्यीक सुभाष किन्होळकर यांनी मृण्मयी मल्टीपर्पज सोसायटीच्यावतीने काव्यांकुर स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी व्यक्त केले. याप्रसंगी व्यासपीठावर डॉ.गजेंद्र निकम व डॉ. वैशाली निकम यांची उपस्थिती होती.

ज्ञानपीठ पुरस्कार विजेते वि.वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांच्या २७ फेब्रुवारी जयंती पर्वावर मराठी राजभाषा गौरव साजरा करण्यात येतो या निमित्ताने मृण्मयी मल्टीपर्पज सोसायटीच्या वतीने वय ५ ते १५ या वयोगटातील बालकांसाठी काव्यांकुर या कविता सादरीकरण स्पर्धेचे आयोजन दिनांक २२ फ`ब्रुवारी रोजी करण्यात आले होते. काव्यांकुर मध्ये मुलांनी अतिशय दमदारपणे कवितेला साजेशी वेशभूषा साकारून विविध विषयांच्या कविता सादर केल्या. यानिमित्ताने प्रास्ताविक करतांना रविकिरण टाकळकर यांनी काव्यांकुर आयोजना मागची भूमिका विशद केली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. वैशाली निकम व मृण्मयी निकम यांनी राजमाता जिजाऊ व बाल शिवबा यांच्या भूमिका साकारून त्यांच्यातील संवाद सादर केला. काव्यांकुर मध्ये लहान गटात शौर्य संदीप साठे प्रथम, समर स्वप्निल पाटील द्वितीय, रेवा निलेश सोनुने तृतीय, अर्पित निषाद टाकळकर उत्तेजनार्थ, अरित्री निखिल नलावडे उत्तेजनार्थ क्रमांक मिळवून विजयी झाली.

तर मोठ्या गटात सईशा स्वप्नील काळवाघे प्रथम , संबोधी संदीप गवई द्वितीय, रुजूला ओंकार गोडबोले तृतीय, निर्गुण प्रशांत सदावर्ते उत्तेजनार्थ, अन्वी अरुण गवारे उत्तेजनार्थ क्रमांक प्राप्त केला.

यांना पदक व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. पारितोषिक वितरण समारंभात बोलतांना वैशाली निकम यांनी मुलांमधील सुप्त गुणांना वाव मिळवून देण्यासाठी अशा स्पर्धांचे आयोजन केल्या जाते, मुलांचा व त्यांच्यासोबत पालकांचा असलेला सहभागच मुलांच्या एकूण सर्वांगीण विकासासाठी फायदेशीर ठरतो, पालकांनी मुलांच्या व्यक्तिमत्व विकासात त्यांच्या कलानुसार त्यांना सहभागी होण्याच्या संधी उपलब्ध करून द्यावा असे सांगितले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन क्षितिज निकम व सई वानखेडे यांनी केले. या कार्यक्रमासाठी पालकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# आळकुटी येथील आदर्श माता सोनाताई अंबरचंद पोखरणा यांना राजमाता जिजाऊ पुरस्कार २०२६ प्रदान





आळकुटी / (समर्थ गांवकरी)

नुकताच आळकुटी ग्रामीण पतसंस्थेच्या परिवाराच्या वतीने दरवर्षी दिला जाणारा राजमाता जिजाऊ पुरस्कार २०२६ यावर्षी आळकुटी येथील आदर्श माता सोनाताई अंबरचंद पोखरणा यांना दिला गेला या प्रसंगी ग्रामविकास मंत्रालय कक्ष प्रमुख अधिकारी सौ अनघाताई ढवळे व श्रद्धा ढवण मॅडम आळेफाटा यांच्या उपस्थितीत तसेच ॲग्रो व्हिजन परिवाराचे समुदायाचे श्री महावीर पोखरणा व परिवार तसेच अमोल शेठ चंगेडिया परिवार उपस्थित होते अशी माहिती पारनेर तालुका प्रतिनिधी श्री रामदासजी नरड यांनी दिली

# शासकीय दुखवट्यात ७५ शाळांना अल्पसंख्याक प्रमाणपत्रे प्रदान केल्याचा आरोप निराधार

मुंबई / (समर्थ गांवकरी)

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाच्या दिवशी (दि.२८ जानेवारी २०२६ रोजी) अल्पसंख्याक विकास विभागामार्फत कोणत्याही नवीन फाईल्सवर किंवा प्रमाणपत्रांवर डिजिटल स्वाक्षरी करण्यात आलेली नाही, असा खुलासा अल्पसंख्याक विकास विभागाने केला आहे. तसेच त्या दिवशी कोणतेही प्रमाणपत्र वाटप झालेले नसल्याचेही विभागाने नमूद केले आहे.

अल्पसंख्याक दर्जा प्रदान करण्याची संपूर्ण प्रक्रिया ही ऑनलाइन, पारदर्शक असून २७ मे २०13 च्या शासन निर्णयातील तरतुदींनुसारच राबवली जाते. अर्जांची जिल्हास्तरावर पडताळणी झाल्यानंतरच छाननी करून प्रमाणपत्रे वितरित केली जातात, असे विभागाने नमूद केले आहे. विभागामार्फत कोणतेही अनधिकृत अथवा घाईघाईने कामकाज झाल्याचे वृत्त पूर्णपणे निराधार असून वस्तुस्थितीचा विपर्यास करणारे असल्याचा ठाम दावा अल्पसंख्याक विकास विभागाने केला आहे.

'लोकसेवा हक्क अधिनियम २०१५' अंतर्गत ठरविण्यात आलेल्या कालमर्यादेचा विचार करून, विभागाच्या सक्षम प्राधिकाऱ्यांमार्फत विहीत कार्यपद्धतीनुसार आदेश देण्याची प्रक्रिया यापूर्वीच पूर्ण करण्यात आली होती, असेही स्पष्टीकरण देण्यात आले आहे.

दि. २७ मे २०13 रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार अल्पसंख्याक दर्जा प्रमाणपत्र प्रदान करण्यासाठी उपसचिव श्री. शेणॉय यांना सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित करण्याच्या प्रस्तावास विभागाचे मंत्री यांनी २४ नोव्हेंबर २०२५ रोजी मान्यता दिली होती. त्यामुळे स्थगिती असताना सेवा प्रदान करण्यात आली, हा आरोप तथ्यहीन असल्याचे विभागाने स्पष्ट केले आहे.

महाराष्ट्र शासन




# स्वतःला विसरून समाजासाठी जगणारा दीपस्तंभ : निलेश पुनमचंद सोमाणी

स्वतःसाठी जगणे ही आयुष्याची सर्वात सोपी वाट असते. त्या वाटेवर चालताना फारसे कष्ट लागत नाहीत, फारसे प्रश्न पडत नाहीत, फारशी जबाबदारीही उचलावी लागत नाही. पण स्वतःला विसरून समाजासाठी जगणे ही तपश्चर्या असते. ती तपश्चर्या उपोषणाची नसते, ती रोजच्या आयुष्यात स्वतःच्या सुखाला बाजूला ठेवण्याची असते. ती तपश्चर्या गाजावाजा न करता, कोणतीही अपेक्षा न ठेवता, केवळ माणुसकीच्या ओढीने जगण्याची असते. अशी तपश्चर्या करणारी माणसे फार कमी जन्माला येतात. ही माणसे दिव्यासारखी असतात. स्वतः जळतात, झिजतात, पण इतरांच्या आयुष्यात उजेड पसरवतात. समाजाच्या गर्दीत अशी माणसे हरवत नाहीत; उलट काळाच्या ओघात ती अधिक तेजस्वी होत जातात. अशाच एका दीपस्तंभाचे नाव म्हणजे निलेश पुनमचंद सोमाणी.

वाशीम जिल्ह्याच्या साध्या, रखरखीत मातीमध्ये जन्मलेला हा माणूस आज केवळ एक व्यक्ती उरलेला नाही. तो एक विचार बनला आहे, एक चळवळ बनला आहे, आणि असंख्य तरुणांसाठी प्रेरणास्थान बनला आहे. त्यांच्या आयुष्याकडे पाहिले की एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते, यश सहज मिळत नाही, ते संघर्षाच्या आगीत तावून-सुलाखून निघाल्यावरच मिळते. समाजसेवा भाषणातून जन्माला येत नाही, ती त्यागातून, वेदनांतून आणि स्वतःला विसरण्यातून आकार घेते.

निलेश सोमाणी यांचा जन्म शेतकरी कुटुंबात झाला. गरिबी ही त्यांच्या आयुष्याची पहिली ओळख होती. घरात पैशांची चणचण होती, शेती हा व्यवसाय पुरणारा नाही वडीलावर कर्जही होते. उद्याचा दिवस कसा जाईल, याची खात्री नव्हती. आईंनी संसाराचा गाडा कष्टातून पुढे नेला.अनेक वेळा परिस्थिती इतकी कठीण होती की स्वप्ने पाहण्याचीही उसंत मिळत नसे. वडिलांनी पिठाची गिरणी ही अनेक वर्ष चालवली. पोटाची भूक भागवायची की शिक्षणाची चिंता करायची, असा प्रश्न अनेकदा उभा राहत असे. पण काही माणसे परिस्थितीसमोर शरण जात नाहीत; उलट परिस्थितीला आपल्या जिद्दीपुढे झुकायला भाग पाडतात. निलेश सोमाणी हे त्याच मातीचे बनलेले आहेत. लहान वयातच त्यांनी कष्टांचे खरे स्वरूप अनुभवले. शिक्षणाची ओढ मनात होती, पण कुटुंबाची जबाबदारी खांद्यावर होती. या दोन्हींचा समतोल साधताना त्यांनी पाठीवर कपड्यांचे गाठोडे घेतले आणि गावोगावी कपडे विकण्याचे काम स्वीकारले. रणरणत्या उन्हात, अंग झोडपून काढणाऱ्या पावसात, अनोळखी रस्त्यांवर चालताना त्यांनी केवळ आपली उपजीविका केली नाही, तर समाजाचे खरे रूप पाहिले. कुणाच्या चेहऱ्यावरची हतबलता, कुणाच्या डोळ्यांत साठलेली आसवं, कुणाच्या हातातली रिकामी झोळी या सगळ्या अनुभवांनी त्यांच्या मनावर खोल घाव घातले. त्या घावांनीच त्यांच्या अंतःकरणात करुणेचे बीज रोवले. हाच अनुभव पुढे त्यांच्या समाजसेवेचा मजबूत पाया ठरला.

अडचणी कितीही असल्या, तरी शिक्षणाशिवाय पर्याय नाही, या ठाम विश्वासावर त्यांनी आपली वाट पुढे चालू ठेवली. अनेक वेळा थकवा आला, निराशा आली, पण त्यांनी कधीही हार मानली नाही. त्यांनी बी.ए. आणि एल.एल.बी. द्वितीय वर्ष पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. कायद्याचे शिक्षण घेताना त्यांना न्यायाची खरी व्याख्या उमगली. न्याय म्हणजे फक्त कोर्टात दिला जाणारा निकाल नव्हे; न्याय म्हणजे समाजातील शेवटच्या, दुर्लक्षित, वंचित माणसाच्या डोळ्यात समाधान दिसणे. शिक्षणाने त्यांना दिशा दिली, तर अनुभवांनी त्यांना माणूस म्हणून समृद्ध केले.

यानंतर त्यांनी वाशिम अर्बन या खाजगी बँकेत तब्बल बारा वर्षे त्यांनी जनसंपर्क अधिकारी म्हणून सेवेत काम केले. नियम, शिस्त आणि जबाबदाऱ्या पाळताना त्यांनी माणुसकीचा धागा कधीही तुटू दिला नाही. अनेक अधिकारी फाइल्समध्ये अडकून पडतात; पण निलेश सोमाणी यांनी फाइल्सपेक्षा माणसांना महत्त्व दिले. सामान्य माणसाच्या अडचणी, त्याच्या वेदना, त्याचे प्रश्न हे सगळे त्यांनी जवळून ऐकले. तरीही त्यांच्या मनात एक सतत अस्वस्थ करणारा विचार होता आपण अजून अधिक लोकांपर्यंत पोहोचू शकतो, समाजासाठी अजून मोठी भूमिका बजावू शकतो. त्यामुळे त्यांनी कायमस्वरूपी नोकरीचा राजीनामा दिला.याच अस्वस्थतेतून त्यांच्या पत्रकारितेचा जन्म झाला. पत्रकारिता ही त्यांच्या दृष्टीने केवळ व्यवसाय नव्हता; ती समाजपरिवर्तनाची हाक होती. दैनिक मातृभूमीच्या वाशीम आवृत्तीचे संपादक म्हणून त्यांनी निर्भीड, प्रामाणिक आणि मूल्याधिष्ठित पत्रकारितेचा आदर्श निर्माण केला. त्यांनी सामान्य माणसाचा आवाज शब्दांत गुंफला. अन्याय, शोषण आणि विसंगती यांविरुद्ध त्यांनी लेखणी उचलली. साप्ताहिक तरुण समता वाणीच्या माध्यमातून त्यांनी समाजाला आरसा दाखवला. त्यांच्या लेखणीत सनसनाटी नव्हती, पण सत्य होते; आक्रमकता नव्हती, पण ठामपणा होता. त्यामुळेच त्यांचे लेख वाचकांच्या मनाला भिडले.

पत्रकारितेबरोबरच समाजकार्य हे त्यांच्या आयुष्याचे केंद्रबिंदू बनले. माजी राष्ट्रीय सेवाकर्मी, नेहरू युवा केंद्र (भारत सरकार) चे अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ विदर्भ अध्यक्ष, भारतीय जैन संघटना वाशीम जिल्हाध्यक्ष, तरुण क्रांती मंच जिल्हाध्यक्ष, मारवाडी युवा मंच वाशीम संस्थापक अध्यक्ष, स्वामी विवेकानंद शिक्षण व व्यायाम प्रसारक मंडळ धनज बु. अशा विविध जबाबदाऱ्या त्यांनी स्वीकारल्या. प्रत्येक पद त्यांनी सेवाभावाने निभावले. त्यांच्या दृष्टीने पद म्हणजे प्रतिष्ठा नव्हे, तर समाजासाठी काम करण्याची संधी होती. त्यांच्या कार्याची दखल घेत देशपातळीवर आणि राज्यपातळीवर त्यांना असंख्य पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. भारत सरकारकडून मिळालेला युवा जगत सर्वश्रेष्ठ राष्ट्रीय युवा पुरस्कार, भारत स्वाभिमान ट्रस्ट हरिद्वार तर्फे राष्ट्रीय युवा पुरस्कार, राजीव गांधी राष्ट्रीय समरसता पुरस्कार, ओडिशातील भुवनेश्वर येथे मिळालेला राष्ट्रीय वाकपटु पुरस्कार, रामदेव बाबांच्या पतंजली संस्थेचा पुरस्कार हे सगळे सन्मान त्यांच्या कर्तृत्वाची पावती आहेत. महाराष्ट्र शासनाचे राज्यस्तरीय आदिवासी सेवक पुरस्कार, वसंतराव नाईक शेतीमित्र पुरस्कार, महात्मा गांधी व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार, गुणवंत कामगार पुरस्कार, महात्मा गांधी विवादमुक्ती पत्रकारिता पुरस्कार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार, विदर्भ आयकॉन पुरस्कार, स्वामी विवेकानंद युवागौरव पुरस्कार, अहिल्याबाई होळकर युवा गौरव पुरस्कार या सन्मानांची यादी जितकी मोठी आहे, तितकाच त्यागाचा प्रवास खोल आहे. शंभरहून अधिक वक्तृत्व आणि वादविवाद पुरस्कार त्यांच्या विचारांची धार दाखवतात. मात्र पुरस्कार हे त्यांच्या आयुष्याचे अंतिम ध्येय नव्हते. समाजसेवा हीच त्यांची खरी ओळख होती. सर्वधर्मीय सामूहिक विवाह सोहळ्यांच्या माध्यमातून त्यांनी पाचशेहून अधिक नवदाम्पत्यांच्या आयुष्यात आनंदाचे क्षण पेरले. जाती-धर्मांच्या भिंती पाडून त्यांनी माणुसकीचा सेतू उभा केला. कोरोना महामारीच्या अंधारात, जेव्हा माणूस माणसापासून दूर पळत होता, तेव्हा निलेश सोमाणी यांनी स्वतःचा प्लॉट विकून पंधरा हजारांहून अधिक गरजू लोकांपर्यंत धान्य, किराणा, कपडे, मास्क आणि सॅनिटायझर पोहोचवले. कोरोना काळात डॉक्टर आपल्या दारी हा उपक्रम भारतीय जैन संघटन यांच्या माध्यमातून राबवून हजारो लोकांना आधार दिला त्यांच्या आरोग्याची तपासणी व मोफत औषधीचे वितरण केले. ग्राम धनज बू येथे कोरोना काळात आयुर्वेदिक किट चे हजारो लोकांना किट वितरण , कष्टकरी महिलांना दर महिन्याला मोफत किराणा किट देण्यात आली.हा केवळ मदतीचा नव्हे, तर त्यागाचा इतिहास आहे. मुक्या जनावरांसाठी चारा वाटप, गेली पंधरा वर्षे पासून दररोज गायी ना ढेप वाटप, रस्त्यावरील कुत्र्यांना बिस्कीट वाटप सोबत वेळोवेळी आरोग्य तपासणी शिबिर रक्तदान शिबिर जनजागृती अभियान मेळघाट येथील आदिवासी बांधवांना गत वीस वर्षापासून कपडे धान्य वाटप आरोग्य तपासणी शिबिर आयोजन केले. त्यांची करुणा माणसांपुरती मर्यादित राहिली नाही. वाशीम जिल्ह्यात शेकडो आरोग्य शिबिरांच्या माध्यमातून त्यांनी वयोवृद्ध, निराधार आणि वंचितांना मोफत वैद्यकीय सेवा उपलब्ध करून दिली. अनेक झोपड्यांमध्ये त्यांनी अंधार दूर करून प्रकाशाचा दिवा लावला. असंख्य गरिब विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देऊन त्यांनी त्यांच्या स्वप्नांना बळ दिले. अपंग आणि निराधार विद्यार्थ्यांना दत्तक घेऊन त्यांच्या शिक्षणापासून उदरनिर्वाहापर्यंतची जबाबदारी त्यांनी स्वतःच्या खांद्यावर उचलली.

रस्त्यावर अपघात झालेला जखमी माणूस पाहिला की त्यांनी कधीही मागे वळून पाहिले नाही. तात्काळ त्याला रुग्णालयात पोहोचवून उपचाराचा संपूर्ण खर्च उचलणे हे त्यांच्या आयुष्याचे रोजचे कार्य बनले. आईच्या स्मृतिप्रीत्यर्थ त्यांनी अनेक वेळा एक लाख रुपयांचे योगदान देऊन समाजकार्याला बळ दिले. भारतीय जैन संघटनेच्या माध्यमातून पाणी फाउंडेशन व नीती आयोग भारत सरकार महाराष्ट्र शासन व जिल्हा प्रशासन यांचा जलतारा उपक्रमांतर्गत चाळीस हजार खड्डे खोदून जलसंवर्धनाचा वर्ल्ड रेकॉर्ड घडवला. या कार्यात त्यांनी तनमन धनाने सक्रिय सहभाग नोंदविला गावोगावी प्रबोधनाच्या माध्यमातून लोकांना या कार्यामध्ये येण्यासाठी प्रवृत्त केले. हा विक्रम केवळ आकड्यांचा नाही, तर भावी पिढ्यांसाठी जपलेली आशा आहे. गत एकवीस वर्षापासून कडाक्याच्या थंडीत गरजवंतांना मायेची उब, तापत्या उन्हात पक्षांकरिता कुंडीमध्ये पाणी व आहाराची व्यवस्था करतात.

आज निलेश पुनमचंद सोमाणी हे नाव केवळ वाशीम जिल्ह्यात नाही, तर संपूर्ण महाराष्ट्रात आणि देशभरात आदराने घेतले जाते. कारण त्यांनी स्वतःसाठी नव्हे, तर समाजासाठी जगणे निवडले. त्यांचे आयुष्य म्हणजे संघर्षातून उमललेली सेवा, वेदनांतून जन्मलेली करुणा आणि विचारांतून घडलेली क्रांती आहे. अशी माणसे काळाच्या चौकटीत अडकत नाहीत; ती काळालाच दिशा देतात. निलेश सोमाणी यांचे कार्य हेच सांगते दुसऱ्यासाठी जगलेले आयुष्य कधीच संपत नाही, ते पिढ्यान्पिढ्या उजेड देत राहते. अनेक जुन्या मंदिराचा जिर्णोद्धार करण्यातही त्यांनी पुढाकार घेतला धार्मिक कार्यात सदैव अग्रेसर असतात श्रीमद् भागवत कथा शिव महापुराण हनुमान कथा रामायण आदी अनेक कार्यामध्ये त्यांचा सक्रिय सहभाग असतो आजपर्यंत देशभरात २००० पेक्षा अधिक व्याख्यानाच्या माध्यमातून हजारो तरुणांना त्यांनी देशभक्तीचे व संस्काराचे स्वाभिमानाचे धडे दिले आहे त्यांनी कधीही याकरिता पैसे घेतले नाही ज्ञानाचा खरा अर्थ हा लोकांपर्यंत पोहोचणे जरुरी आहे हीच त्यांची शिकवण आहे. संपूर्ण देशात स्वाभिमान तरुण क्रांती यात्रा त्यांनी काढून स्वच्छता बेटी बचाव बेटी पढाव आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना मदत आदिवासी निराधार यांना मदत व्यसनमुक्ती मार्गदर्शन आदी कार्य या यात्रेच्या माध्यमातून करण्यात आले, बेघर निवारा केंद्र दिव्यांग केंद्र वृद्धाश्रम अशा अनेक उपक्रमात सामाजिक बांधिलकीतून त्यांनी पुढाकार घेऊन मदत केली आहे. महाराष्ट्र शासन व देशाचे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी प्रतापराव जाधव यांनी केंद्र शासनाला पद्म पुरस्कारा करीत आहे त्यांच्या नावाची शिफारस केली आहे हीच त्यांच्या कार्याची खरी पावती आहे. त्यांच्या या सर्व कार्यात त्यांच्या पत्नी एडवोकेट सो भारती सोमानी सक्रियपणे सहभागी होतात त्यांनाही शासनाचा प्रतिष्ठेचा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कार समवेतअनेक पुरस्कार मिळाली आहे पत्रकारिता क्षेत्रात त्याही त्यांच्या खांद्याला खांदा लावून कार्य करीत आहे दैनिक तरुण समता वाणी यांच्या मुख्य संपादक व दैनिक लोकशाही वार्ता यांच्या जिल्हा प्रतिनिधी म्हणून त्या कार्यरत आहेत त्यांच्या प्रत्येक सामाजिक कार्य व चळवळीत त्यांचा सक्रिय सहभाग असतो. आज त्यांच्या कार्याला सामाजिक पाठबळ परिवाराचे पाठबळ मित्रपरिवारांचे पाठबळ दानदात्याचे पाठबळ मिळत आहे त्यामुळेच हा समाजसेवा कार्याचा सेतू मोठा आकार घेत आहे. आईची पुण्याई व आशीर्वाद हीच त्यांची खरी ताकद आहे



संतोषजनक लेखणीतून....
संतोष अवसरमोल
(पत्रकार/लेखक)
मु+पो.घाटबोरी, ता. मेहकर,
जि. बुलढाणा
मो:-९६८९७७७१२९

**समाजसेवेत काही व्यक्ती बी पेरतात, काही रोप वाढवतात, तर काही माणसे काळाच्या ओघात वटवृक्ष बनतात. निलेश पुनमचंद सोमाणी हे असेच समाजसेवेतील वटवृक्ष आहेत. त्यांच्या आयुष्याचा प्रत्येक क्षण समाजासाठी वाहिलेला आहे. स्वतः झिजत गेले, पण इतरांना सावली देत राहिले हीच त्यांच्या कार्याची खरी ओळख आहे. गरिबी, संघर्ष आणि जबाबदाऱ्यांतून उभे राहिलेले हे व्यक्तिमत्त्व आज हजारो गरजूंसाठी आधारवड बनले आहे. त्यांच्या समाजसेवेच्या मुळांनी माणुसकी, समता आणि संवेदनशीलता घट्ट धरून ठेवली आहे. त्यांच्या फांद्यांवर गरिबांचे स्वप्न विसावतात, निराधारांना आश्वासक आधार मिळतो, तर त्यांच्या सावलीत समाजातील दुःखाला थोडा विसावा मिळतो.**